**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# संकेत

'अर्थबोधपत्रिके'च्या कुटुंबातील सगळ्यांना नूतन वर्षाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. चालू शतकाच्या पंचविशीचे हे वर्ष आपल्या सगळ्यांना आनंदाचे, भरभराटीचे, सुखसमृद्धीचे, शांतीचे आणि मुख्य म्हणजे उत्तम आरोग्याचे ठरो, हीच शुभकामना. मावळत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाच्या स्वागताला तयार राहायचे, हा आता अंगवळणी पडलेला परिपाठ आहे. एखादी बाब नित्याची झाली की तिच्यातील सगळी रोचकता पार मावळून जाते. मग तिथे उरतो शुद्ध उपचार आणि निव्वळ प्रतिकात्मकता. हे सगळे असे आणि खरे असले तरी, आपल्या आयुष्यात नव्याने प्रवेशणारे २०२५ हे वर्ष कसे असेल आणि कसे सरेल, याची उत्कंठा आपल्या सगळ्यांच्याच मनात दाटलेली असावी, हे स्वाभाविकच आहे. खरे म्हणजे, अविरत वाहणाऱ्या अनादी–अनंत काळाचे, केवळ आपल्या सोयीखातर आपण भूत–वर्तमान–भविष्य अशा तीन खंडांत विभाजन करतो. वस्तुत:, आपण जगत असतो त्यांपैकी एकाच कालखंडात आणि ते म्हणजे वर्तमानात. भूतकाळ असतो हातातून निसटलेला तर भविष्यकाळ उगवलेलाच नसतो, तरीदेखील गतकाळाबद्दल उसासे टाकत भविष्याची चिंता वाहत बघण्याची आपली खोड पाठ सोडण्याचे नाव काही घेत नाही. किंबहुना, तो आपला विरंगुळाच असतो म्हणा ना! आणि म्हणूनच, नव्याने उगवणारे वर्ष कसे असेल याची भविष्यांकने सर्वत्र कथन केली जाऊ लागतात. आपण ती वाचतो–ऐकतोदेखील उड्या मारत. २०२५ सालासाठीची भाकिते, अगदी त्याच धर्तीवर, सगळीकडे प्रसृत होत आहेत. सरत्या २०२४ सालातील घटितांचे पाथेय बरोबर पेलतच आपण वाटचाल करत असल्याने त्यांचे काही ना काही कवडसे २०२५ सालातील जगण्यात पडावेत, हे साहजिकच. विस्मृतीच्या दरीत गडप झालेला युक्रेन–रशिया यांचा संघर्ष, हमास आणि इस्रालय यांच्यादरम्यानची दुष्मनी, सीरियामधील उठाव, अमेरिकेमध्ये अवतरलेली ट्रम्पशाही... यांचा आणि आपला पाला नवीन वर्षातही पडणारच आहे. एकूणांतील ८०पेक्षा अधिक देशांत विसावलेले जवळपास निम्मे जग २०२४ या वर्षात निवडणुकांच्या मांडवाखालून

गेले. सत्तासुंदरीने ज्यांच्या गळ्यांत विजयमाला घातल्या ते जवळपास ८४ देशांमधील नवसत्ताधीश कोणती धोरणे राबवितात आणि कसा कारभार करतात त्यांवर उभ्या जगाच्या सर्वसाधारण कल्याणाची पातळी येत्या वर्षात निर्भर राहील. तसे बघितले तर, अस्थिरता आणि तिच्या जोडीने निपजणारी अनिश्चितता यांच्या साथीनेच जागतिक समुदायाने चालू सहस्त्रकाच्या पहिल्या शतकातील पहिली दोन तपे व्यतीत केली. २००१ सालातील ११ सप्टेंबर रोजी जागतिक व्यापार संघटनेच्या न्यूयॉर्कमधील जुळ्या मनोऱ्यांवर झालेला इस्लामी दहशतवाद्यांचा हल्ला, २००२ साली अमेरिकेतच फुटलेला 'डॉट-कॉम' कंपन्यांचा फुगा, 'सब्प्राइम' अमेरिकी कर्जांच्या २००८ साली फुटलेल्या फुग्यातून निपजलेले वैश्विक वित्तीय अरिष्ट अशा एका पाठोपाठ एक उद्भवलेल्या आघातांमधून जरा कोठे सावरतो न सावरतो तोच 'कोविड'ने २०२० सालातील मार्च महिन्यात दिलेला दणका... अशी ही अस्थिरतेच्या कारक घटकांची मलिकाच आपण अनुभवली. आता, चालू शतकाच्या ऐन तारुण्याची नव्हाळी सूचित करणारे २०२५ हे वर्ष तरी, अस्थिरतेच्या पर्वातून मुक्तीचे संकेत सूचित करील, अशी अपेक्षा!

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# अर्थकारण

## कसे असेल नवीन वर्षातील संभाव्य अर्थचित्र?

एकविसावे शतक आता वयाच्या पंचविशीमध्ये प्रवेश करते आहे. २००१ते २०२४ या गेल्या दोन तपांदरम्यान २००१, २००८ आणि २०२० अशा तीन कालबिंदूंवर जागतिक समुदायाला तीन मोठे धक्के बसले. त्यांतील पहिला, म्हणजे, २००१ सालातील ११ सप्टेंबर रोजी उद्‌भवलेला आतंक रक्तरंजित अशा दहशतवादी स्वरूपाचा होता. अमेरिकी 'सबप्राइम' कर्जांचा फुगा फुटल्याने २००८ साली बसलेला दणका वित्तीय स्वरूपाचा होता. तर, 'कोविड-१९'च्या रूपाने २०२० साली जगात सर्वत्र हलकल्लोळ माजविणारे संकट होते आरोग्याशी संबंधित. या तीन मोठ्या हादऱ्यांनी सामाजिक स्तरावर तर अस्वस्थता निर्माण झालीच परंतु जागतिक अर्थकारणाला तिचे बसलेले वित्तीय आणि आर्थिक हादरे अधिक सघन होते व त्यांचे अनिष्ट परिणाम दीर्घकाळ जाणवणारे असे ठरले. किंबहुना, 'कोविड-१९'पायी सर्वत्रच उत्पादन, रोजगार आणि क्रयशक्ती यांची जी जबर हानी घडून आली तिच्यातून जागतिक अर्थव्यवस्था अजूनही पुरती सावरलेली आहे, असे ठामपणे म्हणवत नाही. या अस्थिरतेतच आता भर पडली आहे ती, गेली दोन वर्षे धुमसत असलेला रशिया आणि युक्रेन यांच्यादरम्यानचा संघर्ष, इस्त्रायल आणि हमास यांचा हिंसक झगडा, अगदी अलीकडचा सीरियामधील उठाव आणि जर्मनी व फ्रान्स या दोन देशांमधील राजकीय पेच अशांसारख्या घटनामालिकेपायी उद्‌भवलेल्या अनिश्चिततेची.

अशा सगळ्या पार्श्वभूमीवर, नव्याने उगवलेल्या २०२५ या वर्षात वैश्विक अर्थव्यवस्थेचे एकंदर चित्र कसे दिसेल अथवा कसे असेल याची उत्कंठा सगळ्यांनाच असणे स्वाभाविक आहे. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, गोल्डमन सॅक्स, स्टॅन्डर्ड ॲन्ड पुअर, ब्रुकिंग्ज इन्स्टिट्यूट... यांसारखी व्यासपीठे त्या संदर्भात, त्यांच्या त्यांच्या अभ्यासांनुसार काही भाकिते अथवा कल्पनाचित्रे रेखाटत आलेली आहेत. त्या सगळ्या भाकितांचा आढावा वर्षारंभीच घेणे संयुक्तिक ठरावे आणि

उपयुक्तही. येणाऱ्या काळात आपल्या पुढ्यात नेमके काय वाढून ठेवलेले आहे, हे कोणालाच ठाऊक नसते. परंतु, नजीकच्या भविष्यात काय संभाव्य आहे, याचे ढोबळ रेखाटन जरी हाताशी असले तरी आपल्याला काही एक आधार व दिशा मिळते. या ठिकाणी मांडलेल्या आढाव्याचे उद्दिष्टदेखील तेच व तेवढेच आहे.

उत्पादन आणि उपभोग यांच्यादरम्यानचे नाते जैविक स्वरूपाचे असते. ग्राहकोपयोगी वस्तू आणि सेवांचे उत्पादन जितके अधिक तितकी उपभोगासाठी वस्तू व सेवांची उपलब्धी अधिक आणि अशी उपलब्धी जितकी अधिक तितकी सर्वसाधारण कल्याणाची मात्रा अधिक, असे एक सोपे समीकरण अर्थशास्त्रीय विश्लेषणामध्ये मांडले जाते. व्यवहारात हे समीकरण तसेच्या तसे लागू होत नाही व नसते. परंतु, त्याच वेळी ते संपूर्णपणे अवास्तव अथवा गैरलागू आहे, असेही कोणी समजत नाही. त्यांमुळे, एकंदर ठोकळ उत्पादनामध्ये येत्या काळात सरासरीने किती वाढ अपेक्षित आहे, याचे अंदाज पुढील काळातील कल्याणाच्या सरासरी संभाव्य पातळीवर काही एक प्रकाश टाकत असतात हे नक्की. २०२५ या वर्षात जागतिक अर्थव्यवस्था ३.३ टक्के दराने वाढेल असा जो अदमास व्यक्त केला जातो तो या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. २०२४ या वर्षात जागतिक अर्थव्यवस्था सरासरी ३.२ टक्क्यांनी पुढे सरकली. त्यांमुळे, २०२५ या वर्षासाठी वर्तविण्यात येत असलेला तिच्या वाटचालीच्या वेगाचा अंदाज जवळपास २०२४ सालाइतकाच आहे, असे म्हणावयास हवे.

अर्थात, नवीन वर्षात वैश्विक अर्थव्यवस्था फार मोठी छलांग मारेल अशी अपेक्षा नाही आणि ते शक्य बनू शकेल अशी परिस्थितीही सध्या नाही. मध्यपूर्वेतील युद्धमय अशांतता, जर्मनी-फ्रान्स-बांगला देश यांसारख्या देशांत उद्‌भवलेले राजकीय पेचप्रसंग यांमुळे एकंदरीने सर्वत्र अनिश्चिततेचे वातावरण सघन राहील, असे अंदाज जवळपास सगळ्यांच संस्था व अर्थविषयक अभ्यासक वर्तवत आहेत. अशा परिस्थितीत, पैसाविषयक धोरणे तसेच राजकोषीय धोरणे निश्चित करणे हे सगळ्यांच देशांतील धोरणकर्त्यांना अवघड ठरावे. देशोदेशींचे पैसाविषयक धोरण आज संधीकाळातून साकारते आहे. 'कोविड-१९'पायी अर्थव्यवस्थांची जी दुरवस्था झाली तिच्या निवारणासाठी जवळपास सगळ्यांच देशांनी सैल व उदार असे पतधोरण अंमलात आणले व लावूनही धरले. त्याच वेळी, 'कोविड-१९'च्या फेऱ्यादरम्यान जारी कराव्या लागलेल्या सार्वत्रिक टाळेबंदीपायी जगभरातील पुरवठासाखळ्या पुरत्या विस्कळीत बनून गेल्या होत्या. या दोहोंचा एकत्रित परिणाम म्हणून 'कोविड-१९'चा तेवर घटल्यानंतरच्या मधल्या काळात सर्वत्रच महागाईचा ज्वर तापत राहिला.

त्या महागाईला आळा घालण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सगळ्यांच देशांतील मध्यवर्ती बँकांनी कमी-अधिक प्रमाणात कठोर पतधोरण राबविण्याकडे कल वळवला. त्याचा परिणाम म्हणून आजघडीला तरी महागाई सर्वत्रच बऱ्यापैकी आटोक्यात आहे. परंतु, सर्वसाधारण अनिश्चिततेपायी आर्थिक वाढविकासाला जो पायबंद बसतो आहे तो बघता कठोर पैसाधोरण अधिक किती काळ राबवायचे असाही पेच काही देशांमधील धोरणकर्त्यांच्या पुढ्यात आहेच.

महागाई त्या मानाने आटोक्यात असली तरी तिचे अपेक्षित असे अनुकूल पडसाद बाजारपेठांमधील मागणी वाढण्यामध्ये मात्र उमटताना आजही दिसत नाहीत. सर्वसाधारण ग्राहक मनोमन साशंक असल्याचा हा पुरावा ठरतो. 'कोविड-१९'च्या हल्ल्यापायी जी पडझड झाली तिच्यामधून कुटुंबांचे अर्थकारण अजूनही पुरते सावरलेले नाही, हा या सगळ्यांतून निघणारा एक निष्कर्ष. दुसरीकडे, कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रशास्त्रापायी येत्या काळात कोणत्या क्षेत्रांमधील किती रोजगारांवर गदा येणार आहे, याचीही भयशंका सर्वत्र आहेच. त्यांमुळे, भविष्यात किती प्रमाणात व कोठे बेरोजगारीचे प्रमाण वाढणे संभवते, त्यांपायी किती व्यापक प्रमाणावर क्रयशक्तीची हानी घडून येईल, नजीकच्या भविष्यात पगारवाढ होईल अथवा नाही आणि झालीच तर ती किती असेल... अशा आशंकांपायी ग्राहकवर्ग खर्चाळूपणाला लगाम लावत असावा, असे विश्लेषण काही अर्थवेत्ते मांडताना दिसतात.

नरमाईच्या सावटाखालून वाटचाल करणाऱ्या अर्थव्यवस्थांना चालना देण्यासाठी विस्तारक असे राजकोषीय धोरण अवलंबले जाणे, अशा आर्थिक पर्यावरणात संभाव्य ठरते. सरकारी खर्चाला बढावा देणे, करसवलती जाहीर करणे, करांचा बोजा सरासरीने कमी होईल असे करधोरण राबवणे... अशा प्रकारच्या उपाययोजना या संदर्भात संभवतात. परंतु, 'कोविड-१९'च्या आघातापायी जायबंदी झालेल्या अर्थव्यवस्थांना टेकू पुरविण्यासाठी योजलेल्या उपायांपायी जगभरातील जवळपास सगळ्यांच देशांच्या तिजोरीवर आजच कर्जांचा मोठा बोजा चढलेला आहे. सैल व उदार अशी पतधोरणे राबवूनही अर्थव्यवस्थांमध्ये अपेक्षित असे चैतन्य सळसळत नाही म्हणल्यानंतर सरकारी खर्चाकडे मोहरा वळविणारी विस्तारक अशी राजकोषीय धोरणे अवलंबावीत तर मुळातच डोक्यावर वाढलेल्या कर्जांच्या बोजात अधिक भरच पडेल याची धास्ती अनेक देशांमधीक धोरणधुरिणांना आज सतावते आहे. अशा परिस्थितीत, त्या त्या वेळची जागतिक परिस्थिती आणि आपापल्या देशांतील अर्थकारणाच्या पुढ्यात उभे ठाकलेले पेच यांनुसार त्या त्या वेळी अनुरूप व

आवश्यक अशी पतविषयक तसेच राजकोषीय धोरणे अवलंबण्याखेरीज देशोदेशींच्या धोरणकर्त्यांना फारसा पर्याय उरणार नाही.

जागतिक अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा नजीकच्या भविष्यात नेमका कसा दिसेल ते खूप मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहील जागतिक अर्थपटलावरील तीन भिडूंची २०२५ सालातील अर्थविषयक धोरणे नेमकी कशी असतील त्यांवर. अमेरिका, चीन आणि युरोपीय समुदाय हे ते तीन बलवान भिडू. आता, अमेरिकेमध्ये ट्रम्प यांची कारकीर्द चालू झालेली असल्याने तिथेही भरघोस अनिश्चतता संभवते. कारण, मुख्यत: अमेरिकेतील स्थलांतरित आणि अमेरिकेचा परदेशी व्यापार या दोहोंसंदर्भात ट्रम्पमहाशय नेमकी कोणती भूमिका अवलंबतात ते आज तरी गुलदस्त्यातच आहे. जागतिक सत्तापटलावर अमेरिकेला तिचे गतेतिहासातील सर्वोच्च स्थान मिळवून देण्याचे ऐलान डोनाल्ड ट्रम्प हे त्यांच्या पहिल्या सत्तापर्वापासून सातत्याने करत आलेले आहेत. अमेरिकी अर्थव्यवस्थेला आणि मुख्यत: अमेरिकी कॉर्पोरेट विश्वाला वस्तुनिर्माण उद्योगातील त्याचे कालचे वर्चस्व पुनश्च एकवार प्रस्थापित करता यावे यासाठी अन्य देशांमधून अमेरिकी बाजारपेठेत आयात केल्या जाणाऱ्या जिनसांवर आकारण्यात येणाऱ्या आयातशुल्कांच्या दरांमध्ये वाढ करण्याचा मनसुबा ट्रम्प यांनी त्यांच्या निवडणूक प्रचारादरम्यान केलेला आहे. आता, तो पवित्रा हा केवळ निवडणुकीच्या प्रचाराचा एक भाग आणि म्हणून केवळ प्रचारापुरताच मर्यादित होता की ट्रम्प हे खरोखरच त्यांबाबत व्यवहारात ठोस पावले उचलणार आहेत हे अमेरिकी व्यवस्थेत ट्रम्पशाहीचा अंमल व्यवहारात अवतरल्यानंतरच कळेल.

सत्तेची सूत्रे स्वीकारल्यानंतर लगेचच एक कार्यकारी सूचना जारी करून अमेरिकी बाजारपेठांमध्ये मेक्सिको व कॅनडा या दोन देशांमध्ये आयात केल्या जाणाऱ्या जिनसांवर २५ टक्के दराने आयातशुल्क आकारणी अंमलात आणली जाईल, असे विधान ट्रम्प यांनी सत्तास्वीकारापूर्वी केले होते. तर, चीनमधून अमेरिकी बाजारपेठांमध्ये आयात केल्या जाणाऱ्या जिनसांवर अधिक १० टक्के वाढीव दराने (म्हणजे, २५ टक्के अधिक १० टक्के) आयात शुल्कांची आकारणी जारी होईल, असेही मनोगत ट्रम्प यांनी प्रगट केलेले आहे. केवळ इतकेच नाही तर, स्थलांतरितांसंदर्भातील विद्यमान तरतुदींमध्येही बदल घडवून आणण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. सुधारित तरतुदींना अनुसरत, एका विशिष्ट कालबिंदूनंतर अमेरिकेमध्ये स्थलांतरित झालेल्या अन्य देशवासियांना अमेरिका सोडून जाण्याबाबतचे फर्मान बजावण्यात येईल, असेही सूचन ट्रम्प करत आलेले आहेत.

समजा, ट्रम्प यांनी त्यांचे मनसुबे प्रत्यक्षात उतरवलेच तर त्यांचे परिणाम केवळ अमेरिकी अर्थव्यवस्थेपुरतेच सीमित राहणार नाहीत, हे मात्र नक्की. रोकड्या आर्थिक राष्ट्रवादाच्या तत्वज्ञानाचा पाठपुरावा करत अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्राची पाठराखण करण्यासाठी आयात जिनसांवर शुल्कआकारणी करण्याचा पवित्रा ट्रम्प यांनी अंमलात आणला तर पहिली गोष्ट म्हणजे अन्य देशांतून अमेरिकी बाजारपेठेत आयात केल्या जाणाऱ्या जिनसांच्या बाजारभावांमध्ये वाढ घडून येईल. महागाईचा तो तेवर नेमका किती असेल आणि कोणत्या जिनसांच्या अथवा जिन्नससमूहांच्या संदर्भात तो कितपत तीव्र राहील त्यांवर महागाईला लगाम घालण्यासाठी अमेरिकी फेडरल रिझर्व्ह कोणती पावले उचलते ते अवलंबून असेल. समजा, सर्वसाधारण भाववाढीला अटकाव करण्यासाठी फेडरल रिझर्व्हने कठोर पैसाधोरण अवलंबले तर अमेरिकी अर्थव्यवस्थेतील व्याजदरांची सरासरी पातळी उंचावण्यात त्याची परिणती घडून येईल. तसे झाले तर अमेरिकी वित्तसंस्थांनी अन्य देशांमधील शेअरबाजारांत 'पार्क' करून ठेवलेल्या ठेवी अगर गुंतवणुकी तिथून पाय काढून घेत अमेरिकेचा रस्ता पकडतील. याचे दोन मुख्य परिणाम संभवतात.

त्यांपैकी एक आनुषंगिक परिणाम म्हणजे, ज्या ज्या देशांमधील भांडवलबाजारांमधून अमेरिकी गुंतवणुकी काढून घेतल्या जातील त्या त्या देशांच्या चलनाचा अमेरिकी डॉलरशी असलेला विनिमय दर बदलेल. संबंधित देशी चलनाचा, मग, अमेरिकी डॉलरच्या तुलनेत मूल्यऱ्हास घडून येण्यास सुरुवात होईल. ही बाब एरवी त्या त्या देशांच्या पथ्यावरच पडली असती. कारण, अमेरिकी डॉलरच्यासापेक्ष देशी चलनाचा मूल्यऱ्हास घडून येण्याने त्या त्या देशांतून निर्यात होणाऱ्या वस्तू व सेवांची बाजारपेठीय स्पर्धात्मकता वाढून त्याचा फायदा त्या त्या देशांना त्यांच्या निर्यातीमध्ये वाढ होण्याद्वारे पदरात पाडून घेता आला असता. बहुतेक सारे देश निर्यातीच्याबाबतीत बहुतेककरून अवलंबून असतात ते अमेरिकी बाजारपेठेसह एकंदरच पश्चिमी बाजारपेठांवर. परंतु, आता ट्रम्प यांनी आयातशुल्कांचा बडगा उगारलाच तर अमेरिकी बाजारपेठेमध्ये प्रवेश करण्याच्या वाटा परदेशी वस्तू व सेवांसाठी कुंठित बनतील. दुसरीकडे, युरोपीय समुदायातील बाजारपेठांमध्ये अजूनही मागणी मलूलच आहे. अशा परिस्थितीत, डॉलरच्या तुलनेत देशी चलनाचा मूल्यऱ्हास घडून आलेल्या देशांना त्या मूल्यऱ्हासाचे त्यांच्या निर्यातीमध्ये वाढ घडून येण्याच्या माध्यमातून मिळू शकणारे अपेक्षित लाभ काही पदरात पुरेपूर पाडून घेता येणार नाहीत. दुसरे म्हणजे, देशी चलनाचा असा घडून आलेला मूल्यऱ्हास, उलट, त्या त्या देशांच्या

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तुटीमध्ये वाढ घडवून आणण्यास कारणभूत ठरेल. कारण, अमेरिकी डॉलर हे वैश्विक स्तरावर राखीव चलन (रिझर्व्ह करन्सी) म्हणून मान्यता लाभलेले चलन असल्याने देशादेशांमधील व्यापारांदरम्यान देवाणघेवाण झालेल्या वस्तू व सेवांचे मूल्य अमेरिकी डॉलरच्या माध्यमातूनच चुकते केले जाते. साहजिकच, जे देश मोठ्या प्रमाणावर आयात होणाऱ्या जिनसांवर अवलंबून असतात अशा देशांच्या चलनाच्या तुलनेत डॉलरचा भाव वधारलेला असल्याने अन्य देशांमधून जी आयात केली जाते तिच्या डॉलरमध्ये चुकत्या करावयाच्या मूल्याची मात्रा उंचावेल. म्हणजे, हा दुहेरी चिमटा ठरतो. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत मूल्यऱ्हास झालेल्या देशी चलनाचे वाढीव निर्यातीच्या रूपाने लाभ मिळत नाहीतच, उलट अन्य देशांमधून आयात केलेल्या जिनसांच्या, वधारलेल्या डॉलरच्या माध्यमातून चुकत्या करावयाच्या मूल्याची मात्रा मात्र सज्जडपणे वाढते. या दोहोंचा एकत्रित परिणाम होऊन त्या त्या देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तुटीमध्ये वाढ घडून येते.

परदेशी संस्थात्मक गुंतवणुकदारांनी अमेरिकी डॉलरच्या स्वरूपात देशोदेशींच्या शेअरबाजारांत केलेल्या अल्पकालीक गुंतवणुकींनी अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या दिशेने तोंड वळविण्याचे दुसरे परिणाम जाणवतात ते त्या त्या देशांतील शेअरबाजारांत जाणवणाऱ्या धक्क्यांनी. ज्या वेळी परदेशी संस्थात्मक गुंतवणुकदार एखाद्या देशातील शेअरबाजारात गुंतवणूक करतात त्या वेळी त्या देशाच्या शेअरबाजारात तेजीची वावटळ उठते. याचे नेमके उलटे पडसाद उमटतात ज्या वेळी परदेशी संस्थात्मक गुंतवणुकदार त्यांचे पैसे त्या शेअरबाजारातून काढून घेतात त्या वेळी. म्हणजेच, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील व्याजदरांची सरासरी पातळी २०२५ या वर्षात, समजा, वाढली तर जगातील अनेक देशांमधील शेअरबाजारांत घसरणीची कंपने उमटतील. भांडवली नफ्याच्या आशेने जे लहान व तुलनेने नवखे गुंतवणुकदार शेअरबाजारांत पैसे गुंतवतात अशांच्या संपत्तीची त्यांपायी हानी होते. दुसरे म्हणजे, परदेशी वित्तीय संस्थात्मक गुंतवणुकदारांनी एखाद्या देशाच्या शेअरबाजारांत गुंतवलेला पैसा त्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील उद्योगव्यवसायांच्या ज्या क्षेत्रांत वळवलेला असतो तिथेही मग आपटबार फुटतात. म्हणजेच, निव्वळ अल्पकालीक लाभांवर डोळा ठेवून परदेशी संस्थात्मक गुंतवणुकदार डॉलरमधील त्यांच्या गुंतवणुकी एखाद्या अर्थव्यवस्थेत 'पार्क' करून ठेवतात आणि अमेरिकी अर्थव्यवस्थेतील व्याजदरांची सरासरी पातळी चढती कमान दाखवू लागल्यानंतर लगोलग आपल्या गुंतवणुकी अमेरिकेकडे वळवतात तेव्हा जगातील अनेक शेअरबाजारांत आणि पर्यायाने त्या त्या देशांतील

उद्योगव्यवसायांच्या विविध क्षेत्रांत चढ-उतारांच्या लाटा उठत राहतात. अशा अकल्पित लाटांचे चटके संबंधित देशांमधील लहानमोठे गुंतवणुकदार आणि उद्योगक्षेत्रांना बसत राहतात आणि परिणामी अस्थिरतेचा, अनिश्चिततेचा एक सार्वत्रिक माहौल फैलावतो. अशी अनिश्चितता अर्थकारणाच्या मुळावर येणारी असते.

कोणत्याही प्रकारच्या धोरणतर्काबाबत फारसा विधिनिषेध न बाळगण्याचा ट्रम्प यांचा कारभारविषयक खाक्या त्यांच्या या आधीच्या अमदानीदरम्यान सगळ्यांनीच अनुभवलेला आहे. त्यांमुळे, अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये आयात केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांवर खरोखरच जबरी आयातशुल्क जारी करण्याचे पाऊल ट्रम्प यांनी उचलले तर त्याचे हे जे नानाविध परिणाम संभवतात त्यांपायी अमेरिकेशी व्यापारी संबंध प्रस्थापित असलेले सगळेच भागीदार देश आज धास्तावलेले आहेत. २०२५ सालातील आर्थिक चित्राचे रंग नेमके कसे असतील यांबाबतची अनिश्चितता गडद करण्यास हा एक घटक चांगलाच कारणभूत ठरेल. कारण, 'उत्तरास प्रत्युत्तर' या न्यायाने ट्रम्प यांच्या व्यापारी हाराकिरीला तसेच उत्तर देण्याचे पाऊल अन्य देशांनी उचलले तर वैश्विक स्तरावर एक निराळ्या प्रकारचे व्यापारयुद्ध आकार धारण करेल. साहजिकच, जगभरातील व्यापारी उलाढालींवर त्याचे प्रतिकूल परिणाम घडून येऊन जागतिक समुदायाच्या सरासरी कल्याणाची हानी होण्याची भीती अर्थवेत्ते व्यक्त करताना दिसतात.

अमेरिकेच्या आजवरच्या इतिहासात मुख्यत: स्थलांतरितांनीच तिच्या अर्थकारणाचे सक्षमीकरण घडवून आणण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. आता, स्थलांतर व स्थलांतरित यांच्या संदर्भात काही नवीन तरतुदी निर्माण करून त्यांच्या चौकटीत जे स्थलांतरित बेकायदेशीर शाबीत होतील त्यांना अमेरिकी भूमीवरून बाहेर काढून देण्याचे धोरण ट्रम्प यांनी उद्या अंमलात आणलेच तर त्याचे खुद्द अमेरिकी अर्थव्यवस्थेलाच फटके बसतील. मुळात, आज अमेरिकेसह बहुतेक सगळ्यांच पाश्चिमात्य देशांमधील लोकसंख्येचे सरासरी वय चांगल्यापैकी वाढलेले आहे. म्हणजेच, 'प्रौढ' अथवा 'ज्येष्ठ' या दोन वयोगटांत जमा होणाऱ्या नागरिकांचे त्या देशांच्या एकंदर लोकसंख्येमधील प्रमाण तुलनेने आज चांगल्यापैकी अधिक आहे. दुसऱ्या भाषेत सांगायचे झाले तर, सगळ्यांच पश्चिमी राष्ट्रांना इथून पुढच्या काळात तरूण श्रमशक्तीची कमतरता भासणार आहे. आता, अशा परिस्थितीत ट्रम्प यांच्या स्थलांतरितांसंदर्भातील पवित्र्यापायी खरोखरच काही स्थलांतरितांना अमेरिकेमधून बाहेर पडावे लागले तर अमेरिकी अर्थव्यवस्थेतील श्रमांच्या बाजारपेठेतील श्रमांच्या पुरवठ्यामध्ये घट घडून येणे अटळ आहे. मुळात, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील

सर्जनशीलता, कल्पकता, उद्यमशीलता यांचे वर्धन-संवर्धन करण्यात देशोदेशींहून तिथे आलेल्या कल्पक, गतिमान व अव्वल बुद्धिमत्तेच्या मनुष्यबळाचा मोठा वाटा आहे. आता, श्रमांच्या बाजारपेठेतील मागणी व पुरवठ्याचे समीकरणच व्यस्त बनले तर अमेरिकी अर्थव्यवस्थेतील श्रमांचे मोल वाढून त्याची परिणती उत्पादनखर्चात वाढ घडून येण्यात होईल. वस्तू व सेवांच्या उत्पादनखर्चात झालेल्या वाढीचे प्रतिबिंब चढलेल्या बाजारभावांमध्ये उमटणारच. म्हणजे, अमेरिकी बाजारपेठेमध्ये आयात होणाऱ्या उत्पादनांवर आयात शुल्क जारी केल्यामुळे जी महागाई संभवते तिला श्रमशक्तीखातर कराव्या लागणाऱ्या वाढीव खर्चापायी होणाऱ्या महागाईची जोड लाभण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सगळ्यांपायी, वैश्विक स्तरावरील भांडवली प्रवाहांची फेरआखणी होण्याच्या शक्यता बळावतात. भांडवलाच्या चलनवलनाचे हे प्रवाह नेमकी कोणती दिशा पकडतात हे आता सांगणे अवघड आहे. त्यांमुळे, २०२५ साल हे आर्थिक आघाडीवरील बऱ्यापैकी अनिश्चिततेचे शाबीत होईल, अशी चिन्हे निदान या घटकेला तरी उमटलेली आहेत. या सगळ्या संभाव्य बदलांचे परिणाम चिनी अर्थव्यवस्थेवर नेमके कसे, किती व केव्हा होतात आणि त्यांना चीन कशा प्रकारे प्रतिसाद देतो, त्यांवरही खूप काही अवलंबून राहील.

अलीकडील काही काळात चीनदेखील आर्थिक कोंडीतून वाटचाल करतो आहे. त्यांमुळे, ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिका आणि अडचणीत असलेल्या चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग यांचे परस्परांशी सूर कसे व कितपत जुळतात ही २०२५ सालातील कदाचित सर्वांत मोठी उत्कंठेची बाब ठरेल. कारण, निर्यातप्रधान आर्थिक विकासाचे १९७०च्या अंतिम पर्वापासून आजवर अवलंबलेले चिनी विकासाचे 'मॉडेल' त्या धोरणाबाबत अमेरिकेने आजवर अवलंबलेल्या उदार भूमिकेवरच तोललेले आहे व होतेही. परंतु, 'अमेरिका फर्स्ट'चा आणि 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या आवाहनाचा झेंडा ट्रम्प यांनी त्यांच्या दुसऱ्या कारकिर्दीदरम्यानही फडकवला तर चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यानच्या व्यापारी संबंधांचा आजवरचा पोत संपूर्णत: बदलून जाईल. त्याचे फटके चिनी अर्थव्यवस्थेला तुलनेने अधिक प्रमाणात बसतील, असे अंदाज वर्तवले जात आहेत. कारण, चीन आणि अमेरिका यांच्या व्यापारी संबंधांमध्ये ट्रम्प यांनी २०१६ साली अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे पहिल्यांदा हाती घेतली तेव्हापासूनच तणावाचे नाते तयार झालेले दिसले. मुख्यत: पश्चिमी राष्ट्रांमधील मागणीवर बेतलेले आर्थिक विकासाचे निर्यातप्रधान प्रारूप असेच अनंत काळ रेटता येणार नाही याची तीव्र जाणीव चिनी धोरणकर्त्यांना तेव्हापासूनच

प्रकर्षाने होऊ लागली. बाहेरील बाजारपेठांवरील मागणीवर निर्भर राहणाऱ्या विकासनीतीचा मोहरा देशी मागणीकडे वळविण्याचा प्रयत्न चीन तेव्हापासून करतो आहे.

कृत्रिमरीत्या प्रवर्तित केलेल्या शहरीकरणाद्वारे बांधकाम क्षेत्राला बळ देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हा त्याच चिनी धोरणांचा एक भाग होता. परंतु, तो प्रयोग चीनच्या पूर्णपणे अंगाशी आला. त्या झटक्यापायी थंडगार पडलेल्या चिनी बांधकाम क्षेत्राला आजही चेतना लाभलेली नाही. एकंदरीनेच, देशी मागणीला उठाव आणण्यासाठी चिनी धोरणकर्त्यांनी हाती घेतलेल्या पैसाविषयक तसेच राजकोषीय धोरणांचा अजूनही म्हणावा तसा प्रेरक परिणाम व्यवहारात दिसलेला नाही. चिनी लोकसंख्येचे वाढलेले सरासरी वय, लग्न शक्यतो लांबणीवर टाकण्याची चिनी तरुणाईची अलीकडील काळातील मानसिकता, तिच्या मुळाशी असणारी बेरोजगारीची चिवट समस्या, कुटुंबांचा आकार मर्यादित ठेवण्याकडे विवाहित चिनी तरुण-तरुणींचा वाढता कल... अशा निरनिराळ्या कारणांपायी देशांतर्गत मागणीचा अपेक्षेइतका भक्कम पाठिंबा आजही प्रगटलेला नाही. उलट, हात राखून खर्च करण्याची सावध प्रवृत्ती व्यापक स्तरावर व्यक्त होते आहे.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची तामिली चीन गेली सुमारे तीन तपे करतो आहे. स्वस्त असणारे चिनी मनुष्यबळ आणि परकीय थेट गुंतवणूक यांच्या साहचर्याने चिनी विकास आजवर बहरत आला. आता, परकीय थेट भांडवलाचे प्रवाहदेखील तुलनेने आक्रसलेले आहेत आणि सतत ३६ वर्षे राबविलेल्या सुधारणापर्वानंतर आता चिनी मनुष्यबळदेखील पूर्वीइतके स्वस्त राहिलेले नाही. जागतिक स्तरावर चीनचे प्रगट होत असलेले विस्तारवादी धोरण ध्यानात येऊ लागल्याने पश्चिमी राष्ट्रांतील गुंतवणुकदारदेखील मनुष्यबळ तुलनेने स्वस्त असणाऱ्या चीनऐवजी अन्य देशांना पसंती देण्याच्या भूमिकेत आहेत. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून चिनी अर्थव्यवस्थेकडे वाहणाऱ्या परकीय थेट गुंतवणुकीच्या आजवरच्या सशक्त प्रवाहांना आता हळूहळू ओहोटी लागत असल्याचे स्पष्ट होते आहे. अशा चौफेर अडचण-पर्वातून वाटचाल करत असलेल्या चिनी अर्थव्यवस्थेच्या पुढ्यातील समस्यांची जटिलता ध्यानात घेऊन ट्रम्प यांच्याशी फारसा पंगा घेण्याच्या भानगडीत शी जिनपिंग पडनार नाहीत, अशी एक अटकळ वर्तवली जाते. तसेच, अमेरिकी अर्थव्यवस्थेचे व्यापक हित नजरेसमोर ठेवून ट्रम्प हेदेखील आर्थिक आघाडीवर फारसा आततायीपणा करणार नाहीत, असेही अभ्यासकांना दुसरीकडे वाटते. परंतु, चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यानचे व्यापारी आणि एकंदरच संबंध नेमके कसे

राहतील त्यांवर २०२५ सालातील वैश्विक अर्थकारणाचा नकाशा बराचसा अवलंबून राहील, यांबद्दल मात्र अभ्यासकांमध्ये दुमत दिसत नाही.

अमेरिका आणि चीन या आजघडीच्या दोन आर्थिक महासत्ता आहेत, हे कोणीच नाकारणार नाही. त्यांमुळे, या दोन अर्थसत्तांदरम्यान २०२५ या वर्षात नेमके कशा प्रकारचे आर्थिक संबंध नांदतील व त्यांचे नेमके कोणते परिणाम जागतिक अर्थकारणावर होतील या संदर्भातील अनिश्चिततेचा माहौल सगळ्यांनाच त्रासदायक ठरत राहील, यात वाद नाही. परंतु, त्याच वेळी जागतिक अर्थकारणातील आणखी एका वजनदार हस्तीचे चालचलन २०२५ या वर्षात कसे राहील, त्याचाही मागोवा ठेवणे अत्यावश्यक ठरते. आणि ती वजनदार हस्ती म्हणजे युरोपीय समुदाय. युरोपीय समुदायाचे एकंदरीने सरासरी आर्थिक चित्र २०२५ या सालात कसे दिसेल त्यांबाबत काहीही अंदाज बांधणे या टप्प्यावर फारच निसरडे ठरावे. कारण, युरोपीय समुदायाच्या संसदेसाठी २०२४ सालातील ऑगस्ट महिन्यात झालेल्या निवडणुकीदरम्यान समुदायातील अनेक देशांमध्ये उजव्या विचारधारेच्या राजकीय पक्षांना बऱ्यापैकी बळ मिळालेले आहे. हे पक्ष प्रत्यक्षात सत्तेवर जरी आलेले नसले तरी, सत्ताधारी पक्षांना धोरणनिश्चितीदरम्यान उजव्या विचारधारेच्या वाढलेल्या बळाची उपेक्षा सहजासहजी करता येऊ नये, इतपत त्यांचे वजन त्या त्या देशातील राजकीय स्पर्धेमध्ये नक्कीच वाढलेले आहे. अशा परिस्थितीत, युरोपीय समुदायातील देशांमध्येही आर्थिक राष्ट्रवादाचा परिपोष करणाऱ्या प्रवृत्तींचा प्रभाव आर्थिक धोरणदिशेवर जाणवू लागला तर येत्या काळात त्याचेही प्रतिकूल परिणाम एकंदर जागतिक व्यापारावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याच प्रक्रियेचे एक अंग म्हणून नवे सत्ताधीश धोरणकर्ते बनलेल्या युरोपीय देशांच्या धोरणदिशेमध्ये काहीशी कैचीत पकडल्यासारखी परिस्थिती उद्‌भवू शकते, असेही काही अभ्यासकांचे विश्लेषण आहे. त्या त्या देशातील अर्थकारणात ज्वलंत बनलेल्या विद्यमान अर्थविषयक समस्यांचा मुकाबला करण्यासाठी, समजा,आर्थिक राष्ट्रवादाचा पाठपुरावा करणारी राजकोषीय धोरणे तिथे आखावी-अंगीकारावी लागली तर विविक्षित देशाची तशी धोरणे आणि युरोपीय समुदायाचे म्हणून समाईक असे जे राजकोषीय आणि/अथवा पतधोरण निश्चित होईल ते धोरण अशा दोहोंत विसंवाद निर्माण होण्याच्या शक्यता वजा करता येत नाहीत. अशा प्रसंगी, युरोपीय समुदाय आणि समुदायाचे घटक असणारे देश यांच्यादरम्यानच्या तशा धोरणविषयक विसंवादापायी गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊन काही प्रमाणात दिशाहीनता उद्‌भवण्याची भीती संभवते. तशा अनिश्चित आर्थिक पर्यावरणाचा फटका युरोपीय समुदायाकडे वाहणाऱ्या परकीय गुंतवणुकीच्या प्रवाहांना बसणे मग अगदी स्वाभाविक ठरते.

युरोपीय समुदायात सध्या काहीसे आर्थिक कुंठितावस्थेचे वातावरण आहे. महागाईचा ताप जाणवत नसल्यामुळे समुदायातील अनेक देशांमध्ये उदार व सौम्य अशा विस्तारक पतधोरणाचा अवलंब केला जातो आहे. समष्टी स्तरावर असे चित्र दिसत असले तरी समुदायाची आणि समुदायातील अनेक देशांची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मक क्षमता मात्र खालावलेली आहे. एक तर, वैश्विक बाजारपेठेत स्पर्धक देशांकडून निर्माण होणारी स्पर्धा तीव्र आहे. दुसरीकडे, युरोपीय देशांमध्ये श्रमशक्ती तुलनेने महाग बनते आहे. समुदायाच्या बाजारपेठीय स्पर्धात्मकतेला कसर लागण्याचे एक मुख्य कारण तेच होय. श्रमशक्तीवरील खर्चात वाढ होण्याची कारणे दोन. एक तर, लोकसंख्येची वयानुसारी जडणघडण युरोपीय देशांमध्ये व्यस्त बनते आहे. ज्येष्ठ नागरिकांचे एकंदर लोकसंख्येतील प्रमाण तिथे सरासरीने वाढते असल्यामुळे दोन गोष्टी घडत आहेत. एक तर, श्रमांच्या बाजारपेठेत तरूण व सर्जक मनुष्यबळाचा तुटवडा जाणवून मागणी व पुरवठ्याचे समीकरण व्यस्त बनल्याने वेतन व मेहेनतान्याची पातळी उंचावते आहे. त्याच वेळी, ज्येष्ठ व वयस्कर नागरिकांना पुरवावयाचे सामाजिक सुरक्षेचे कवच व निवृत्तिवेतनादी कल्याणकारक लाभ यांच्या पूर्तीसाठी वाढीव निधीची तरतूद दरवर्षी करणे शासनसंस्थांना क्रमप्राप्त ठरते आहे. मुळात, तरूण श्रमिकांचे प्रमाण घटते असल्याने करसंकलनाद्वारे शासनाच्या तिजोरीत महसूलाची भर पडण्याला मर्यादा आहेत. साहजिकच, अनेक देश वित्तीय तुटीच्या समस्येपायी गांजले जाताना दिसतात.

सांस्कृतिक व वांशिक एकात्मतेसंदर्भातील जाणिवा व संवेदना बहुतेक युरोपीय देशांमध्ये अतिशय तरल असल्यामुळे बाहेरील देशांमधून येणाऱ्या तरूण स्थलांतरितांना स्थानिक समाजात आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेत सामावून घेण्याबाबत सकारात्मक भूमिकेचा बव्हंशी अभाव दिसतो. त्यांतच, एकंदरीनेच इस्लामी दहशतवादाची भीती सर्वत्र जागती असल्याने स्थलांतरावर बंधने जारी करण्याची मानसिकता जवळपास सर्वत्रच आहे. त्यांमुळे, तरूण श्रमशक्तीचा पुरवठा होण्याचा हा दुसरा संभाव्य स्त्रोतही प्रवाही बनत नाही. श्रमशक्तीवरील वाढत्या खर्चाला आळा घालून त्यांद्वारे उत्पादनखर्च आटोक्यात ठेवत आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत देशी वस्तू व सेवांची स्पर्धात्मकता टिकवून धरण्यासाठी अनेक युरोपीय देशांमध्ये वेतनकपातीचा पर्याय अवलंबला जाताना दिसतो. त्याचा प्रतिकूल परिणाम मग स्वाभाविकपणेच होतो देशी क्रयशक्तीचा ऱ्हास होण्यात. कमकुवत क्रयशक्तीपायी देशी मागणीला उठाव येण्याच्या शक्यता कोळपून जाऊन देशी अर्थव्यवस्थेच्या वाढीला लगाम बसतो.

अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा दर खालावला की त्याचा फटका करसंकलनाला बसून तुटीचे भगदाड वाढते. तूट भरून काढण्यासाठी कर्जउभारणी करण्याखेरीज मग गत्यंतर राहात नाही. युरोपीय समुदायातील अनेक देशांच्या तिजोरीवर आजघडीला चढलेला कर्जांचा बोजा याच कार्यकारणभावाद्वारे निपजलेला दिसतो.

आज जरी सगळीकडे महागाई त्या मानाने सौम्य स्तरावर राहिलेली दिसत असली तरी या संदर्भात अभ्यासक अनिश्चितता वर्तवताना दिसतात. जागतिक स्तरावरील वित्तसंस्थांचाही महागाईसंदर्भात २०२५ या वर्षासाठीचा होरा तोच असला तरी महागाईला इंधनपुरवठा करणारे घटक येत्या काळात कोणती दिशा पकडतील यांबाबत कोणीच काही सांगू शकत नाही. 'कोविड-१९'च्या संसर्गामुळे अर्थकारणाची जी वाताहत झाली तिचे निराकरण करण्यासाठी आजही जवळपास सगळीकडेच उदार पैसाधोरण राबवले जात आहे. उदार पैसाधोरणाचा आणि महागाईच्या सर्वसाधारण स्तराचा सहसंबंध थेट व प्रत्यक्ष असतो. आखातातील अशांततेपायी खनिज तेलाच्या आघाडीवर नांदणारी अस्थिरता आणि पर्यावरणीय बदलांपायी अन्नधान्योत्पादनाला बसणारे हेलकावे या दोन घटितांद्वारे महागाईला केव्हाही चालना मिळण्याच्या शक्यता या पुढील काळात सतत गृहीत धराव्या लागतील. 'कोविड-१९'च्या आतंकादरम्यान विस्कटून गेलेल्या वैश्विक स्तरावरील पुरवठासाखळ्या अजूनदेखील पूर्णत: पूर्ववत झालेल्या आहेत असे दिसत नाही. त्यांतच, जगाच्या वेगवेगळ्या भागांत जी भू-राजकीय अस्थिरता निर्माण झालेली आहे तिच्यामुळेदेखील पुरवठासाखळ्या पूर्ववत होण्यात अडथळे निर्माण होत आहेत. चीन व अमेरिकेदरम्यानच्या व्यापारविषयक संघर्षाच्या संभाव्यता, युरोपीय समुदायातील अनेक देशांमध्ये आर्थिक राष्ट्रवादाचे वाढते असलेले आकर्षण यांपायी एकंदरीनेच जागतिक स्तरावरील व्यापारप्रवाहांमध्ये संभवणारे दिशाबदल ...अशा विविध घटकांमुळे महागाईच्या येत्या काळातील रंगरूपाबद्दल ठामपणे आज कोणीच काही सांगू शकत नाही. त्यांमुळे, २०२५ हे साल सरासरीने अनिश्चिततेचे ठरू शकेल, असाच विविध संस्था आणि अभ्यासकांचा सूर आहे.

अशा सगळ्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था मात्र सरासरी सहा ते साडेसहा टक्के दराने २०२५ या वर्षात पुढे सरकेल असा कयास सगळेच विश्लेषक व्यक्त करत आहेत. २०२४-२५ या चालू वित्तीय वर्षातील जून ते सप्टेंबर २०२४ ही दुसरी तिमाही आर्थिक वाढीसंदर्भातील भाकिते उधळून टाकणारी शाबीत झाली. २०२३-२४ या गेल्या वित्तीय वर्षाच्या जून २०२३ते सप्टेंबर २०२३ या दुसऱ्या

सहामाहीदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेने ८.२ टक्क्यांची वाढ नोंदविलेली होती. तिच्या तुलनेत, २०२४-२५ या चालू वित्तीय वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीतील (जून २०२४ ते सप्टेंबर २०२४) ५.४ टक्के इतकी झालेली वाढ फारच अशक्त दिसली. या काळात देशी ठोकळ उत्पादन जवळपास ६.८ टक्क्यांनी वाढेल असा भारतीय रिझर्व्ह बँकेचा अदमास होता. वास्तवात ही वाढ केवळ ५.४ टक्क्यांचीच नोंदली गेली. त्यांमुळे, २०२५ सालादरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचे अंदाज बांधताना अलीकडे सगळेच विश्लेषक अंमळ नेमस्त बनलेले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रकृतीचे एकून तानमान आजही मॉन्सूनच्या स्वभावावर अवलंबून आहे. त्यांमुळे, २०२५ सालातील मॉन्सून कसे दान पदरात टाकतो त्यांवर खूप काही अवलंबून राहील.

वैश्विक अर्थव्यवस्थेशी भारतीय अर्थव्यवस्थेची असलेली गुंफण त्या मानाने माफक असल्याने जागतिक अर्थव्यवस्थेला येत्या वर्षात जे काही हेलकावे बसतील त्यांच्या आनुषंगिक धक्क्यांपासून भारतीय अर्थव्यवस्थेचा मोठा भाग अस्पर्शित राहावा. आकारमानाने मोठ्या असणाऱ्या जगातील अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक अधिक दराने आगेकूच करणारी अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेचा लौकिक आजघडीला गाजत असला तरी देशी अर्थव्यवस्थेतील अंगभूत अशा संरचनात्मक शबलता दुरुस्त करण्यावर केंद्र सरकार आणि राज्य सरकारे एकत्ररीत्या प्रयत्नांचे बळ कसे व किती एकवटतात त्यांवर खूप काही अवलंबून राहील, असे निरीक्षकांचे सांगणे दिसते. विशेषत:, सर्वसामान्यांच्या उपभोगाची पातळी टिकवून धरण्यासाठी राज्य सरकारे ज्या प्रकारची लोकानुनयी वित्तीय धोरणे राबविताना आताशा दिसत आहेत त्यांपायी सरकारी खर्चाची गुणवत्ता उणावण्याची समस्या बळकट बनावी, यांकडे अभ्यासक लक्ष वेधतात. विशेषत:, राज्य सरकारांच्या तिजोरीवरील कर्जांचे राज्यांच्या एकंदर राज्य ठोकळ उत्पन्नाशी असलेले सरासरी २८ टक्के इतके प्रमाण, वित्तीय उत्तरदायित्व कायद्यान्वये निर्धारित केलेल्या २० टक्क्यांच्या क्षम्य पातळीपेक्षा बरेच अधिक आहे, ही बाब वित्तीय शिस्तीचे कठोर पालन करणे कसे अत्यावश्यक आहे, हे वास्तव ठसठशीतपणे अधोरेखित करणारी अशीच आहे. आता, आर्थिक अनिश्चिततेच्या पर्यावरणात वित्तीय शिस्तीच्या पालनाचे काम अधिकच जटिल बनावे, हे उघड आहे.

# मेंदू संशोधन

## 'ब्रेन रॉट'चे नवे आव्हान

समाजमाध्यमांवर तासन्तास आपला वेळ दवडत राहिल्याने नुसता वेळेचा अपव्यय होतो असे नाही तर त्यातून अनेकानेक मनो-शारीरिक समस्याही उद्‌भवू लागलेल्या आहेत. ही केवळ एखाद्या देशापुरती मर्यादित अशी समस्या राहिलेली नसून ती एक जागतिक समस्या बनते आहे, याची जाणीव अलीकडच्या काळात प्रकर्षाने होते आहे. सतत मोबाइलवर सक्रिय असणे ही आज अनेकांसाठी अगदी अंगवळणी पडलेली बाब आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांप्रमाणेच आता मोबाइल आणि इंटरनेट याशिवाय माणूस राहूच शकणार नाही की काय अशी भीती वर्तवली जाते आहे. कारण त्या सगळ्याचा प्रसार इतक्या वेगाने होतो आहे की त्याच्या वापरावर नियंत्रण राहिलेले नाही. इंटरनेट आणि 'सोशल मीडिया'चा अतिरेकी वापर आणि त्याचे परिणाम या विषयी बरीच चर्चा होताना दिसते. परंतु, अगदी अलीकडे घडलेल्या एका घटनेने हा विषय पुन्हा एकदा नव्याने ऐरणीवर आलेला आहे आणि त्याची सर्वत्र चर्चा सुरू झालेली आहे.

'सोशल मीडिया'च्या अतिवापराचे दुष्परिणाम हाच या विषयाचा केंद्रबिंदू दिसतो. त्याला निमित्तही ठरले तसेच. २०२४ सालामध्ये 'ब्रेन रॉट हा शब्द जगभरात सर्वाधिक वापरला गेला असल्याचे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने जाहीर केले आहे. युवकांपासून ते प्रौढांपर्यंत अनेकांच्या वापरात हा शब्द आला आहे. त्यामुळे ही संकल्पना जगात नव्याने चर्चेला आली आणि मोबाइलच्या अतिवापराच्या धोक्यांची चर्चा पुन्हा एकदा गांभीर्याने सुरू झाली आहे. 'ब्रेन रॉट' या संकल्पनेचा एका शब्दांत अर्थ सांगायचा झाला तर मेंदू सडत जाण्याची प्रक्रिया. हे कशामुळे घडते? तर अर्थातच, मोबाइल आणि इंटरनेटच्या अतिवापरामुळे. सातत्याने 'सोशल मीडिया'वर तासन्तास रेंगाळणाऱ्या लोकांना जी सवय जडते, त्याचे मेंदूवर जे विपरित परिणाम होतात आणि त्याद्वारे आपल्या मेंदूची सर्जनशीलता कमी होत

जाऊन त्याची क्रियाशीलता कमी होते त्याला 'ब्रेन रॉट' असे म्हणतात. आपल्या भवतालात सगळीकडेच हे मोठ्या प्रमाणावर घडत असल्याने हा शब्द अचानक खूप चर्चेत आला आहे.

मानसोपचार तज्ज्ञांच्या मते, नव्या पिढीमध्ये- 'जेन-जी'मध्ये - ही समस्या खूप झपाट्याने वाढताना दिसते आहे. एखाद्या व्यसनाधीन व्यक्तीने अमली पदार्थांचे अतिरिक्त प्रमाणात सेवन केल्यानंतर ज्याप्रमाणे शारीरिक थकवा तिला जाणवतो, डोके बधीर होते, आळस अंगामध्ये भरून राहतो, प्रचंड थकवा जाणवतो, काही करण्याचा उत्साह नसतो... अशी जी अवस्था होते तशीच काहीशी अवस्था मोबाइल आणि इंटरनेटचा वापर करणाऱ्यांची होताना दिसू लागली आहे. त्यामुळेच त्याचे गंभीर धोके वेळीच लक्षात घेणे आणि आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे बनलेले आहे. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने 'ब्रेन रॉट' हा सर्वाधिक चर्चिला गेलेला शब्द जाहीर केल्यामुळे ही संकल्पना नेमकी काय आहे, तिचे परिणाम नेमके काय होतात, तिचे धोके कोणते आणि त्यापासून वाचायचे तर उपाय कोणते या संबंधात जगभरात विविध पातळ्यांवर उहापोह सुरू झालेला आहे.

**'ब्रेन रॉट'मध्ये नेमके होते काय?**

'ब्रेन रॉट'मध्ये प्रचंड मानसिक थकवा येतो. आळस वाढतो. कामातील एकाग्रता कमी होत जाते. 'स्क्रीनटाइम' खूप वाढल्याने अन्य कुठल्याही गोष्टी करण्यासाठी उत्साह राहत नाही. 'ब्रेन रॉट'चा एक आणखी धोकादायक परिणाम म्हणजे स्वभावातील नकारात्मक दृष्टिकोन वाढत जातो आणि त्यामुळे अशा परिस्थितीतून जाणारी व्यक्ती सातत्याने नकारात्मक बातम्यांचा शोध घेत राहते. तासन्‌तास 'ऑनलाइन' असतानादेखील जे पाहिले जाते ते नकारात्मक अधिक असते. मानसिक थकवा वाढवण्यास ते कारणीभूत ठरते. 'ब्रेन रॉट'ची तीव्रता वाढते तसतसे त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे स्वरूपही गंभीर होत जाते. माहिती गोळा करताना अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. साधी साधी आकडेमोड करताना, गणिते सोडवताना तारांबळ उडते. एखादी माहित असलेली गोष्ट पटकन पुन्हा आठवत नाही. स्मरणशक्तीवरदेखील परिणाम होतो. निर्णय घेतानासुद्धा मर्यादा येतात. हे सगळे 'ब्रेन रॉट'चे परिणाम असतात. ते टप्प्याटप्पाने दिसू लागतात, असे मानसोपचार तज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

या विषयावर आता अधिक सखोल संशोधन होणे गरजेचे असल्याचे जाणकारांचे मत आहे. त्यांच्या मते, तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरातून ही समस्या उद्‌भवते.

सातत्याने ‘यू-टयूब’वर वेगवेगळे व्हीडिओ पाहत राहणे, ‘सोशल मीडिया’वर सतत ‘स्क्रोलिंग’ करत राहणे, सतत वेगवेगळ्या ‘ब्राउझर्स’वर जात राहून काही ना काही पाहत राहणे या गोष्टी ‘ब्रेन रॉट’ला कारणीभूत ठरतात. अनेकदा तर इंटरनेटचा वापर करतानाच इतरांना समाजमाध्यमांवरून संदेश पाठवत राहणे, अधूनमधून व्हीडिओ पाहणे, ई-मेल तपासणे अशा अनेक गोष्टी एका पाठोपाठ एक केल्या जातात. या सगळ्यामुळे मेंदूचा अतिवापर केला जातो आणि परिणामत: मेंदू थकतो. जेव्हा खूप मोठ्या प्रमाणावर माहितीचा भडीमार आपल्या मेंदूवर होत राहतो तेव्हा त्यातूनच अंतिमत: ‘ब्रेन रॉट’ची समस्या उद्‌भवत असते. असे अभ्यासकांचे निरीक्षण सांगते.

समाजमाध्यमांवर सातत्याने काही ना काही पाहत असताना आपल्या मेंदूतून Neurochemical Dopamine स्रवायला लागते आणि त्यामुळे आपल्याला समाधानाची व आनंदाची जाणीव होत राहते. त्यामुळे समाजमाध्यमांवर आपण जे काही पाहत आहोत ते अधिकाधिक पाहत राहण्याची भावना मनात निर्माण होते व टिकून राहते. समाधानाची निर्माण होत असलेली ही जाणीव मेंदूला पोहोचत राहते आणि त्यामुळे समाजमाध्यमांवर आपण जे काही पाहत असतो ते नकारात्मक असले तरी पुन्हा पुन्हा पाहण्यासाठीचे संकेत आपल्याला मेंदूकडून मिळत राहतात परिणामी आपल्याला त्याची सवय जडत जाते.

‘ब्रेन रॉट’ ही समस्या अनेक प्रकारच्या अतिरेकामुळे उद्‌भवते. त्याची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे-

**व्हीडिओ गेमिंग**

इंटरनेटवर विविध प्रकारचे ‘व्हीडिओ गेम’ उपलब्ध असतात. त्यांची रचनाच अशी असते की ते खेळ खेळणारी व्यक्ती त्यांत रंगून जाते. तासन्‌तास कसे जातात हे कळतसुद्धा नाही. त्यामुळे या खेळण्याचा अतिरेक होत जातो तेव्हा ‘ब्रेन रॉट’ची समस्या निर्माण होते. व्हीडिओ गेम्समध्ये दीर्घकाळ रमणाऱ्या व्यक्तीची वास्तव आणि आभास यामध्ये गफलत होऊ लागते आणि वास्तवात जगताना अनेक वेळेला त्या व्यक्तीची कसरत होऊ लागते. आभासी विश्वच खरे मानून चालल्यामुळे अशा व्यक्तीला अनेक प्रकारचे भ्रम निर्माण होतात आणि त्यातून ती मानसिक स्वस्थता हरवून बसते. साहजिकच तिला चांगल्या मानसोपचारांची गरज मग निर्माण होते.

**झोंबी स्क्रोलिंग (Zombie scrolling)**

समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे जे गंभीर परिणाम होतात त्यापैकी एक म्हणजे ‘झोंबी स्क्रोलिंग’. या प्रकारामध्ये निरुद्देशपणाने व्यक्ती ‘स्क्रोलिंग’ करीत

राहते. काय पाहायचे, काय करायचे याचे कोणतेही उद्दिष्ट त्या व्यक्तीच्या डोळ्यासमोर नसते. ती फक्त 'स्क्रोल' करण्यातच आनंद मानत राहते आणि या पद्धतीचे 'स्क्रोलिंग' तासन्‌तास सुरू राहते. त्यामुळेच त्याला 'झोंबी स्क्रोलिंग' असे नाव देण्यात आलेले आहे. अशा निरुद्देश 'स्क्रोलिंग'मुळे वेळही व्यर्थ दवडला जातो आणि त्यामुळे मानसिक थकवा येत जातो. त्याचे मेंदूवरही विपरित परिणाम होत राहतात असेही अभ्यासातून आता समोर येते आहे.

**समाजमाध्यमांच्या वापराचे व्यसन**

इतरांच्या आयुष्यामध्ये काय चालले आहे हे सतत पाहत राहण्याची आणि आपण जे करीत आहोत ते जगाला दाखवण्याची सवय यामध्ये लागत जाते आणि हळूहळू त्यांचा वापर इतका वाढतो की त्याचे व्यसनच लागते. समाजमाध्यमांचा वापर केल्याशिवाय आपण राहूच शकणार नाही अशी विचित्र अवस्था निर्माण होते. जेव्हा ही सवय मोडायचा प्रयत्न संबंधित व्यक्ती करते तेव्हा एक विचित्र अस्वस्थता तिच्या मनात निर्माण होते. समाजमाध्यमांवर सतत सक्रिय राहण्याची अनिवार इच्छा निर्माण होत राहते.

**डूम स्क्रोलिंग (Doomscrolling)**

या प्रकारामध्ये सातत्याने नकारात्मक आणि ताण वाढवणाऱ्या बातम्या पाहण्याकडे कल वाढत जातो. सतत नकारात्मक गोष्टी पाहत राहाव्यात असे वाटते. समाजमाध्यमांवरदेखील अशाच बातम्या, त्याच संबंधातील नकारात्मक 'व्हीडिओ', 'यू ट्यूब'वरील हिंसक 'व्हीडिओ', गुन्हेगारी विश्वाशी संबंधित 'व्हीडिओ', 'शॉर्ट क्लिप्स' हे सारे पाहण्यात संबंधितांना आनंद मिळत राहतो आणि त्याची सवय होत जाते. 'स्क्रोलिंग' करतानाही अशाच विषयावरचे 'व्हीडिओ' प्राधान्याने पाहिले जातात. त्याचाही एक नकारात्मक परिणाम आपल्या मेंदूवर होत जातो. त्याचे अनेक प्रकारचे दुष्परिणामही होतात.

या आणि अशा प्रकारच्या सवयींचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर होत असून त्यामुळेच 'ब्रेन रॉट' ही समस्या गंभीर स्वरूप धारण करू लागलेली आहे. तरुणांच्या मनावर या सवयींचे काय परिणाम होतात आणि त्यांची भावनिक वर्तणूक कशी बदलत जाते या दृष्टीने मानसोपचार तज्ज्ञ अभ्यास करीत आहेत. तासन्‌तास मोबाइलवर घालवणे किंवा सतत 'लॅपटॉप'च्या 'स्क्रीन'वर बसणे याचे वरकरणी कोणतेही धोके दिसत नसले आणि ते तितकेसे नुकसानकारक वाटत नसले तरीदेखील दीर्घकाळ त्याच पद्धतीने त्याचा वापर होत राहिल्यास त्याचे मानसिक व शारीरिक अशा दोन्ही

पातळ्यांवरचे दुष्परिणाम दिसू लागतात. ही समस्या युवकांमध्ये वाढत असून ती आता जागतिक स्वरूप धारण करू लागली आहे. या सगळ्याचा परिणाम थेट मेंदूवर होत असून या समस्येने बाधित झालेल्या व्यक्तींना आपले प्राधान्यक्रम ठरवताना अडचणी येतात. त्याचप्रमाणे सकारात्मक बाबींपेक्षा नकारात्मक गोष्टींकडे नकळतपणे त्यांचा ओढा वाढू लागतो, असेही मानसोपचार तज्ज्ञांच्या लक्षात आले आहे. याचा परिणाम असाही होतो की नकारात्मक गोष्टींचा प्रभाव अधिक पडतो आणि त्या तुलनेत सकारात्मक गोष्टींचे मोल जाणवत नाही किंवा छोट्या छोट्या गोष्टींतून आनंदही मिळवता येत नाही. त्यामुळे या मानसिक अवस्थेतून जाणारी व्यक्ती सतत चिडचिडी, एकलकोंडी, काहीशी आक्रमक, नकारात्मक गोष्टींच्या प्रभावाखाली असलेली बनत जाते. एकूणच अशा व्यक्तीचा प्रवास अवनत दिशेने होऊ लागतो, असे निरीक्षणही मानसोपचार तज्ज्ञ नोंदवतात. जागतिक स्तरावरच्या एका अभ्यासातून तर असेही समोर आले आहे की, अशा पद्धतीने तासन्‌तास 'स्क्रोलिंग' करीत बसणाऱ्या व्यक्ती पुढे जाऊन आपले मानसिक संतुलन हरवून बसतात आणि त्यांना अनेक प्रकारच्या मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्याचप्रमाणे, सतत नकारात्मक बातम्या किंवा 'व्हीडिओ' अथवा 'रील्स' पाहणाऱ्या व्यक्ती शारीरिक आणि मानसिक पातळीवर दुर्बल होत जातात आणि त्यांचे दुष्परिणाम उघडपणे दिसू लागतात. अभ्यासातून असेही समोर आले आहे की, मोबाइलच्या आहारी गेलेल्या माणसांतील सर्जनशीलता हळूहळू कमी होत जाते. त्यांची एकाग्रता साधली जात नाही, त्यांना स्मरणशक्तीबाबतच्या समस्याही निर्माण होऊ लागतात. एखादी माहिती जेव्हा मेंदूपर्यंत पोहोचत असते तेव्हा त्या माहितीचे विश्लेषण मेंदूमध्ये होत असते. त्यानुसार, आपल्याला त्या माहितीचे आकलन होत असते आणि आपल्या विचारप्रक्रियेलाही गती मिळत असते. परंतु, 'ब्रेन रॉट'च्या समस्येने बाधित व्यक्तीला माहितीचे विश्लेषणच नीट करता येत नाही, त्यात अडचणी येतात. त्यामुळे अशा व्यक्तीची आकलनक्षमताही कमी कमी होत जाते. त्याचप्रमाणे सातत्याने मोबाइलवर काही ना काही पाहत राहिल्याने लक्ष देण्याची विचार एकाग्र करण्याची क्षमतादेखील कमी होत जाते, असेही अभ्यासकांच्या निदर्शनास आलेले आहे.

या सगळ्यातील आणखी एक मोठा धोका म्हणजे, स्वत:विषयी विचार करताना आभासी जगाच्या परिप्रेक्ष्यातून ही माणसे स्वत:कडे पाहू लागतात आणि त्यावरून इतर जगाशी आपली तुलना करतात. 'ऑनलाइन' विश्व हेच जणू आपले अवघे सामाजिक जग आहे अशा कल्पनेत ती जगू लागतात. त्यावरचे मित्र, मैत्रिणी हेच

त्यांना खरे वाटतात. 'लाइक्स', 'व्ह्यूज' आणि प्रतिसादकांच्या प्रतिक्रिया यावरून ते स्वत:चे मूल्यमापन करू लागतात आणि आपल्याला मिळणारे 'लाइक्स', 'व्ह्यूज' यावरून ते इतरांशी स्वत:ची तुलना करतात. दुसऱ्या व्यक्तीचे मोठेपणही त्याच निकषावर ठरवतात. त्यामुळे मोठी गल्लत होत जाते. तुलना करीत जगण्याच्या एका वेगळ्याच जाळ्यात ही तरुणाई अडकत चालली असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. व्यावसायिक किंवा नोकरीच्या जागी मिळणारे यश, व्यक्तिगत आनंदाच्या बाबी, सहलींमध्ये लुटलेला आनंद, चांगल्या नातेसंबंधांचे दर्शन, जपलेला 'फिटनेस' आणि एकूणच आपल्या तुलनेत दुसऱ्याचे भारी वाटणारे आयुष्य याचाही एक मोठा परिणाम लोकांवर सातत्याने होत असतो. इतरांकडे सारे काही आहे आणि आपल्याकडे काहीही नाही अशी भावना यातून मनात वाढू लागते. त्यातून स्वत:शी एक नकारात्मक असा संवाद सुरू होतो. मेंदूवर सातत्याने होणाऱ्या अतिरेकी भडीमारामुळे वास्तवापासून आपण दूर जातो आणि आभासालाच सत्य मानू लागतो. त्यामुळे स्वत:ची किंमत वाटेनाशी होते आणि त्यातून नैराश्य येते, ताणतणाव वाढतात आणि मानसिक अस्वस्थतेच्या समस्याही वाढू लागतात.

या सगळ्याचे होणारे दुष्परिणाम मोठे असल्यानेच त्याला 'ब्रेन रॉट' असे नाव देण्यात आलेले आहे. याच्या संभाव्य धोक्यांपासून बचाव व्हावा म्हणून वेळीच पावले उचलणे महत्त्वाचे आहे, असेही मत जाणकार आग्रहाने प्रतिपादन करतात.

**'ब्रेन रॉट' रोखायचे कसे?**

आपल्या मेंदूपर्यंत पोहोचणाऱ्या वायफळ गोष्टी कशा पद्धतीने कमी करता येतील आणि निवडक परंतु महत्त्वाची उपयुक्त असणारी माहितीच मेंदूपर्यंत कशी पोहोचेल याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करणे यासाठी गरजेचे आहे. आपण जेव्हा मोबाइलच्या पडद्याकडे सातत्याने आणि दीर्घकाळ पाहणे कमी करू तेव्हा आपल्याला काही सकारात्मक बदल स्वत:मध्ये दिसू लागतील. त्यासाठी खालील काही गोष्टी करणे अत्यंत आवश्यक आहे, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

**'स्क्रीन टाइम'ची निश्चित मर्यादा**

इंटरनेट 'ब्राउझिंग', समाजमाध्यमांचा वापर, 'व्हीडिओ' पाहणे आणि 'ऑनलाइन गेमिंग' या सगळ्यामध्ये आपला किती वेळ जातो हे आधी तपासून पाहायला हवे आणि त्यानंतर हा वेळ नियोजनपूर्वक कमी कसा करता येईल याचा विचार करायला हवा. इंटरनेटवर किती वेळ दवडला जातो आणि त्यातील किती खरोखरच उपयुक्त असतो हे लक्षात येणे यासाठी महत्त्वाचे असते. एकदा हे लक्षात आल्यानंतर आता

मोबाइलच्या पडद्यावर आपण किती तास वेळ घालवायचा हे निर्धारित करणे गरजेचे आहे. आपले लक्ष विचलित करणारी ‘ॲप’ मोबाइलमधून उडवून टाकावीत. बातम्या आणि समाजमाध्यमांचे ‘ॲलर्ट’ देणारी ‘नोटिफिकेशन्स’सुद्धा बंद करून टाकावीत. झोपायला जाताना मोबाइलचा वापर करणे सक्तीने टाळावे. असा या संदर्भात तज्ज्ञांचा सल्ला आहे. जेव्हा ‘स्क्रीन टाइम’ निर्धारित केला जातो तेव्हा त्याचे सकारात्मक बदल आपोआपच दिसून येऊ लागतात, असे मानसोपचार तज्ज्ञांचे आग्रहाने सांगणे आहे.

**सतर्कता आणि सजगता महत्त्वाची**

अभ्यासकांच्या मते जी माहिती मेंदूपर्यंत पोहोचवली जाते आहे तिच्याविषयी आपण सतर्क आणि सजग असणे फार महत्त्वाचे आहे. सनसनाटी आणि नकारात्मकता पसरवणाऱ्या बातम्यांपासून जाणीवपूर्वक स्वत:ला दूर ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी बातम्या देणारे जे स्रोत आहेत जे डोळसपणे निवडणे गरजेचे आहे. एकूणच जगाविषयीचा संतुलित दृष्टिकोन तयार व्हायला त्यातून मदत होते. चीड निर्माण करणाऱ्या किंवा अस्वस्थता वाढवणाऱ्या बातम्या ज्या स्रोतांमधून पोहोचवल्या जातात अशा बातम्या पाहणे बंद करावे. चांगली प्रेरणा देणारी, व्यक्तिमत्त्वाला उन्नत करण्यास पोषक ठरणारी माहिती ज्या स्रोतांमधून पोहोचेल त्यांचा जरूर स्वीकार करावा आणि सकारात्मक बाबी पाहण्यावर भर द्यावा, असा सल्ला जाणकार देतात.

**पडद्यापलीकडचे जग अनुभवणे**

मोबाइल-‘लॅपटॉप’च्या पडद्यापलीकडेसुद्धा एक खूप मोठे जग आहे, ते अनुभवायला शिका, असे तज्ज्ञ या संदर्भात परोपरीने सांगतात. ज्यात आनंद मिळतो असे नवे छंद, नव्या आवडीनिवडी जोपासा, निसर्गाच्या सहवासात जा, संगीताचा आनंद घ्या, सामाजिक संस्थेसमवेत काम करून शक्य तितके सामाजिक योगदान द्या, व्यायाम करून शरीर सुदृढ करा, ज्या गोष्टी आनंद मिळवून देतात आणि मानसिक शांतता ज्यातून मिळते अशा गोष्टींचा शोध घ्या आणि त्या आवर्जून करा, थोडा तरी वेळ ध्यानधारणेसाठी राखून ठेवा, असे प्रतिपादन या क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ वारंवार करत आहेत.

**सकारात्मक विचारांच्या माणसांची साथसंगत**

सकारात्मक विचार करणाऱ्या आणि चांगल्या लोकांच्या सहवासात राहण्याचा प्रयत्न करा, असे अभ्यासक आवर्जून बजावतात. ‘ऑनलाइन’ भेटणाऱ्या माणसांपेक्षा प्रत्यक्षात भेटणारी माणसे अधिक मोलाची असतात. तेव्हा अशा माणसांना भेटण्याचा

प्रयत्न करा, त्यांच्याशी संवाद साधा, आपले अनुभवविश्व विस्तारण्याचाही प्रयत्न करा, असा तज्ज्ञांचा सांगावा आहे. सकारात्मक लोकांना भेटल्यामुळे आपले ताणतणाव खूप कमी होतात, असे अभ्यासातून समोर आले आहे. १८ ते २५ या वयोगटातील तरुणांना सकारात्मक ऊर्जेने जगणारी माणसे भेटतात तेव्हा त्यांच्यातील सकारात्मकताही वाढत जाते असे मानसोपचार तज्ज्ञांचे मत आहे.

**मनाची सक्षमता**

केवळ 'स्क्रोलिंग' करून वेळ दवडत बसून मेंदूवरचा ताण वाढवण्यापेक्षा नवी कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करा, असा अभ्यासकांचा सल्ला आहे. त्यातून मेंदूला नवी चालना मिळेल. ताणमुक्त असणारा मेंदू त्यांमुळे नवनवीन कल्पनांना जन्म देऊ शकेल. मेंदूचे व्यायाम करून तो अधिक सक्रीय, तलख कसा होईल या दिशेने जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत, असे अभ्यासकांचे सांगणे आहे.

**डिजिटल डिटॉक्स**

'डिजिटल' माध्यमांच्या वापरासाठी वेळेची मर्यादी निश्चित करणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे आपल्या मेंदूला पूर्णत: आराम देणेही गरजेचे असते. त्यामुळे त्यासाठी सर्व 'डिजिटल' वापर टाळून एक दिवस 'डिजिटल डिटॉक्स' घेण्याचा प्रयत्न करा, असे अभ्यासक सुचवितात. 'स्क्रीन'पासून दूर राहण्याचा संकल्प करावा. त्यामुळे मेंदूला आराम मिळतो आणि अनेक नव्या गोष्टी सुचू लागतात. नवे विचार मनात जन्म घेतात. चांगल्या सवयी लावून घेण्याची इच्छा निर्माण होते. त्यासाठी आठवड्यातून एकदा असा 'डिजिटल डिटॉक्स'देखील तितकाच महत्त्वाचा ठरतो, असे तज्ज्ञांचे अभ्यास सांगतात.

या आणि अशा उपायांद्वारे 'ब्रेन रॉट' या समस्येपासून बचाव करता येऊ शकतो. त्यामुळे योग्य वेळी उपाययोजना करून या धोकादायक समस्येपासून वाचण्याचा प्रयत्न करायला हवा, हा मानसोपचार तज्ज्ञांचा मोलाचा सला वेळीच लक्षात घ्यायला हवा. तो सर्वांच्याच हिताचा आहे.

# राजकीय अर्थकारण

## राजकारण आणि अर्थकारण यांचे सूत का जुळत नाही?

राजकारण आणि अर्थकारण यांचे सूर एकमेकांशी मिळत नाहीत कारण अर्थकारण आणि राजकारण या दोन क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्यांची विचारपद्धतीच निरनिराळी असते. राजकारण हे कायम तात्कालिकावर चालते आणि अगदी जवळच्या भविष्याचाच विचार करते. बहुपक्षीय स्पर्धात्मक राजकारण असणाऱ्या भारतासारख्या लोकशाहीमध्ये तर सत्तेवर असलेला कोणताही पक्ष आणि त्या पक्षाचा नेता पाच वर्षांच्या पलीकडे बघण्यास तयार नसतो. कारण, पुढील निवडणुकीमध्ये मतदारांचा कौल आपल्या पारडयाकडे झुकेलच याची त्याला खात्री नसते. त्यांमुळे, आपल्या कार्यकाळातच जे काही विकासप्रकल्प अथवा सर्वसामान्यांच्या कल्याणाचे उपक्रम सुरू करून ते पूर्ण होतील अशाच योजना राबविण्याकडे सत्ताधारी राजकीय नेतृत्वाचा सहज–स्वाभाविक कल राहतो. यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. सत्तारूढ सरकारने हाती घेतलेल्या लोककल्याणकारी प्रकल्पांची आखणी व अंमलबजावणी होऊन त्यांचे अपेक्षित असणारे फायदे सर्वसामान्यांना प्रत्यक्ष मिळायला लागले तरच मतदारांच्या पसंतीचा कौल त्या त्या सत्ताधाऱ्यांकडे झुकण्याचा संभव वाढतो. इथे आणखीही एक बाब लक्षात ठेवावी लागते. कोणत्याही देशातील समाजात आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेत जात, लिंगभाव, भाषा, प्रांत, व्यवसाय, उत्पन्न, मालमत्ताधारण, नैसर्गिक साधनसामग्री, शिक्षण अशांसारख्या निरनिराळ्या कारणांपायी स्तरीकरण अधिक आणि जास्त गुंतागुंतीचे असते अशा समाजव्यवस्थेत खऱ्या अर्थाने 'सर्वसमावेशक विकास' ही संकल्पना राबविणे अतिशय कठीण ठरते. याही पुढे जाऊन, समजा, तो देश लोकसंख्येच्या आकारमानानुसार अवाढव्य असेल तर, 'सर्वसमावेशक विकास' या संकल्पनेची व्याख्या करणेदेखील अशक्यप्राय ठरत जाते. कारण, कोणत्याही कारणामुळे संबंधित देशाच्या समाजात जे नाना प्रकारचे स्तर निर्माण झालेले असतात त्या प्रत्येक स्तरात समाविष्ट असणाऱ्या नागरिकांची

संख्या प्रचंड असते. त्यांमुळे, विकासाचे कितीही सर्वसमावेशक धोरण आखले तरी त्याच्या कक्षेतून, कारणपरत्वे, सुटून जाणाऱ्या नागरिकांची संख्या चांगल्यापैकी मोठी असते. कारण उत्पन्न, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक स्थान अशा विविध बाबतींत त्या स्तरांतील सदस्यांमध्येदेखील लक्षणीय फरक असतो. अशा नाराज नागरिकांची आणि पर्यायाने मतदारांची नाराजी ओढवून घेणे सत्ताधारी धोरणकर्त्यांना भाग पडते. त्यांमुळे, शक्यतो खूप ढोबळ, लवचीक आणि ज्याचे व्यवहारातील लाभ सर्वसामान्यांना लगोलग मिळू शकतील असे धोरण व त्यांत तसाच मोकळेपणा बहाल करणारे उपक्रम अंगीकारण्याकडे सत्ताधारी धोरणकर्त्यांचा कल राहत जातो.

अर्थकारणाचा स्वभाव असतो नेमका याच्याविरुद्ध. कल्याणकारी योजनांच्या आखणीसंदर्भात शासनसंस्थेला सल्ला देणाऱ्या अथवा मार्गदर्शन करणाऱ्या अर्थतज्ज्ञांना विकासाशी संबंधित कोणत्याही धोरणाच्या केवळ तात्कालिक परिणामांचा विचार करणे परवडत नाही. सर्वसामान्यांच्या कल्याणाचा सरासरी स्तर उंचावणारा एखादा विकासोपक्रम राबविण्यास सुरुवात झाल्यानंतर त्याचे दीर्घकालीन पडसाद काय संभवतात याचेही भान ठेवणे अर्थविषयक सल्लागारांना आवश्यक आणि अगत्याचे वाटते. कारण, आर्थिक विकासाच्या कोणत्याही कार्यक्रमाचे सगळे लाभ अथवा अपेक्षित फायदे तो उपक्रम चालू केल्यानंतर लगोलग सगळ्यांच्याच पदरात पडत नसतात, हे अर्थतज्ज्ञ उमगून असतात. कोणत्याही धोरणाचे बरेचसे परिणाम दीर्घकाळातच अनुभवास येतात. यामागे असणारे कारण अनेकदा नीट लक्षात येत नाही. नागरिकांच्या आर्थिक कल्याणासाठी शासनसंस्था जे काही धोरण आखते व राबविते त्याचे व्यवहारातील परिणाम हा प्रत्यक्षात दोन घटकांच्या आंतरक्रियेचा परिपाक असतो. शासनसंस्थेने जे काही धोरण आखलेले आहे त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारी यंत्रणा कितपत सक्षम आहे आणि त्यांनुसार तो कार्यक्रम कसा राबवला जातो, हा झाला त्या दोहोंतील पहिला घटक. तर, कोणत्याही योजनेची अंमलबजावणी चालू झाल्यानंतर समाजातील विविध घटकांकडून तिला कशा प्रकारचा प्रतिसाद मिळत राहतो त्यांवरही संबंधित कार्यक्रमाच्या वास्तव परिणामांचे रूप-स्वरूप अवलंबून राहते. आणि, या संदर्भातील सगळ्यांत मोठी आणि तितकीच सूक्ष्म बाब दडलेली आहे ती नेमकी इथेच. मुळात, समाजरचनेतच अनेकविध घटकांमुळे जे स्तरीकरण नांदत असते त्या प्रत्येक स्तरातील सदस्यांकडून शासनसंस्था राबवत असलेल्या विकासोपक्रमाला मिळत राहणारा प्रतिसाद एकसंध कधीच नसतो. तसेच, तो प्रतिसाद सर्व काळ एकसारखाच राहील, याचीही खात्री

देता येत नाही. समाजातील विविध घटक एकाच वेळी एकाच उपक्रमाला एकाच सघनतेने प्रतिसाद देतील असेही नाही. केवळ इतकेच नाही तर, एखादे कल्याणकारी धोरण कितीही शास्त्रशुद्ध विचार करून आखलेले असले तरी, व्यवहारात ते राबविल्यानंतर त्याचे लगोलग दिसणारे लाभ आणि दीर्घकालीन परिणाम हे एकसारखेच असतील याचीही हमी नसते. इथे आणखीही एक, म्हणले तर धोका, अनुस्युत असतो. त्याचे स्वरूप केवळ सैद्धान्तिकच नव्हे तर व्यावहारिकही आहे. तो असा की, शासनसंस्था ज्या वेळी लोककल्याणाचे एखादे धोरण आखते त्यांवेळी त्याला सर्वसाधारण समाजमन कशा प्रकारचा प्रतिसाद देईल आणि त्यांनुसार संबंधित धोरणाचे लाभ व्यवहारात काय असतील याची काहीएक खूणगाठ बांधलेली असते. परंतु, अनेकदा असेही होते की, समाजव्यवस्थेतील गुंतागुंतीपायी लोकमानस एखाद्या धोरणाला असा काही अतर्क्य प्रतिसाद देते की त्याची कल्पनादेखील त्या धोरणाच्या आखणीदरम्यान धोरणकर्त्यांना शिवलेली नसते. अशा अकल्पित, अनाहूत, अनपेक्षित परिणामांचे अर्थकारणातील विविध बाबींवर निरनिराळ्या पद्धतीने, मग, परिणाम संभवतात. अशा या सगळ्या गुंतागुंतीचे अवधान राखणे अर्थतज्ज्ञांना निकडीचे व अगत्याचे वाटते. परंतु, स्पर्धात्मक सत्तेच्या राजकारणाचे दडपण मानेवर सतत वागवणाऱ्या राजकीय नेतृत्वाला इतका बारीक विचार करणे परवडणारे नसते आणि त्यांबरहुकूम प्रत्येक धोरणाचे अंतरंग बारकाईने ठरवून त्याची तामिली करण्याइतका संयमही त्यांच्यापाशी नसतो.

व्यावहारिक तडजोड म्हणून, अशा परिस्थितीत मग, ‘सब घोडे बारा टक्के’ हे सूत्र अंगीकारून आखलेल्या उपक्रमांना, समाजव्यवस्थेमध्ये जात, व्यवसाय, शिक्षण, उत्पन्न, मालमत्ताधारण... अशांसारख्या नानाविध कारणांपायी नांदणाऱ्या विविधतेमुळे मिळणारा निरनिराळा प्रतिसाद टाळण्यासाठी प्रदेशनिहाय, व्यवसायनिहाय, आर्थिक व सामाजिक स्तरनिहाय निरनिराळी धोरणे आखावीत असा पर्याय सांगितला जातो. कागदोपत्री हा पर्याय आकर्षक वाटत असला तरी त्याची व्यावहारिक अंमलबजावणी प्रचंड अवघड शाबीत होते. अर्थकारणातील अगदी ढोबळ घटकांवरच (उदाहरणार्थ शेतकरी, लघुउद्योग, व्यापारी, नोकरदार, विद्यार्थी, महिला... इत्यादी) झोत राखणारी धोरणे जरी आखली तरी त्या धोरणांना त्या त्या समाजघटकांकडून मिळणारा प्रतिसादही एकसंध नसतो. कारण, एखादा घटक वरकरणी जरी एकसमान दिसला तरी पुन्हा उत्पन्न, मालमत्ताधारण, सामाजिक स्थान... अशांसारख्या बाबींमुळे त्यांत अंतर्गत स्तरीकरण असतेच. त्या त्या स्तरांत वा उपस्तरांत समावेश असणाऱ्या

सदस्यांची संख्यादेखील भरभक्कम असते. भौतिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक पार्श्वभूमीनुसार त्या घटकातील प्रत्येक सदस्य एकाच प्रकारच्या धोरणाला त्याच्या त्याच्या पद्धतीने प्रतिसाद देत राहतो. अशा प्रतिसादांची गोळाबेरीज मूळ धोरणाच्या अंमलबजावणीद्वारे अपेक्षित असणाऱ्या लाभांशी सुसंगत असते अथवा नसतेही. कारण, धोरण जरी सगळ्यांसाठी एकसमानच आखलेले असले तरी, संबंधित समाजघटकातील प्रत्येक सदस्यावर त्याचे होणारे परिणाम निरनिराळे असतात. ते परिणामही पुन्हा काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या पद्धतीने आकार घेत राहतात. आर्थिक कल्याणाचा कोणताही एखादा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाल्यानंतर त्याच्या लाभालाभांची समांतर पद्धतीने चाचपणी करण्यासाठी देखरेखीची यंत्रणादेखील कार्यान्वित केली जावी, असा आग्रह अर्थाभ्यासक धरत राहतात त्यांमागील कारण काही असेल तर ते नेमके हेच. अशा अभ्यासांमुळे धोरणांचे अंतरंग आणि अंमलबजावणीदरम्यानच्या त्रुटी यांत आवश्यक ते बदल व सुधारणा करणे शक्य बनते.

या संदर्भात एखादे ठोस उदाहरण घेतले की हा मुद्दा आणखी स्पष्ट होईल. खरीप आणि रबीच्या हंगामासाठी पीकपद्धतीबाबतचा निर्णय लावणी-पेरणीपूर्वी घेणे शेतकरीवर्गाला सोपे जावे, पीकपद्धती ठरविण्याबाबत त्याला काही दिशासूचन घडावे यासाठी निरनिराळ्या पिकांसाठी आधारभूत किमान किमती हंगामापूर्वी जाहीर करण्याचे धोरण शासनसंस्था आजवर अवलंबत आलेली आहे. शेतकरी वर्गाच्या दृष्टीने हे धोरण अतिशय संयुक्त आणि उपयोगी असले तरी सगळ्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ समन्यायी पद्धतीने मिळत राहतो असे अजिबात नाही. वरकरणी ‘शेतकरी’ हा जरी एक वर्ग दिसत असला तरी अंतर्गतरीत्या तो एकसंध नाही हे असे होण्यामागील मुख्य कारण होय. आपल्या देशातील शेतकरी वर्गाची रचना नीट अभ्यासली तर असे लक्षात येते की, सरासरी लागण क्षेत्र पाच एकरांच्या आतच असणाऱ्या शेतकरी कुटुंबांचे प्रमाण एकूणांत जवळपास ८० टक्के इतके अधिक आहे. लागवडीखाली जितके क्षेत्र येते त्यांपैकी जेमतेम ४० ते ४५ टक्के क्षेत्रालाच काय ती सिंचनाची हमी लाभलेली आहे. ही सरासरीदेखील देशपातळीवरची आहे. लागवडीखाली असलेल्या एकंदर क्षेत्रापैकी किती क्षेत्र ओलिताखाली येते त्याचे प्रमाण राज्याराज्यांत प्रचंड निरनिराळे आहे. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर, आपल्या देशाच्या शेतीक्षेत्रामध्ये लागवडीखाली येणाऱ्या एकंदर क्षेत्रापैकी जवळपास ५५ ते ६० टक्के लागवडक्षेत्र कोरडवाहू आहे. त्यांमुळे, शेतकरीवर्गामध्ये बहुसंख्य असणाऱ्या

अल्प व अत्यल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या उपवर्गाला आधारभूत हमीभावांच्या धोरणाचा व्यवहारात लाभ जवळपास मिळतच नाही. शेतकऱ्यांचा हा मोठा उपगट त्या धोरणाच्या लाभकक्षेच्या बाहेरच राहतो. असे का होते हे समजावून घेण्याचा प्रयत्न केला की, व्यवहारातील गुंतागुंत आणि एकाच समाजघटकासाठी आखलेल्या एकसमान धोरणाच्या लाभालाभांचे वाटप प्रत्यक्षात असमान पद्धतीने का व कसे घडून येते त्याचा उलगडा होण्यास मदत होईल.

शेतकरी त्याच्या रानात कोणत्याही वाणाचे जे उत्पादन काढतो ते सगळेच्या सगळे कधीच तो बाजारात विक्रीसाठी आणत नाही. हंगामामध्ये पदरात पडलेल्या एकंदर उत्पादनाचा काही भाग तो त्याच्या कुटुंबाच्या वापरासाठी राखून ठेवतो. उत्पादनाचा काही एक जरासा हिणकस अंश घरातील जनावरांच्या खाद्यासाठी वापरला जातो. उत्पादित वाणाचा काही हिस्सा वाहतुकीदरम्यान वाया जातो अथवा त्याची नासाठी तरी होते. उत्पादनापैकी चांगला निवडक भाग शेतकरी पुढील हंगामात पेरण्यासाठी बी-बियाण्यांच्या रूपाने राखून बाजूला ठेवतो. अशी सगळी वजावट एकंदर उत्पादनामधून झाल्यानंतर जो काही भाग शेतकऱ्यापाशी बाजारात विक्रीसाठी उरतो त्याला अर्थशास्त्रीय परिभाषेमध्ये 'विक्रीयोग्य अतिरिक्त उत्पादन' (मार्केटेबल सरप्लस) असे म्हणतात. आपल्या देशातील शेतकरीवर्गामध्ये बहुसंख्य असणाऱ्या अल्प व अत्यल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांची उत्पादकता अतिशय तोकडी असल्यामुळे त्यांच्या अल्पस्वल्प जमिनीमधून मिळणारे एकून उत्पादन मोजके असते आणि सगळी वजावट जाता या वर्गातील शेतकऱ्यांपाशी विक्रीयोग्य अतिरिक्त उत्पादन उरले तर मूठभरच उरते. आपल्या कुटुंबाच्या अन्नेतर बाकीच्या गरजा भागविण्यासाठी लहान शेतकऱ्यांना त्यांच्यापाशी असलेले विक्रीयोग्य मोजके अतिरिक्त उत्पादन, बहुतेक वेळा, सुगी झाल्या झाल्या लगेचच स्थानिक व्यापाऱ्याला तो देईल त्या बाजारभावाने विकून टाकावे लागते. कारण, आधारभूत हमीभाव शेतकऱ्यांना अदा करून धान्यखरेदीची शासकीय यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत थांबणेदेखील शेतकऱ्यांच्या या बहुसंख्य उपगटाला शक्य नसते. त्यांमुळे, उत्पादनप्रक्रियेशी संलग्न अशा सगळ्या संरचनात्मक (स्ट्रक्चरल) मर्यादांपायी अल्प व अत्यल्प भूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांना आधारभूत हमीभावांच्या कल्याणकारी योजनेचे व्यवहारात लाभ जवळपास मिळतच नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

अल्प व अत्यल्प भूधारक कोरडवाहू शेतकरीच केवळ नव्हे तर, शेतकऱ्यांपैकी अन्य काही घटकदेखील आधारभूत हमीभावाच्या उपक्रमापासून वंचित राहण्यामागील

दुसरे कारण आहे निखळ व्यवस्थात्मक. सुगीचा हंगाम सुरू होऊन नवीन धान्यधुन्य बाजारात आल्या आल्या त्या परिसरात आधारभूत हमीभावाला धान्य खरेदी करणारी शासकीय खरेदीयंत्रणा जर कार्यान्वितच नसेल तर स्थानिक खासगी व्यापारी मागेल त्या किमतीला जवळील विक्रीयोग्य अतिरिक्त उत्पादन त्याला विकून टाकण्याची हतबलता परिसरातील शेतकरीवर्गाच्या वाट्याला येते. सुगीच्या हंगामात एकदमच सगळे उत्पादन बाजारात आणले जात असल्यामुळे खासगी व्यापारी भाव पाडूनच खरेदी करतात. शेतकऱ्याला पर्यायच नसतो. अशा सगळ्या परिस्थितीत, शेतकरी वर्गापैकी तुलनेने मोठ्या, ज्यांच्याकडे मोठे लागणक्षेत्र आहे, ज्यांच्या जमिनींना सिंचनाची हमी लाभलेली आहे, ज्यांची उत्पादकता अधिक असल्यामुळे विक्रीयोग्य अतिरिक्त उत्पादन ज्यांच्यापाशी अधिक आहे अशा शेतकऱ्यांच्या उपगटालाच आधारभूत हमीभावांच्या कल्याणकारी शासकीय धोरणांचा लाभ मिळत राहावा, हे ओघानेच येते. त्यांमुळे, धोरणस्तरावर एकसंध गृहीत धरल्या जाणाऱ्या शेतकरी वर्गातील ही अंतर्गत दरी कायम राहते आणि हळूहळू रुंदावतदेखील जाते. बरेचदा असेही घडते की, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी हा अन्नधान्याच्या बाजारपेठेत एकदा 'उत्पादक' या नात्याने तर दुसरे वेळी 'ग्राहक' या नात्याने उतरत असतो. मुळात, उत्पादकता आणि एकंदर उत्पादन कमी असल्यामुळे अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यापाशी त्याच्या कुटुंबाची गरज वर्षभर भागवू शकेल इतके उत्पादन उरत नाही. कारण, तयार झालेल्या शेतमालाचा काही हिस्सा रोख रकमेची निकड भागवण्यासाठी त्याला खुल्या बाजारात विकावाच लागतो. कुटुंबाच्या अन्नधान्येतर गरजा भागवण्यासाठी लागणारा पैसा, अन्यथा, त्याने कोठून आणायचा? घरी पिकलेले धान्य वर्षातील सहा-आठ महिने वापरल्यानंतर उरलेला काळ त्याला बाजारातून खरेदी केलेले धान्यधुन्य वापरून कुटुंबाची गरज भागवणे क्रमप्राप्त बनते. सुगी केव्हाच संपलेली असल्यामुळे, त्या वेळी, खुल्या बाजारात अन्नधान्याचे बाजारभाव नेमके वाढलेले असतात. म्हणजे, वर्षाच्या एका टप्प्यावर पडलेल्या भावाने जवळचे विक्रीयोग्य तुटपुंजे अतिरिक्त उत्पादन खुल्या बाजारात विकायचे आणि वर्षाच्या दुसऱ्या टप्प्यावर खुल्या बाजारात चढलेल्या बाजारभावाने धान्य विकत घ्यायचे, अशा पद्धतीने शेतकऱ्यांचा हा उपवर्ग दोन्ही बाजूंनी नाडला जातो.

नानाविध कारणांमुळे अर्थव्यवस्थेत आणि समाजरचनेत नांदणाऱ्या स्तरीकरणामुळे शासनसंस्थेने कार्यान्वित केलेल्या आर्थिक विकासविषयक कोणत्याही कल्याणकारी धोरणाच्या लाभांचे व्यवहारातील वितरण कसे असमान प्रकारे होत राहते, हे या

एका उदाहरणावरून स्पष्ट व्हावे. व्यवहारातील आर्थिक तसेच सामाजिक गुंतागुंत अशी असल्यामुळे, राजकीय व्यवस्थेमधील नेतृत्व कोणत्याही प्रकारच्या कल्याणकारी योजनांचे प्रवर्तन करतेवेळी धास्तावलेले असते. या मानसिकतेचा थेट संबंध पोहोचतो निवडणुका जिंकण्यासाठी राजकीय पक्ष जी व्यूहरचना करतात तिच्याशी. विकासाच्या राजकारणाची भाषा सगळीकडेच ऐकू येत असली तरी, केवळ विकासाच्या मुद्यावर अथवा विकास कामे केली म्हणून निवडणुका जिंकता येत नाहीत, याबाबत सगळ्यांच पक्षांतील नेते ठाम दिसतात. या विरोधाभासाची संगती कशी लावायची, हा प्रश्न मग सगळ्यांनाच पडतो. त्याचे निराकरण, अर्थशास्त्रातील एका संकल्पनेशी आणि तिच्या व्यावहारिक उपयोजनाशी निगडित आहे. ती संकल्पना समजावून घेतली तर राजकारण आणि अर्थकारण यांच्यादरम्यानच्या तिढ्याचे काही प्रमाणात तरी आकलन होणे शक्य बनते. तसेच, जीवनाच्या या दोन अंगांमध्ये सक्रिय असणाऱ्यांची विचारप्रणाली परस्परांपेक्षा पूर्णत: निराळी आणि बहुतांशी विरोधी का असते याचा काहीसा अंदाज येतो.

समाजाच्या विकासासाठी अथवा नागरिकांच्या कल्याणासाठी आवश्यक असणारी साधनसामग्री ही कोणत्याही समाजात कोणत्याही काळी नेहेमीच मर्यादित मात्रेने उपलब्ध असते. लोकांच्या गरजा दिवसेंदिवस वाढत असतात आणि बदलतही असतात. अशा न संपणाऱ्या आणि दरदिवशी बदलणाऱ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी तुलनेने मर्यादित प्रमाणात उपलब्ध असणारी साधने पर्याप्तपणे वापरायची आणि सर्वसाधारण कल्याणाची सरासरी पातळी उंचावत राखायची, ही खरी बिकट बाब होय. अर्थशास्त्राचा गाभा, म्हणूनच, भिडलेला आहे तो वितरणाच्या आव्हानाशी. एकाच प्रकारची साधनसामग्री अनंत प्रकारच्या जिनसांचे उत्पादन करण्यासाठी वापरता येते. उत्पादनसाधनांची मालकी ज्यांच्याकडे असते असे समाजघटक आणि मर्यादित मात्रेने उपलब्ध असणाऱ्या साधनांचा वापर करून अगणित वस्तू व सेवांची निर्मिती करणारे उत्पादक परस्परांच्या संपर्कात येतात ते बाजारपेठेच्या माध्यमातून. नाना प्रकारच्या उत्पादनघटकांना असणारी मागणी आणि त्यांचा त्या त्या वेळी केला जाणारा पुरवठा यांच्या समीकरणाद्वारे खरेदी-विक्रीच्या माध्यमातून उत्पादनसाधनांच्या तौलनिक किमतींचे विशाल जाळे विणले जाते. हेच सूत्र लागू पडते तयार वस्तू व सेवांच्या मागणी-पुरवठ्याच्या घर्षणाद्वारे तिथे साकारणाऱ्या तौलनिक किमतींच्या जाळ्याच्या निर्मितीस. अर्थव्यवस्थेतील अनंत उत्पादक क्षेत्रांमध्ये जी मूल्यनिर्मिती होत राहते तिचे वितरण व हस्तांतरण बाजारपेठांच्या माध्यमातून

सतत घडत राहते. अशा हस्तांतरणाद्वारे अर्थव्यवस्थेत हितसंबंधांचेही एक गुंतागुंतीचे जाळे विणले जात राहते. देशातील नागरिक, उद्योग-व्यवसाय यांच्याप्रमाणेच शासनसंस्था ही देखील या जाळ्याचा एक घटक असते. उत्पादन साधने, वस्तू व सेवा, निर्माण झालेले मूल्य यांचे समाजव्यवहारातील वेगवेगळ्या घटकांमध्ये वाटप ज्या प्रमाणे बाजारपेठेच्या माध्यमातून घडत राहते त्याचप्रमाणे त्या वाटपास शासनसंस्थादेखील काही एक आकार व दिशा देत असते. या सगळ्या व्यवस्थेमध्ये शासनसंस्था ही स्वरूपत:च शाश्वत आणि व्यवहारत: सर्वशक्तिमान शाबीत होत असते. साहजिकच, साधनसामग्री आणि अर्थकारणात निर्माण झालेले मूल्य यांच्या वितरणामध्ये बाजारपेठेच्या जोडीनेच शासनसंस्थादेखील कळीची भूमिका बजावत राहते.

अर्थकारण आणि राजकारण यांच्या स्वभावभिन्नतेचे मूळ दडलेले आहे ते नेमके इथेच. वितरणाचे काम बाजारपेठेच्या माध्यमातून घडत राहते ते, ॲडम स्मिथ ज्याला 'अदृश्य हात' असे संबोधतात त्या, मागणी व पुरवठ्याच्या आंतरक्रियेद्वारे. उत्पादन साधने आणि/अथवा तयार झालेल्या ग्राहकोपयोगी वस्तू व सेवा यांचे वितरण बाजारपेठेच्या व्यासपीठावर घडून येते ते मागणी आणि पुरवठ्याचे तौलनिक रेटे प्रतिबिंबित करणाऱ्या तौलनिक बाजारभावांच्या जाळ्याद्वारे. ही सगळी प्रक्रिया मानवी चेहरा व अनुकूल-प्रतिकूल भावभावनांच्या सूत्राधारे प्रगटणारा स्वीकार-नकार यांविरहित सक्रिय राहते. या अर्थाने ती 'अ-मानवी' असते. तिथे निखळ सत्ता चालते ती क्रयशक्तीची. अर्थात, ज्या समाजव्यवस्थेमध्ये मुळात क्रयशक्ती अथवा आर्थिक शक्तीच विविध सहभागी घटकांमध्ये विषम पद्धतीने वाटली गेली असेल तिथे काय, असा प्रश्न इथे उद्भवतो. साधनसामग्रीचे आणि/अथवा क्रयशक्तीचे असे, कारणवशात अथवा परंपरेने झालेले केंद्रीकरण मोडीत काढण्याचे दोन मार्ग अर्थशास्त्र सांगते. बाजारपेठेमधील स्पर्धा अधिक सघन, तीव्र व बहुस्तरीय बनवून उत्पादन साधनसामग्रीचे आणि पर्यायाने वस्तू व सेवांच्या पुरवठ्याचे काहीच बड्या बलदंड उत्पादक अथवा उद्योजकांच्या हाती एकवटलेले केंद्रीकरण निष्प्रभ करणे, हा झाला त्यांतील एक मार्ग. तर, अर्थव्यवहारातील मूल्य, मालमत्ता, क्रयशक्ती, विकासाच्या संधी यांच्या, काही मूठभरांच्या हातात झालेल्या केंद्रीकरणाची शासनसंस्थेने उचित अशी वितरणविषयक प्रणाली राबवून वासलात लावणे, हा झाला दुसरा पर्याय अथवा मार्ग. विशुद्ध बाजारपेठीय व्यवहारांच्या माध्यमातून साधनसामग्रीचे, मूल्याचे जे वितरण अर्थव्यवस्थेत घडून येते ते, कोणत्याही प्रकारच्या मानवी प्रेरणांमधून निपजलेले आणि म्हणून संबंधित व्यक्ती अथवा/आणि समूहसापेक्ष

असेल याची शक्यता नसते. त्यांमुळे असे वितरण हे सर्वार्थाने पर्याप्त (ऑप्टिमल) असते, असे अर्थशास्त्र सांगते.

असे पर्याप्त वितरण आता व्यवहारात नांदते आहे, याची खूण काय असा प्रश्न कोणी उपस्थित केला तर त्याचेही निराकरण अर्थशास्त्रामध्ये सापडते. व्यवस्थेतील एकाही व्यक्तीच्या हिताला धक्का न लावता, कोणाच्याही समाधानास कणभरही कसर न लावता त्या व्यवस्थेतील एका व्यक्तीच्या जरी कल्याणात भर घालणे शक्य असेल तर त्या अवस्थेला पर्याप्त असे अर्थशास्त्र संबोधते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, अर्थकारणातील मूल्य असो, क्रयशक्ती असो अथवा संधी असोत, त्यांचे फेरवाटप करतेवेळी त्या व्यवस्थेतील एका जरी व्यक्तीच्या अथवा घटकाच्या समाधानाची हानी होत असेल तर त्या फेरवाटपाला अर्थशास्त्र 'पर्याप्त' अशी पदवी देऊ शकत नाही. वितरणाची अथवा वाटपाची ती स्थिती पर्याप्त म्हणा अथवा इष्टोचित समजली जाते. ही व्याख्या आणि हा संकेत विल्फ्रिडो पॅरिटो या इटालियन अर्थतज्ज्ञाने प्रतिष्ठित केल्यामुळे व्यवस्थेतील अशा पर्याप्ततेला 'पॅरिटो पर्याप्तता' (पॅरिटो ऑप्टिमॅलिटी) असे संबोधले जाते. मानवी आवड-निवड, स्वीकार-नकार, अनुकूल-प्रतिकूल पूर्वग्रह यांपासून अस्पर्शित अशा निखळ बाजारपेठीय व्यवहारांच्या आंतरक्रियांद्वारे अर्थकारणात साकारणारे वितरण-वाटप पॅरिटो ऑप्टिमल असते, हे अर्थशास्त्रातील एक पायाभूत प्रमेय होय.

राजकारण मात्र उलगडत राहते मानवी आशा-अपेक्षा आणि हितसंबंधांच्या प्रगटीकरणाद्वारेच. तिथे संघर्ष उभा ठाकतो हितसंबंधांचा. नागरिकांच्या आशा-अपेक्षांचे प्रतिनिधित्व तिथे करत असतात त्या त्या देशातील राजकीय व्यवस्थेत सक्रिय असलेले राजकीय पक्ष. प्रत्येक पक्षाचे जनाधार निरनिराळे असतात, पाठीराखे गट वेगवेगळे असतात. प्रसंगी दोन राजकीय पक्षांच्या पाठीराख्यांच्या हितसंबंधांचा व्यवहारात संघर्षही असतो. अगदी एकाच राजकीय पक्षाच्या एकाच पाठीराख्या गटाचे घटक असणाऱ्या समूह-उपसमूहांचे हितसंबंधदेखील परस्परांच्या विरोधात असणे, हेसुद्धा असंभवनीय नसते. असे विरोधी अथवा एकमेकांना छेद देणारे हितसंबंध असणाऱ्या समाजव्यवस्थेत काही एक मतैक्य घडवून आणणे हा राजकारणाचा प्राण असतो. किंबहुना, राजकारणाचा हेतूही तोच असतो. वेगवेगळे आणि प्रसंगी परस्परविरोधी हितसंबंध जपणाऱ्या पाठीराख्या गटांच्या पाठिंब्यावर जेव्हा एखादा पक्ष सत्तेवर येतो तेव्हा विसंवादी हितसंबंधांची मोट जुळवण्याची कसरत त्याला करावी लागते. बहुपक्षीय स्पर्धात्मक राजकारणाचे रूप-स्वरूप हे

असेच असते. ज्यांनी आपल्याला निवडून दिलेले आहे त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करण्याचा दबाव सत्तेवर आलेल्या प्रत्येकच सरकारवर असतो. त्यासाठी मग नाना प्रकारच्या कल्याणकारी उपक्रमांची, योजनांची आखणी व अंमलबजावणी करावी लागते. सत्तेवर आल्यानंतर आम्ही कशा प्रकारचे कार्यक्रम राबवू आणि त्या कार्यक्रमांमागील आमची विकासविषयक भूमिका काय असेल याचे प्रगटीकरण निवडणुकीच्या राजकारणात उतरलेल्या राजकीय पक्षांच्या निवडणूक जाहिरनाम्यांत होत असते अथवा होणे अपेक्षित असते. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सत्ता हातात येताच सत्तारूढ राजकीय पक्ष मग आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी धोरणे व कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करण्याच्या तयारीस लागतो. सगळा पेच एकवटलेला आहे व असतो तो नेमका इथेच!

कोणत्याही समाजव्यवस्थेत व अर्थकारणात कायमच हितसंबंधांचे जाळे कार्यरत असते. अधिकार, विशेषाधिकार, मालमत्ता, क्रयशक्ती, विकासाच्या संधी, साधनसामग्रीचे वाटप, संपत्तीचे वितरण काही एक स्वरूपात प्रत्येकच व्यवस्थेमध्ये नांदत असते. सत्तारूढ सरकार ज्या वेळी त्याला लाभलेल्या जनाधाराची बूज राखण्यासाठी काही एक विकासोपक्रम आखते त्यांच्या अंमलबजावणीद्वारे, अगदी स्वाभाविकपणेच, पूर्वप्रस्थापित हितसंबंधांच्या जाळ्यामध्ये बदल घडून येतात अथवा बदलाव येणे संभवते, शक्य बनते. म्हणजेच, अगदी सरळ शब्दांत बोलायचे तर, सत्तेवर असलेला कोणताही राजकीय पक्ष कोणत्याही प्रकारच्या कल्याणकारी उपक्रमाद्वारे प्रस्थापित व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करत असतो. अशा हस्तक्षेपामुळे पूर्वस्थापित हितसंबंधांचा तोल बदलावा, हे ओघानेच येते. व्यवस्थेत प्रस्थापित झालेल्या हितसंबंधांच्या पटाची फेरमांडणी चालू झाली की त्याबरोबरच, साधनसामग्री, क्रयशक्ती, संधी, संपत्ती, मालमत्ता यांचे फेरवाटप आपसूकच गती पकडते. अशा फेरमांडणीद्वारे व्यवस्थेमध्ये अगदी सहजपणे दोन गट उभरून येतात.

नव्याने अंमलात आणल्या गेलेल्या अथवा जाणाऱ्या फेरवाटपाचे 'लाभार्थी' आणि 'बळी' असे ते दोन गट होत. फेरवाटपाद्वारे नव्याने साकारणाऱ्या हितसंबंधांच्या सारीपटाचे लाभार्थी धोरणांचे स्वागत करतात तर, पूर्वस्थापित लाभांवर कुरघोडी झाल्यामुळे नवव्यवस्थेचे जे बाधित बळी असतात ते नवीन धोरणांना विरोध करतात. कोणत्याही नवीन धोरणापायी मुळात त्या संबंधित व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असलेला तोल ढासळण्याचा हा अनिवार्य परिपाक ठरतो. एखाद्या नवीन विकासोपक्रमाद्वारे समाजव्यवस्थेत शासनसंस्थेने हस्तक्षेप करण्यापूर्वी लाभालाभांचे जे काही जाळे तिथे नांदत असते त्या जाळ्याची पुनर्मांडणी नवीन धोरणाद्वारे घडून येणे अपरिहार्यच

असते. त्यांमुळे, नवीन धोरण अंमलात येण्यापूर्वी तिथे लाभ आणि हानीचा जो काही तोल विद्यमान असतो त्याचा चेहरामोहराही नवीन प्रकल्पांची अंमलबजावणी झाल्यानंतर पालटावा, हे ओघानेच येते. त्या व्यवस्थेतील पूर्वस्थापित तोल अथवा हितसंबंधांचा नकाशा पॅरिटोप्रणीत पर्याप्ततेच्या कसोटीस उतरणारा होता अथवा नाही, हा प्रश्न अगदी निराळा. कदाचित तो पॅरिटोप्रणीत पर्याप्ततेबरहुकूम नसेलही (तो तसा नसण्याचीच शक्यता व्यवहारात सर्वाधिक बळकट संभवते). परंतु, सत्तारूढ सरकारने राबविलेल्या धोरणापायी नव्याने साकारणारे हितसंबंधांचे जाळे, निदानपक्षी, पॅरिटोप्रणीत पर्याप्ततेच्या कसोटीकडे वाटचाल करण्याचे सूचन करणारे तरी असावे, अशी किमान अपेक्षा मग व्यावहारिक तडजोड म्हणून स्वीकारणे भाग पडते.

म्हणजे, आता या ठिकाणी प्रश्न तयार होतो तो, नव्याने अंमलात आलेल्या एखाद्या धोरणाचे जे लाभ व्यवहारात उमटतात त्यांचे वाटप संबंधित धोरणाचे 'लाभार्थी' आणि 'बाधित' या दोन गटांदरम्यान पॅरिटोप्रणीत पर्याप्ततेच्या सूत्राचा हात धरून कशा प्रकारे घडवून आणायचे, हा. पर्याप्त वाटपासंदर्भातील पॅरिटोप्रणीत सैद्धान्तिक सूत्र व्यवहारात तसेच्या तसे उतरवणे बहुश: दुरापास्तच शाबीत होते. त्यांमुळे, एक निखळ व्यावहारिक तडजोड म्हणून पॅरिटो यांनी पर्याप्त वाटपासंदर्भात सिद्ध केलेल्या सैद्धान्तिक कसोटीचा एक श्लेष प्रत्यक्षात वापरला जातो. पॅरिटो यांनी प्रतिपादन केलेल्या सैद्धान्तिक सूत्राचे उपयोजन घडवून आणण्यासाठीची ती व्यवहार्य अशी तडजोड ठरते. शासनसंस्था ज्या वेळी एखादे नवीन धोरण अंमलात आणते तेव्हा त्या धोरणाचे व्यवहारात जे लाभ उत्पन्न होतात त्यांचे लाभार्थी त्या धोरणापायी खूष असतातच. मात्र, ज्या समाजघटकांच्या हिताची नवीन धोरणापायी काही ना काही हानी झालेली आहे त्याची भरपाईदेखील नवीन धोरणाच्या लाभांचा काही एक अंश त्यांच्यापर्यंत पोहोचता करून केली जाणे केवळ उचितच नाही तर आवश्यकही ठरते. शासनसंस्थेने जारी केलेल्या नवीन धोरणाच्या व्यवहारात निष्पन्न झालेल्या लाभांची मात्रा अथवा आकारमान या ठिकाणी महत्त्वाचे ठरते. नवीन धोरणाचे लाभ पदरात पडलेल्या लाभधारकांनी त्यांना मिळालेल्या लाभांचा काही हिस्सा संबंधित धोरणाचे जे बळी ठरलेले आहेत अशा धोरणबाधितांकडे हस्तांतरित करून, नवीन धोरणाच्या तामिलीपायी बाधितांना पाणी सोडाव्या लागलेल्या त्यांच्या समाधानाची/हिताची भरपाई होईल इतपत नवीन धोरणाच्या अंमलबजावणीद्वारे निर्माण होणाऱ्या लाभांचे प्रमाण भरघोस असेल तर, शासनसंस्था नव्याने राबवत असलेल्या धोरणापायी समाजव्यवस्थेत निर्माण होणारे नव-वास्तव 'संभाव्य पॅरिटोपर्याप्त' शाबीत होते, असे हे सूत्र सांगते. म्हणजेच, इथे दोन्ही बाजूंचा रास्त

विचार अपेक्षित आहे. नवीन धोरणाच्या लाभार्थींच्या समाधानाची वा हिताची मात्रा एकीकडे उंचावत असतानाच, धोरणग्रस्त बाधितांच्या धोरणपूर्व समाधानाची अथवा हिताची मात्रा खचू नये याची दक्षता हे मार्गदर्शक सूत्र घेते.

शासनसंस्थेने प्रवर्तित केलेल्या विकासविषयक कोणत्याही नवीन धोरणाचे समर्थन 'संभाव्य पॅरिटो पर्याप्तप्रणीत वास्तवा'चा निकष वापरून अर्थकारणाच्या कसोटीवर बिनतोड शाबीत होते. परंतु, राजकारणात मात्र लाभांचे हे वाटप सिद्धान्ताच्या शास्त्रशुद्ध काट्याबरहुकूम कधीच व्यवहारात उतरत नाही. त्याचे कारण विशुद्ध मानवी आहे. माणसाचा स्वार्थ कमालीचा बळजोर असतो, हे ते कारण! कोणत्याही नवीन धोरणाचे लाभधारक त्यांच्या पदरात पडलेल्या लाभांचा काही हिस्सा आपखुषीने धोरणग्रस्त बाधितांकडे हस्तांतरित करण्यास तयार नसतात अथवा होत नाहीत. अशा वेळी, मग, 'संभाव्य पॅरिटोप्रणीत पर्याप्त वास्तव' व्यवहारात उतरावे यासाठी पुन्हा शासनसंस्थेलाच सक्रिय बनावे लागते अथवा लागेल. नवीन विकासोपक्रमाच्या लाभार्थींच्या पदरात जमा झालेल्या लाभांचा काही भाग, त्या धोरणाच्या तामिलीपायी ज्यांच्या हिताची अथवा समाधानाची हानी झालेली आहे अशा बाधितांकडे हस्तांतरित करण्यासाठी उचित अशी व्यवस्था वा यंत्रणा जारी करून ती नेटकेपणे राबवणे मग शासनसंस्थेला क्रमप्राप्त ठरते. परंतु, हे काम सोपे नसते. कारण, आपले काही तरी हिरावले गेल्याचा डंख बाधितांच्या मनात खोलवर रुजलेला असतो आणि आपल्याला मिळालेल्या लाभांपैकी काही हिश्श्याला आपण मुकणार ही जाणीव लाभधारकांना नाखूष करणारी असते. त्यांमुळे, अर्थकारणाच्या कसोटीवर तर्कनिष्ठ शाबीत होणारे 'संभाव्य पॅरिटोप्रणीत पर्याप्त वास्तव' व्यवहारात उतरविण्यासाठी नवीन धोरणाचे लाभार्थी आणि बळी यांची काही ना काही नाराजी ओढवून घेणे राजकारणाच्या क्षेत्रात मात्र जोखमीचे ठरते. विशेषत:, ज्या समाजव्यवस्थेत आणि साहजिकपणेच अर्थव्यवस्थेतही प्रचंड स्तरीकरण असते, उत्पन्न, मालमत्ता, साधनसामग्री, विकासाच्या संधी अशांचे वाटप ज्या व्यवस्थेमध्ये मुळातच असमान असते, जिथे बहुपक्षीय राजकीय व्यवस्थेमध्ये वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांदरम्यान प्रत्येक मताचे मोल निर्णायक ठरत राहते अशा वातावरणात मतदारांच्या कोणत्याही लहान-मोठ्या गटाचा रोष पदरात घेणे कोणत्याच नेत्याला परवडणारे नसते. त्यांमुळे, एकीकडे विकासाचे प्रकल्प हाती तर घेतले पाहिजेत, लोककल्याणकारी नवीन धोरणांची आखणी तर केलीच पाहिजे याचा रेटा आणि अशा नवीन धोरणांद्वारे समाजव्यवहारात शासनसंस्थेचा जो हस्तक्षेप घडून येतो त्यांपायी साकारणाऱ्या लाभ-हानीच्या नवीन नकाशापायी

नाराज होणाऱ्या संबंधित लोकसमूहांच्या रोष अंगावर येण्याचा धसका, यांच्या चिमटीत स्पर्धात्मक राजकारणातील नेतृत्वाला शासनसंस्थेचा गाडा हाकावा लागतो.

खास करून धरणे व कालव्यांची निर्मिती, विद्युतप्रकल्पांची उभारणी, रस्ते व महामार्गांची बांधणी अशांसारखे, जिथे जमिनींचे अधिग्रहण मोठ्या प्रमाणावर करणे अपरिहार्य असते, विकास प्रकल्प एक तर प्रचंड रेंगाळण्यामागे अथवा सुरुवात होऊन अर्धवट राहण्यामागे मुख्य कारण काही असेल तर नेमके हेच. विकासप्रकल्पांसाठी सक्तीने भूसंपादन करावे तर त्यापायी होणारा लोकविरोधाचा उद्रेक, प्रसंगी, हिंसक बनण्याची भीती. दुसरीकडे, संपादन केलेल्या जमिनींचा पैशाच्या स्वरूपात अदा केला जाणारा मोबदला प्रकल्पबाधितांपैकी कोणालाच पुरेसा व रास्त वाटत नसतो. ज्या प्रकल्पांपायी जंगलसंपत्तीला कसर लागणार असते अशा प्रकल्पांसंदर्भात पर्यावरणीय संतुलनाचे जटिल प्रश्न उभे ठाकतात. पर्यावरणाचे संरक्षण केले जावे यासाठी दक्ष असणाऱ्या व त्या संदर्भात, प्रसंगी, न्यायव्यवस्थेचे दरवाजे ठोठावण्यास सिद्ध असलेल्या घटकांची नाराजी ओढवून घेण्याची जोखीम टाळण्याकडेच बहुतेकांचा कल राहतो. ज्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीस प्रदीर्घ कालावधी लागणार असतो असे प्रकल्प तर, धोरणकर्त्यांच्या लेखी अधिकच संवेदनशील ठरतात. कारण, अशा प्रकल्पांचे जे बाधित बळी असतात त्यांच्या हिताची अपरिहार्य असणारी हानी थेट व ताबडतोबीची असते. प्रकल्पाचे अपेक्षित लाभ मात्र भविष्यात साकारणारे असतात. 'संभाव्य पॅरिटोप्रणीत पर्याप्त वास्तव' व्यवहारात उतरले तर कोणत्याही नवीन धोरणाचे लाभार्थी व बाधित यांच्या धोरणपूर्व लाभ-हानीचे समीकरण धोरणाच्या अंमलबजावणीपश्चात अधिक व्यस्त न बनता निदान त्याच्या पूर्वपदावर शाबूत राखणे सैद्धान्तिक पातळीवर शक्यतेच्या कोटीतील दिसते. कारण, हे निखळ गणिती सूत्र आहे. परंतु, नानाविध मानवी भावना-अपेक्षांच्या कल्लोळांनी गजबजलेले समाजवास्तव आणि त्याचे व्यवहार गणिती सूत्राबरहुकूम चालत नसतात. अर्थशास्त्राच्या चौकटीत जे प्रतिपादन पायाशुद्ध आणि म्हणून निर्विवाद गणले जाते ते राजकीय स्पर्धेच्या रणधुमाळीत उदंड वादांचे मूळ ठरण्याच्या शक्यता राजकीय नेतृत्व चांगल्यापैकी उमजून असते. केवळ विकासकामे करून निवडणुका जिंकता येत नाहीत, हे राजकारणाच्या क्षेत्रातील धुरिणांचे अनुभवसिद्ध प्रमेय, अर्थतज्ज्ञ ज्याला अनुसरतात ते शास्त्र आणि कमालीच्या स्पर्धात्मक बहुपक्षीय व्यवस्थेत सत्तेचे राजकारण करणाऱ्या राजकीय धुरिणांना ज्याचे भान अहोरात्र जपावे लागते असा राजकीय लोकव्यवहार, यांच्यादरम्यानच्या झटापटीद्वारे सिद्ध होत राहते. अर्थकारण आणि राजकारण यांचे सूत एकमेकांशी न जुळण्याची मुख्य मेख दडलेली आहे अथवा असावी ती इथेच. ■■

# राजकीय अर्थकारण

## स्वार्थ, लोककल्याण आणि राजकीय प्रक्रिया

आपण निवडून दिलेले आपले प्रतिनिधी नेमक्या कोणाच्या कल्याणासाठी तत्पर राहतात, हा प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेमधील मतदार नागरिकांना नेहेमी पडणारा एक प्रश्न. वेगवेगळ्या समूहांच्या हितसंबंधांची मोट बांधण्याचे कौशल्य हे राजकीय प्रांतात सक्रिय असणाऱ्या राजकारणपटूंचे मुख्य वैशिष्ट्य आपण गणतो. तरीदेखील, सत्तेच्या दोऱ्या हाती घेतलेले नेते नेमके कोणाचे हितसंवर्धन करणारी धोरणे व विकासाचे कार्यक्रम राबवत राहतात, हे अचूक समजणे व्यवहारात, अशक्य जरी नसले तरी, सर्वसामान्यांना चांगल्यापैकी दुरापास्त ठरते. आपले प्रतिनिधित्व करणाऱ्यांनी आपल्या कल्याणाची चिंता वाहावी, समाजातील विविध स्तरांच्या सर्वसाधारण कल्याणाची पातळी सतत उंचावत राहील याची तजवीज करणारी धोरणे व कार्यक्रम कार्यक्षमपणे राबवावेत, अशी आपली अपेक्षा असते. लोकप्रतिनिधींनी योजलेल्या जनकल्याणकारी योजनांची अंमलबजावणी प्रशासनाने कार्यक्षमपणे करावी, अशीही आपली प्रशासकीय अधिकारी व त्यांच्या हाताखाली राबणारी यंत्रणा यांच्याकडून अपेक्षा असते. त्यांपैकी काही अपेक्षा पूर्ण होतात तर काही नाही. पूर्तता न झालेल्या अपेक्षांचे प्रमाणच बहुतेक वेळा मोठे असते. लोकप्रतिनिधी जी धोरणे आखतात त्यांचे रूप-स्वरूप बघितल्यानंतर, ही धोरणे व कार्यक्रम नेमके कोणाच्या कल्याणासाठी तयार केलेले आहेत, असाही प्रश्न आपल्याला सतावतो. निवडणुकांना सामोरे जाणाऱ्या राजकीय पक्षांनी निवडणुकी पूर्वी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यांपैकी किती प्रकल्प व योजना सत्ता मिळाल्यानंतर कार्यान्वित केल्या याचा लेखाजोखा तर नागरिक कधीच मांडत नाहीत. जाहीरनाम्यात नमूद परंतु केवळ त्या चोपड्याच्या कागदांवरच राहिलेल्या योजनांचे काय झाले, अशा प्रकारचे प्रश्न विचारण्याचा अवकाशदेखील प्रातिनिधिक लोकशाहीमध्ये मतदारांना कमीच असतो. त्यांमुळे, मतपेटीद्वारे निवडून दिलेले सरकार आपले असले तरी

आपल्याला अपेक्षित असणारे विकासोपक्रम ते राबवेलच याची खात्री नसते, अशी खूणगाठ प्रत्यक्षातील राजकीय व्यवहाराद्वारे निराशा पदरात पडलेले तुम्ही-आम्ही मनाशी बांधत राहतो.

राजकारण आणि राजकारणी यांच्याबाबत आपल्या मनात आपणच तयार केलेली प्रतिमा आणि तिच्यापायी त्यांच्याकडून असलेल्या आपल्या अपेक्षा या स्वप्नाळू, आदर्शवादी असल्यामुळेच निराशा पदरी पडते असे जेम्स बुकनन या अमेरिकी अर्थवेत्याने केलेले खणखणीत प्रतिपादन पचनी पडले तर एकंदरच राजकीय प्रक्रियेकडे बघण्याची आपली दृष्टी अधिक वास्तव बनावी. लोकशाही राज्यप्रणालीच्या कारभाराला राज्यघटनेचे अधिष्ठान लाभलेले असले तरी, राज्यघटनेच्या मार्गदर्शक चौकटीमध्ये साकारणारी प्रत्यक्ष व्यवहारातील राजकीय प्रक्रिया मात्र कंत्राटी स्वरूपाची असते हे निखळपणे सांगून, अर्थ-राजकीय निर्णयप्रणालीबाबत सगळ्यांच्या नजरा साफ आणि वास्तववादी बनविल्याबद्दल नोबेल पारितोषिकाद्वारे बुकनन यांचा बहुमान १९८६ साली करण्यात आला. अमेरिकेतील टेनिसी या राज्यात जन्माला आलेल्या बुकनन यांनी त्यांची बहुतांश व्यावसायिक कारकीर्द व्हर्जिनिया, टेनिसी, फ्लोरिडा व लॉस एन्जेलिस विद्यापीठांत व्यतीत केली. सार्वजनिक जीवनात अथवा सामाजिक जीवनासंदर्भात केल्या जाणाऱ्या निवडीवर कोणते घटक प्रभाव पाडत असतात, सर्वसामान्य जनता तिच्या पसंतीची निवड (पब्लिक चॉइस) नेमकी कशी करते यांबाबतचे संशोधन व चिंतन हा बुकनन यांच्या चिरंतन औत्सुक्याचा प्रांत राहिला.

सार्वजनिक वित्तव्यवहाराचे (पब्लिक फायनान्स) अभ्यासक असलेल्या बुकनन यांच्या करप्रणाली व शासकीय खर्च या दोन विषयांसंदर्भातील निरीक्षणे व अध्ययन-संशोधन यांतून सार्वजनिक निर्णयासंदर्भातील सैद्धान्तिक प्रारूप साधारणपणे १९५०च्या दशकात आकाराला आले. व्यक्तीच्या स्वाभाविक वृत्ती आणि त्यांनुसार घडणारे तिचे वर्तन, व्यक्ती तिच्या रोजच्या जगण्यात जे निर्णय घेते, ज्या प्रकारे ती निवड करते ...अशांसारख्या बाबींच्या मुळाशी असणाऱ्या मूलभूत प्रेरणांचे संदर्भ बुकनन यांनी राजकीय प्रक्रियेचे सम्यक् आणि वस्तुनिष्ठ, कोणत्याही प्रकारच्या स्वप्नाळू, आदर्शवादी, रंजित धारणांपासून मुक्त, असे आकलन करून घेण्यासाठी अंगीकारले. राजकीय घटितांमागील निर्णयप्रक्रियेचे, ते निर्णय घेण्यात सहभागी असणाऱ्या राजकारणी व्यक्तींच्या वर्तनाचे,राजकारणाच्या प्रांतातील निर्णयांचे, ते ते निर्णय घेतले जाण्यामागील प्रेरणांचे विश्लेषण करण्यासाठी बुकनन यांनी अर्थशास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रात उपयोजण्यात येणाऱ्या अभ्यासपद्धतींचा अवलंब केला.

लोकशाही प्रणालीमध्ये वावरणारे मतदार नागरिक, राजकीय क्षेत्रातील नेते आणि प्रशासनात कार्यरत असणारे घटक यांच्या निर्णयप्रक्रिया राजकीय चौकटीमध्ये कशा आकार घेतात यांचा अभ्यास हा बुकनन यांनी प्रवर्तित केलेल्या सार्वजनिक निर्णयविषयक सिद्धान्तनाचा गाभा होय ('पब्लिक चॉइस' या संकल्पनेसाठी या ठिकाणी पुढे 'सामाजिक निवड', 'सार्वजनिक निवड' अथवा 'सार्वजनिक पसंती' अशी शब्दसंहती आलटून-पालटून वापरलेली आहे). राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या दोन ज्ञानशाखांमधील तत्वे, सिद्धान्त, पद्धती आणि गृहीतके यांचा संयुक्त विनियोग बुकनन यांनी सार्वजनिक निवडीबाबतचे सिद्धान्तन सिद्ध करताना केला. खुल्या बाजारपेठीय व्यवस्थेमध्ये सर्वसामान्य मनुष्य जे निर्णय घेतो त्यांचा अन्वय लावण्यासाठी अर्थशास्त्रामध्ये वापरले जाणारे संकेत बुकनन यांनी हाताशी घेतले. व्यक्तिगत स्तरावरील निर्णय घेत असताना अथवा व्यक्तिगत आयुष्यात निवड करतेवेळी संबंधित व्यक्तीच्या विचारांची दिशा आणि निर्णय घेण्यामागील आद्य व मुख्य प्रेरणा यांबाबत अर्थशास्त्र जे गृहीतक मांडते तेच गृहीतच बुकनन सार्वजनिक पातळीवर समूहांद्वारे केल्या जाणाऱ्या निवडींचे व त्यांच्या परिणामांचे आकलन करून घेण्यासाठी वापरतात. लोकशाही राज्यव्यवस्थेतील मतदार नागरिक, मतदारांच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव पाडणारे समाजातील प्रभावगट आणि त्यासाठी राबवली जाणारी प्रचारयंत्रणा अशा घटकांच्या वर्तनाचे आकलन करून घेणे हा बुकनन यांचा त्यांमागील हेतू होता. स्वत:च्या स्वार्थाचे, स्वहिताचे संरक्षण-संगोपन करणे ही कोणताही निर्णय घेणाऱ्या व्यक्तीची त्या निर्णयाच्या मुळाशी असणारी निसर्गदत्त आणि आदिम प्रेरणा असते. राजकीय प्रक्रियेत सहभागी असलेले विविध घटक, त्या प्रक्रियेमध्ये घेतले जाणारे निर्णय आणि निर्णयांमागील प्रेरणा यांचे विश्लेषण करण्यासाठी बुकनन नेमक्या याच प्रेरणेचा संदर्भ अथवा आधार घेतात. त्यांमुळे, 'स्वप्नाळूपणाचा अभाव असणारे राजकारण म्हणजे सामाजिक निवड' अशी तर्ककठोर व्याख्या बुकनन मांडतात ती त्याच प्रेरणेचा संदर्भ देत.

राजकारणी लोक व नेतेमंडळी जनतेला नाना प्रकारची आश्वासने देत असतात. समाजाच्या व्यापक आस्थेच्या विषयांशी ती आश्वासने समकक्ष असल्याचे वरकरणी भासते व दिसते तरी. परंतु, बुकनन यांच्या प्रतिपादनानुसार तो असतो केवळ वरवरचा पापुद्रा. परंतु, तो पातळ पडदा दूर सारला की त्यांखाली दडलेल्या खऱ्या प्रेरणांचे दर्शन घडते. ती आश्वासने देणाऱ्याच्या मनाच्या तळाशी केवळ त्याचेच काय ते हित साधण्याचा हेतू घट्टपणे बसलेला असतो, असे विश्लेषण बुकनन

मांडतात. तेच सूत्र राजकीय प्रक्रियेद्वारे निपजणाऱ्या निर्णयांनाही लागू पडते. कोणताही राजकीय निर्णय वरकरणी कितीही लोककल्याणकारक दिसला तरी त्याची उत्पत्ती तो निर्णय घेणाऱ्याच्या मनात दडलेल्या स्वार्थसाधनाच्या छुप्या प्रेरणेमधूनच झालेली असते. राजकीय निर्णय घेणारे घटक केवळ त्यांचेच हित अथवा स्वार्थ सर्वोच्च मानत असतात आणि ते स्वार्थसाधन हा कोणत्याही निर्णयामागील प्रथम प्राधान्याचा हेतू राहतो, हे बुकननप्रणीत सामाजिक निवडीच्या सिद्धान्ताचे आद्य व गाभा प्रमेय होय.

राजकीय प्रक्रियेच्या माध्यमातून शासनसंस्थेने घेतलेल्या आर्थिक अथवा वित्तीय निर्णयांची चिकित्सा करणे हे राजकीय अर्थशास्त्राचे एक मुख्य अंग व कार्य होय. कोणत्याही प्रकारच्या राजकीय निर्णयांच्या फलश्रुतीची निष्पत्ती न्याहाळत तिची राजकीय अर्थशास्त्राच्या चौकटीत समीक्षा करण्यास सरसावणाऱ्या अर्थपंडितांना बुकनन अगदी प्रारंभीच एक आवाहन करतात. ते आवाहन आहे आत्मपरीक्षणाचे. शासनसंस्थेच्या माध्यमातून प्रवर्तित करण्यात आलेल्या कोणत्याही धोरणाचे अथवा शासनसंस्थेला कार्यान्वित करणाऱ्या राजकीय प्रक्रियेमध्ये कर्तेपणाची भूमिका निभावणाऱ्या घटकांनी घेतलेल्या निर्णयांची चिकित्सा करण्यापूर्वी; शासनसंस्था आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असणारे घटक यांच्यासंदर्भातील आपल्या धारणा, आपली समज, त्यांचे वर्तन आणि त्या त्या कृतीच्या मुळाशी असणाऱ्या प्रेरणा यांबाबत आपण मांडत असलेली गृहीतके प्रथम आपण निर्लेप वृत्तीने तपासून बघावीत, हे बुकनन करत असलेले आवाहन अतिशय सूक्ष्म व मूलगामी असेच आहे. राजकीय व्यवस्थेने आखलेल्या आणि अंमलात आणलेल्या धोरणांचे विश्लेषण करण्यापूर्वी राजकीय अर्थशास्त्राच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांनी, शासनसंस्थेचे स्वरूप, तिचे कामकाज आणि त्यांमागील प्रेरणा यांबाबत आपल्या ठायी वसणाऱ्या रंजित, भ्रामक, भ्रममूलक, 'रोमॅण्टिक' आणि म्हणूनच आत्मवंचनात्मक शाबीत होणाऱ्या धारणांपासून प्रथम आपली मुक्तता करून घ्यावी, हे बुकनन आग्रहाने प्रतिपादन करत राहतात. राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती म्हणजे जगाच्या कल्याणासाठी झटणारे कोणी संत-महंत नसतात, हे बुकनन नि:संदिग्धपणे सांगून टाकतात. 'जगराहाटी अधिक निकोप, निरामय बनावी यासाठी कटिबद्ध झालेल्या नेक लोकसेवकांचा मेळा', अशी राजकारण्यांबाबतची आपल्या मनातील प्रतिमा (तशी प्रतिमा आपण जपलेली असेल तर) निखालस भाबडी आणि शाळकरी आहे, हे बुकनन रोखठोकपणे अधोरेखित करतात. त्यांमुळे, राजकीय प्रक्रियेद्वारे निर्माण होणाऱ्या धोरणविषयक

निर्णयांचे राजकीय अर्थशास्त्राच्या दृष्टीने विश्लेषण करत असताना अर्थविश्लेषकांनी हे सत्य मनाशी सतत जागते ठेवावे, हा बुकनन यांच्या त्या प्रतिपादनाचा इत्यर्थ.

सार्वजनिक निवडीसंदर्भातील (पब्लिक चॉइस) बुकनन यांच्या अशा सडेतोड विश्लेषणाने राजकीय प्रक्रियेबाबतचे अर्थवेत्यांचे वाचन आणि आकलन मुळापासून पार बदलून टाकले. राजकारणी नेत्यांना 'लोकसेवक' समजणे हे राजकीय प्रक्रियेच्या अतिसुलभ आकलनाचे ते द्योतक मानतात. प्रत्येक व्यक्ती ज्याप्रमाणे अधिकाधिक सुखसमाधान मिळवण्याच्या हेतूनेच कार्यप्रवण होत असते, उपयुक्ततेचे महत्तमीकरण साध्य करण्याच्या उद्दिष्टानेच ज्याप्रमाणे ग्राहक बाजारपेठेत उतरतो, जास्तीत जास्त नफा मिळवण्याची प्रेरणाच जशी उद्योजकाला कार्यरत राखते अगदी त्याच धर्तीवर राजकीय प्रक्रियेतील घटकदेखील स्वार्थसंपादनाच्या ध्येयानेच तिथे झटत असतात, त्याच हेतूने त्यांचे वर्तन आकार घेत असते हे बुकनन यांचे पायाभूत प्रमेय आहे. राजकीय प्रक्रियेचे स्वरूप मुळातच असे असल्यामुळे राजकीय नेत्यांच्या सत्तेला, त्यांच्या अधिकारकक्षेला नियमांचे कुंपण घातले गेले पाहिजे, अशी बुकनन यांची भूमिका राहिली. तसे कुंपण त्या त्या देशाची राज्यघटना पुरवत असते. राजकारणाचा खेळ त्या कुंपणाच्या मर्यादेतच रंगायला हवा. बुकनन यांच्या विश्लेषणानुसार, 'राजकारण' हा जर खेळ समजला तर, 'राज्यघटना' ही त्या खेळाची नियमसंहिता ठरते.

बुकनन हे मुळात सार्वजनिक वित्तव्यवहाराचे (पब्लिक फायनान्स) अभ्यासक व संशोधक. साहजिकच, सरकारांनी वित्तीय तूट कायम आटोक्यात राखावी, हे त्यांचे सततचे ठाम प्रतिपादन राहिले. कर आकारणी, करवसुली यांवर भर देत जनसामान्यांच्या क्रयशक्तीला कुंपणे घालणारी सरकारे स्वत:ला मात्र कणभरही वित्तीय शिस्त लावून घेण्यास तयार नसतात, हा त्यांचा अनुभवच होता. शासनसंस्थेच्या अधिसत्तेला व्यवहारात मूर्त स्वरूप प्रदान करणारी संस्थात्मक यंत्रणा म्हणजे 'सरकार'. 'सरकार'नामक संस्थेचा, बुकनन यांच्या विश्लेषणानुसार, स्वाभाविक कलच सर्वसाधारणपणे सत्तेच्या केंद्रीकरणाकडे असतो. त्यांमुळे, व्यक्तींच्या तसेच समाजव्यवस्थेतील अन्य घटकांच्या स्वातंत्र्याचा संकोच होण्याच्या अथवा संकोच केला जाण्याच्या भयाची तलवार सततच टांगती असते. लोकव्यवहारात अधिकाधिक घुसखोरी करत राहणे ही 'सरकार'नामक संस्थेची सहजप्रवृत्तीच होय. समाजातील जमेल त्या व जमेल तेवढ्या (शक्य झाले तर सगळ्यांच!) कार्यकलापांचे नियमन करणे हे सरकारला अतिशय प्रिय वाटत राहते. हे सगळे असे असले तरी, व्यापक समाजहिताच्या दृष्टीने सरकार स्थिर आणि मजबूतच असले पाहिजे यांबाबत बुकनन यांचा कटाक्ष निरंतर राहिला.

सत्तेचे केंद्रीकरण अव्याहत राखण्याच्या सरकारच्या वृत्तीला मर्यादा घालण्याची निकड प्रतिपादन करत असतानाच, बुकनन त्या दिशेने करावयाच्या काही उपाययोजनांचादेखील उहापोह करतात. राज्यघटनेत अंतर्भूत असलेल्या त्या संदर्भातील तरतुदी व कलमे यांचे प्रतिपालन डोळ्यांत तेल घालून केले जाणे या संदर्भात कळीचे ठरते. घटनात्मक तरतुदींद्वारे निर्णयप्रक्रियेच्या केंद्रीकरणास पायबंद घालता येतो, हे बुकनन यांचे प्रतिपादन मननीय आहे. सरकारला जनाधार पुरविणाऱ्या मतदारांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाबाबत सातत्याने आग्रह धरावयास हवा व त्यासाठी सरकारवर प्रभावही पाडावयास हवा, असे बुकनन सुचवितात. संघराज्यात्मक संरचना त्यासाठी उपयुक्त शाबीत होते. सत्तेचे आणि निर्णयप्रक्रियेचे विकेंद्रीकरण सत्तासोपानाच्या थेट तळातील स्तरापर्यंत घडवून आणत लोकसत्ताक पद्धतीच्या स्थानिक संस्थांमध्ये निकोप असे स्पर्धात्मक वातावरण जिवंत राहण्याच्या यंत्रणा, व्यवस्था व घटनात्मक तरतुदी निर्णयप्रक्रियेच्या प्रभावी व परिणाकारक विकेंद्रीकरणास उपकारक ठरतात, ही बाब बुकनन आवर्जून प्रतिपादन करतात... आणि, सगळ्यांत मोठी आणि चिवट मेख मारली जाते अथवा गेलेली असते ती इथेच. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये जनता जरी सर्वशक्तिमान गणली जात असली तरी राज्यकारभार हाती घेतलेल्या सरकारांवर मतदारांचा थेट प्रभाव अथवा नियंत्रण व्यवहारात कोठेच प्रतीत होत नाही. या विरोधाभासाचा कार्यकारणभाव नीट समजावून घेतला पाहिजे.

आपणच निवडून दिलेले सरकार कामकाज कसे करते आहे यांवर निगराणी राखण्याबाबत मतदार नागरिक मुळातच उदासीन असतात, असे सार्वजनिक निवडीच्या सिद्धान्ताचे एक मुख्य प्रमेय आहे. सरकारवर नजर ठेवण्याच्या प्रेरणेचाच मतदारांपाशी अभाव असतो. त्याला कारणे अनेक दिसतात. एक तर, राजकीय प्रक्रियेतील बारकाव्यांबद्दल सर्वसाधारण माणूस अनभिज्ञ असतो. दुसरे म्हणजे, कोणत्याही निवडणुकीचा निकाल समाजाच्या लेखी कितीही महत्वाचा असला तरी आपल्या एका मताने काही निवडणुकीचा निकाल बदलणारा नाही अथवा फिरणाराही नाही, हे प्रत्येक मतदार जाणून असतो. समाजासमोरील प्रश्नांचा साधकबाधक विचार करून, कळीच्या प्रश्नांबाबत निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या भूमिका काय आहेत ते जाणून घेत सजगपणे मतदान करण्याइतकी संवेदनशीलता, प्रगल्भता आणि मुख्य म्हणजे वेळ बहुतेकदा आणि बहुतेक मतदारांपाशी नसतो. त्यांतच, आपण कितीही डोळसपणे विचार करून मत दिले तरी आपल्या मताचा निवडणुकीच्या एकंदर निकालावर काय आणि नेमका कितीसा प्रभाव पडणार आहे, असा विचारही

सगळ्यांच्याच मनात येत राहतो. त्यांमुळे, समकालीन आर्थिक-सामाजिक-राजकीय भवतालाचा अभ्यास करून मग मत निश्चित करण्यात वेळ आणि श्रम खर्च करण्याच्या वाटेला कोणी जात नाही. अशा प्रकारची क्षमता मतदारांच्या ज्या सुजाण वर्गांमध्ये असते त्या वर्गांना राजकीय प्रक्रियेबाबतच मोठी अनास्था असल्याचा अनुभव जवळपास सार्वत्रिक आहे. उमेदवारांबद्दल, ढोबळ तपशील सोडला तर, बहुसंख्य मतदारांना फारशी माहिती नसतेच. ज्या स्तरावरील लोकसंस्थेसाठी निवडणुका होत आहेत तिथे निवडून गेल्यानंतर प्रतिनिधींनी नेमके काय काम करायचे असते, याचाही बहुतेकांना पत्ता नसतो.

तुम्ही-आम्ही बाजारपेठेत उतरून ज्या वेळी खरेदी करतो तिथे आपले प्रत्यक्ष आणि थेट हितसंबंध गुंतलेले असतात. खिशातले पैसे मोजून ज्या वेळी एखादी वस्तू अगर सेवा आपण खरेदी करतो तेव्हा तिचे शक्य तेवढे सगळे बारीकसारीक तपशील व पैलू आपण जाणून घेतो. आपण विकत घेतलेल्या अथवा विकत घेऊ घातलेल्या जिनसेचे गुणावगुण आपण निगुतीने ठाऊक करून घेतो. कारण, तिथे जी निवड आपण करणार असतो तिच्यात काही गफलत झाली तर तिचे तोटे व दुष्परिणाम आपल्या वाट्याला लगेचच व थेट येतात. तिथे पैसा आपल्या खिशातून जाणार असतो. त्यांमुळे साधकबाधक सर्वांगीण चाचणी करून मगच खरेदी करण्यात आपले हितसंबंध सघनपणे गुंतलेले असतात. निवडणुकीच्या माध्यमातून उमेदवार निवडण्यात मतदारांचे व्यक्तिश: असे प्रत्यक्ष व थेट हितसंबंध गुंफलेले नसतात. त्यांमुळे, निवडणुकीत उतरलेले राजकीय पक्ष, प्रचलीत समस्यांबाबतच्या त्यांच्या भूमिका, निवडणुका लढवणारे उमेदवार, त्यांची पार्श्वभूमी, कार्यक्षमता, प्रश्नांची जाण... अशांसारख्या गोष्टींचा मागोवा ठेवण्यात मतदारांना फारसा रस नसतो, असे सार्वजनिक पसंती संदर्भातील हा सिद्धान्त सांगतो.

निवडणूक जिंकलेल्या लोकप्रतिनिधीची कामकाज करतेवेळची मानसिकता जवळपास अशीच राहते. सार्वजनिक कल्याणासाठी ज्या काही योजना शासनसंस्था आखते व राबवते त्यासाठी लागणारा पैसा करांच्या माध्यमातून जमा होत असतो. त्यांमुळे, एखादी योजना किती खर्चिक आहे, कुशल आखणी व काटेकोरपणे तिची केलेली तामिली यांमुळे खर्चात कितपत बचत करता येईल यांसारख्या बाबींबाबत लोकप्रतिनिधीला फारसे ममत्व नसते. कारण, मुळात पैसे त्याच्या खिशातून खर्च होणार नसतात. दुसरे म्हणजे, समजा, त्याने खूप लक्ष घालून योजनेवरील खर्चात बचत साधली तरी वाचलेल्या त्या निधीमुळे अथवा निधीचा प्रत्यक्ष व थेट लाभ

त्याला काहीच मिळणार नसतो. तिसरे म्हणजे, आपल्या प्रतिनिधीने स्वत: लक्ष घालून अमूक एका विकासयोजनेवरील खर्चात बचत करून दाखविली, याची संबंधित प्रतिनिधीच्या मतदारांना सूतरामदेखील गंधवार्ता नसते. मतदार संघटित नसतात. त्यांमुळे, एकदा निवडणुका झाल्या की आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या कामकाजासंदर्भातील मतदारांची इतराजी अथवा खुषी संघटितपणे व्यक्त होत नाही. मात्र, शासनसंस्थेबरोबर सूत जुळवण्यास उत्सुक असलेले लोकव्यवहारातील प्रभावशाली बळकट दबावगट संघटित असतात. शासनसंस्थेबरोबर संधान बांधून, निवडणुका लढविण्यासाठी राजकीय पक्षांना देणग्या अथवा अर्थसाह्य पुरवून त्यांद्वारे, शासनसंस्था प्रवर्तित करणाऱ्या योजना आपल्या हितसंबंधांची जपणूक करणाऱ्या असतील याची तजवीज करण्यात अशा दबावगटांना थेट रस असतो. दुसरीकडे, राजकीय प्रक्रियेशी या ना त्या नात्याने जोडल्या गेलेल्या आणि तिच्याशी जवळचे संबंध प्रस्थापित करून आपले हितसंबंध जपणाऱ्या प्रभावशाली दबावगटांशी उगीचच पंगा का घ्या, असा विचार लोकप्रतिनिधी करत असतात. राजकीय व्यवस्थेशी सलोख्याचे संबंध जपल्याने आपल्याला अनुकूल अशी धोरणे उत्क्रांत करण्यात दबावगटांचा थेट लाभ असल्यामुळे ते या बाबतीत अतिशय सक्रिय आणि तत्पर राहतात. 'क्रोनी कॅपिटॅलिझम' हा भांडवलशाहीचा एक प्रचलीत मोठा आयाम याच


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५  किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

प्रक्रियेची निष्पत्ती गणावी लागते. त्यांमुळे सार्वजनिक जीवनात सहभागी होत जनहिताच्या संवर्धनासाठी काम करताना, धोरणे आखताना काळजीकाट्याने आपली जबाबदारी निभविण्याची गरज लोकप्रतिनिधींना उरत नाही. त्यांत त्यांना रस नसतो आणि काही एक सबळ प्रेरणादेखील नसते.

मतदार आणि राजकीय पक्षांचे उमेदवार यांची निर्णयप्रणाली आणि त्यांमागील प्रेरणा यांच्या अभ्यासाप्रमाणेच धोरणनिर्मितीशी संलग्न असलेल्या तिसऱ्या घटकाच्या वर्तनाची व त्यांमागील प्रेरणांची चिकित्सादेखील सार्वजनिक पसंतीचे सिद्धान्तन करते. आणि तो तिसरा घटक म्हणजे धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करणारी प्रशासकीय यंत्रणा व तिच्यातील अधिकारी. शासनसंस्था कार्यान्वित करणाऱ्या राजकीय नेतृत्वाशी ज्याप्रमाणे बलशाली दबावगट सलोख्याचे संबंध जोपासत राहतात अगदी तशाच प्रकारचे नाते दबावगट आणि प्रशासनातील नोकरशहा यांच्यादरम्यान प्रस्थापित होते व नांदते. आपल्या व्यावसायिक तसेच वित्तीय हितसंबंधांचे संगोपन अबाधित राहील, अशा प्रकारची धोरणे राजकीय प्रणालीने आखावीत यासाठी समाजातील दबावगट धोरणनिर्मितीमध्ये कळीची भूमिका बजावणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संधान बांधतात. दबावगट आणि नोकरशाही यांच्यादरम्यान त्यातूनच एकमेकांच्या हितसंबंधांचे भरणपोषण करणाऱ्या नात्यांचे पूल बांधले जातात. अनेकदा, शासनसंस्थेने विविध कारणांसाठी निर्माण केलेल्या नियामक मंडळांवरील शासननियुक्त नोकरशहा हेदेखील दबावगटांच्या कह्यात गेलेले दिसतात.

म्हणजेच, दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, 'मतदार-लोकप्रतिनिधी-प्रशासन' हे सार्वजनिक धोरणाच्या माध्यमातून सार्वजनिक पसंती प्रक्रियेचे नियमन करणारे घटक,परस्परांच्या साहचर्याद्वारे, जनकल्याण साधण्यासाठी धोरणे आखली-राबविली जात असल्याचा सूचन घडविणारे वास्तव निर्माण करत असले तरी या तिघांतील प्रत्येक गट त्याच्या त्याच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्याच्या आद्य प्रेरणेतूनच सक्रिय बनत असतो. या सगळ्याची गोळाबेरीज म्हणून जे काही लोककल्याण व्यवहारात साधले जाते त्यालाच 'विकास' असे आपण म्हणायचे!

# संरक्षण

## सशस्त्र दलातील आधुनिकतेचे वारे

जगभरातील सैन्यदलामध्ये आता आधुनिकतेचे वारे वाहू लागलेले आहेत. अमेरिका, चीनसह सर्वच देशांनी पारंपरिक गोष्टींना मागे सारून आता आधुनिकीकरणाची कास धरलेली आहे. भारतसुद्धा त्यात कुठेही मागे नाही. अलीकडेच भारताने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयामुळे या संबंधातील भारताची दिशा स्पष्ट झालेली आहे. भारताच्या शेजारील राष्ट्रे ही सामरिकदृष्ट्या जगातील सर्वाधिक धोकादायक समजली जातात. भारताच्या सर्वच सीमांवरील अस्थिरता ही उद्याच्या काळात युद्धभूमीमध्ये रूपांतरित होऊ शकेल, अशी शक्यता संरक्षणक्षेत्रातील जाणकारांकडून वर्तवली जाते आहे. विस्तारवादी महत्त्वाकांक्षा बाळगणारा आणि संधी मिळेल तेव्हा घुसखोरी करणारा चीन, सतत अशांत असणारा व दहशतवादाला पोसणारा युद्धखोर पाकिस्तान, बांगलादेश व म्यानमारमधील गृहकलह व भारताला बसणाऱ्या त्याच्या झळा, चीनशी जवळीक साधणारे नेपाळ आणि स्वत:चे बंदर चीनला देऊन भारताच्या सुरक्षेचा धोका निर्माण करणारी श्रीलंका हे सारे पाहता शेजारील राष्ट्रांमुळे भारतापुढे किती आव्हाने उभी राहिलेली आहेत हे काही वेगळे सांगायला नकोच. त्यामुळे, या सर्व आव्हानांशी सामना करीत असताना स्वत:ला सामरिकदृष्ट्या सक्षम बनवणे आणि कोणत्याही संकटाचा सामना करण्यासाठी सिद्ध बनण्याचे आव्हान आजच्या घडीला भारताच्या पुढ्यात आहे.

कोणत्याही देशाची प्रादेशिक स्थिती ही त्या देशाच्या सीमारक्षणाच्या दृष्टीने फार महत्त्वाची गणली जाते. एखाद्या राष्ट्राचे भौगेलिक स्थान, त्याच्या सीमा यांचे महत्त्व यासंदर्भात आगळे-वेगळे असते. घनदाट जंगले, उत्तुंग पर्वत, बर्फाळ प्रदेश, विस्तीर्ण सागरी किनारा अशा सर्व बाबी सीमासंरक्षणामध्ये मोठी भूमिका बजावत असतात. त्यादृष्टीने विचार करता, भारताच्या सीमांना या सर्वच बाबींचे संरक्षण निसर्गत: लाभलेले आहे. परंतु, आधुनिक तंत्रज्ञानामुळे नैसर्गिक संरक्षणाची ही परिमाणे

अपुरी ठरू लागली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे आता नैसर्गिक सुरक्षेच्या पलीकडे जाऊन सीमांच्या सुरक्षिततेसाठी लष्करात काही आधुनिक सुधारणा करणे गरजेचे झालेले आहे. सीमेवरची संरक्षण फळी त्यामुळेच मजबूत राहू शकेल, हे वास्तव लक्षात आल्याने भारतीय लष्करानेही त्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे. पूर्वी रसद पुरवठ्यासाठी सीमेवर व दुर्गम ठिकाणी खेचरांचा वापर केला जात असते. ही पारंपरिक पद्धत वर्षानुवर्षे चालत आलेली होती. परंतु त्यात होणारा काळाचा अपव्यय आणि त्यातील मर्यादा लक्षात घेता आधुनिक तंत्राचा वापर करून ही रसद पोहोचवण्यासाठीचे नवे मार्ग अंगिकारण्यास सुरुवात झालेली आहे. त्यानुसार, भारताच्या लष्कराने आता रसदपुरवठ्यासाठी खेचरांच्या ऐवजी अत्याधुनिक अशा ड्रोनचा वापर करण्याचे योजलेले आहे. हे आणि असे अनेक बदल आता नव्या काळात होऊ लागलेले आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानातील वेगवान प्रगतीमुळे आता युद्धाचे स्वरूपही झपाट्याने बदलते आहे. भारताचा सख्खा शेजारी असणाऱ्या चीनने नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा अवलंब सैन्यदलातही करण्यास सुरुवात करून यात अगोदरच आघाडी घेतलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर आता भारतालाही नव्या गोष्टींचा अंगिकार करून काही महत्त्वाचे बदल घडवून आणणे क्रमप्राप्त आहे. त्या दृष्टीने भारतीय लष्करानेही २०२५ हे वर्ष सुधारणेचे वर्ष म्हणून डोळ्यासमोर ठेवलेले आहे आणि त्या दिशेने पावलेही उचलण्यास सुरुवात झालेली आहे. त्यांचा परिचय करून घेणे उपयुक्त ठरावे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर**

कृत्रिम बुद्धिमत्ता हा आजच्या युगातील परवलीचा शब्द बनलेला आहे. त्यांमुळे जगभरातील सर्वच लष्करांनी आपल्या लष्करी सुधारणांचा विचार करताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केंद्रस्थानी ठेवलेला आहे. पुढारलेल्या अनेक देशांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा कमी–अधिक प्रमाणात वापर प्रत्यक्षात सुरूदेखील केलेला आहे. त्यामुळे या स्पर्धेत भारतालाही मागे राहून चालणार नाही. त्या दिशेने योग्य ती पावले उचलावीच लागतील आणि त्याच्या जोडीला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात मूलभूत संशोधन करून नवनवीन तंत्रज्ञानाचे पर्याय शोधावे लागणार आहेत. सीमा संरक्षणाच्या दृष्टीने आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता सर्वांत मोलाची भूमिका बजावू शकेल असा अंदाज आहे.

**सायबर आणि अंतराळ तंत्रज्ञान**

माहिती–तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सातत्याने नवनवीन संशोधन होते आहे. या सगळ्याचा उपयोग सामरिक क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो असे लक्षात आले आहे.

त्याचप्रमाणे, अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रातही महत्त्वाचे सर्व देश आघाडी घेत आहेत. भारतीय अवकाश संशोधन संस्थासुद्धा (इस्रो) या संशोधनात सध्या आघाडीवर आहे. अंतराळात प्रक्षेपित केलेल्या अनेक उपग्रहांच्या मदतीने 'जीपीएस' यंत्रणा कार्यान्वित करणे, रडार यंत्रणेत नव्या सुविधा प्रस्थापित करणे, देशाच्या विविध सीमांवर लक्ष ठेवणे या सर्व बाबींमध्ये अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात होत असलेले महत्त्वाचे संशोधन मोलाची भूमिका बजावू शकणार आहे. त्यामुळेच आगामी काळात भारतालाही माहिती–तंत्रज्ञानाचा सामरिक क्षेत्रात अधिकाधिक व प्रभावी वापर करणे आणि अंतराळ संशोधनावर भर देणे या बाबींकडे दुर्लक्ष करून चालणारच नाही अशी भूमिका या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत.

**'हायपरसॉनिक' क्षेपणास्त्रे**

ध्वनीपेक्षा वेगवान असणारी हायपरसॉनिक क्षेपणास्त्रे आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार होत आहेत. या क्षेपणास्त्रांचा वेग ध्वनीपेक्षा पाच पटीने अधिक असतो असे म्हटले जाते. त्यामुळे अशा स्वरूपाची अत्याधुनिक शस्त्रास्त्रे जेव्हा प्रतिस्पर्धी किंवा शत्रू राष्ट्रांकडे असतात तेव्हा त्यात कोणत्याही देशाला मागे राहून चालणार नाही. भारतालाही त्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे ठरणार आहे.

**रोबोटिक्स तंत्रज्ञान**

जगभरात 'रोबोटिक्स' तंत्रज्ञानाचा वेगाने प्रसार होतो आहे. सीमेवर लक्ष ठेवण्यासाठी किंवा दक्ष राहून सीमांचे संरक्षण करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रमानवांना सीमेवर तैनात करणे ही अगदी सहजशक्य बाब आहे. त्या दृष्टीने विविध देशांचे संशोधन सुरू असून भविष्यात या तंत्राचा वापर अगदी निश्चितपणाने होईल असा विचार सुरू आहे. यंत्रमानवांच्या मदतीने युद्ध लढले गेल्यास त्यात मनुष्यहानी वाचू शकते हीदेखील एक महत्त्वाची बाब आहे. त्याशिवाय, या यंत्रणा संपूर्णत: संगणकीय आज्ञावलीच्या माध्यमातून कार्यान्वित होत असल्याने दिलेल्या आज्ञेची अंमलबजावणी तंतोतंत व बिनचूक पूर्ण करण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळे संरक्षण दलात आधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करताना या विषयाचाही विचार करणे व त्या दिशेने पावले टाकणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

**यंत्रमानवाधारित श्वान, खेचर**

सीमेवर गस्त घालताना किंवा दुर्गम भागांत जाऊन पाहणी करताना अनेकदा सीमेवरच्या सैनिकांमध्ये गोळीबाराच्या फैरी झडतात. धुमश्चक्री होते आणि त्यात जवान हकनाक मारले जातात. ही परिस्थिती बदलावी या हेतूने नव्या तंत्रज्ञानाचा

वापर कसा करता येईल या दिशेने भारतीय लष्कर पावले टाकीत आहे. टेहळणीसाठी अनेकदा दुर्गम भागांत खेचरांचा वापर केला जात असे. परंतु, यात आता सुधारणा करून यंत्रमानवाधारित श्वान किंवा खेचर तयार करून त्यांच्या माध्यमातून सीमावर्ती भागात लक्ष ठेवण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू झालेले आहेत. अशी कृत्रिम खेचरे अथवा कुत्रे दूर अंतरावरून खऱ्या प्राण्यांसारखेच हुबेहूब दिसतात. परंतु ते स्वयंचलित असतात आणि त्यामध्ये छुपा कॅमेरा बसवलेला असतो. यंत्रमानवाधारित श्वान किंवा खेचरे दुर्गम भागांत, सीमावर्ती भागात दूरवर जाऊन सहजतेने पाहणी करू शकतात आणि त्याची छायाचित्रे किंवा त्याचे थेट प्रक्षेपण लष्करी अधिकाऱ्यापर्यंत पोहोचू शकते. अलीकडेच राजस्थानच्या वाळवंटात झालेल्या एका लष्करी सरावामध्ये असे स्वयंचलित अत्याधुनिक रोबोटिक श्वान सहभागी झालेले होते.

**संपर्कविरहित युद्धावर भर**

आगामी काळातील युद्धे ही प्रामुख्याने संपर्कविरहित असतील असा सामरिक क्षेत्रातील जाणकारांचा अंदाज आहे. त्यामुळे युद्धाचे हे बदलते स्वरूप लक्षात घेऊन भविष्यातील पावले उचलावी लागणार आहेत. ड्रोनद्वारे केले जाणारे हल्ले हे या युद्धाचे सर्वाधिक घातक स्वरूप मानले जाते. त्यामुळे लष्करी पुनर्रचना करताना हा सर्वात महत्त्वाचा भाग ठरू शकेल. भविष्यात होणाऱ्या युद्धांमध्ये ड्रोन फार महत्त्वाची भूमिका बजावतील आणि त्यांच्या मदतीने शत्रूचे अधिकाधिक नुकसान कसे करता येईल यादृष्टीने आखणी केली जाईल आणि डावपेच आखले जातील. कोणतीही युद्धपरिस्थिती उद्‌भवली तरी आगामी काळात ड्रोन केंद्रस्थानी असणार आहेत. शत्रूचा ठावठिकाणा शोधून काढणे, सीमावर्ती भागात टेहळणी करणे, प्रत्यक्ष ड्रोनद्वारे हल्ला करणे, क्षेपणास्त्रांचा मारा कुठून होऊ शकेल याची पाहणी करणे अशा सगळ्याच गोष्टींमध्ये ड्रोनचा वापर अतिशय प्रभावी होऊ शकतो हे लक्षात आल्याने सगळ्याच मोठ्या राष्ट्रांनी त्यातील सखोल संशोधनावर भर दिला आहे आणि अधिकाधिक चांगले ड्रोन लष्करी ताफ्यात कसे दाखल होतील याचे प्रयत्न जागतिक पातळीवर सुरू आहेत. त्या दृष्टीने, भारतानेही वेगाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. स्वदेशी बनावटीच्या ड्रोन्सच्या निर्मितीला विशेष प्रोत्साहन दिले जात असून स्वदेशी आणि विदेशी अशा दोन्ही बनावटीच्या ड्रोनचा समावेश करून त्यांत विविधता आणण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

सध्या अनेकानेक उत्तम प्रकारचे ड्रोन विविध देशांकडून तयार केले जात आहेत. त्यामध्ये अमेरिकेने तयार केलेले 31 MQ-9B Predator Drones फार महत्त्वाचे

मानले जातात. २०२४ सालच्या ऑक्टोबर महिन्यात भारताने अमेरिकेसह एक सहकार्य करार केला असून अद्ययावत ड्रोन्स भारताच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. General Atomics या अमेरिकेच्या संरक्षण उत्पादक कंपनीने हे ड्रोन तयार केलेले आहेत. या ड्रोनच्या मदतीने टेहळणी करणे, पाहणी करणे, सीमांवर बारकाईने लक्ष ठेवणे या बाबी तर साध्य होतीलच परंतु, हे ड्रोन हल्ले करण्यासही सक्षम असल्याने लष्कराचे बळ आणखी वाढणार आहे.

आकाशामध्ये ५० हजार फुटांवरून देखरेख करण्याची आणि हल्ला करण्याची क्षमता असणारे MQ-9A Reaper (Predator B) हे ड्रोनसुद्धा आता लवकरच भारतीय लष्कराच्या ताफ्यामध्ये दाखल होणार आहेत. अत्यंत अद्ययावत असणारे हे ड्रोन अतिशय प्रभावी कामगिरी करण्यासाठी प्रसिद्ध आहेत. भारत-चीन सीमेलगत अनेक दुर्गम भागांमध्ये नियमित गस्त घालताना जिथे मर्यादा येतात तिथे हे ड्रोन निश्चितपणाने उपयुक्त ठरतील. हे ड्रोन शक्तिशाली असल्याकारणाने ३० तासांहून अधिक काळ उड्डाण करू शकतात आणि हजारो किलोंचे वजन वाहून नेण्याचीही क्षमता त्यांच्यामध्ये असते. पर्वतीय आणि सागरी क्षेत्रात लक्ष्यभेद करण्यासाठीदेखील या ड्रोन्सचा प्रभावी वापर करता येणार आहे. विविध ठिकाणच्या लष्करी हालचाली टिपणे आणि भौगोलिक स्थितीचे अवलोकन करून त्याची माहिती तत्परतेने संबंधितांना पुरवणे यातदेखील ड्रोनची मदत महत्त्वाची ठरू शकते. दुर्गम भागात रसद पुरवठ्यामुळे भावी सैनिकांची अनेकदा कोंडी होते. अशा परिस्थितीमध्ये ड्रोनच्या मदतीने रसदपुरवठाही वेळेत आणि तत्परतेने करता येणार आहे.

**सायबर हल्ल्यांचे आव्हान**

ड्रोनसह विविध यंत्रणांमध्ये इंटरनेटचा वापर प्रामुख्याने केलेला असतो. त्यामुळे या सर्व यंत्रणांपुढे सर्वांत मोठे आव्हान असते ते सायबर हल्ल्यांचे. अशा हल्ल्यांपासून यंत्रणांना सुरक्षित ठेवणे ही अनिवार्य अशी बाब ठरते. त्यासाठी परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वदेशी सायबर सुरक्षा यंत्रणा प्रस्थापित करण्यावर भारतीय लष्कराचा भर असणार आहे. येणाऱ्या काळात ड्रोन महत्त्वाची भूमिका बजावतील हे गृहित धरून लष्करात ड्रोनची संख्या वेगाने वाढते आहे. त्यासाठी ते संचालित करू शकणारे नवे तंत्रज्ञ, अद्ययावत प्रशिक्षण घेतलेले लष्करी अधिकारी यांचीही संख्या भविष्यात वाढवावी लागणार आहे. नव्या लष्करी धोरणाची आखणी करताना त्याचाही अगदी गांभीर्याने विचार केला जातो आहे.

**एकात्मिक युद्धविभाग**

लष्कराच्या तिन्ही दलांमध्ये सुसूत्रता राहावी आणि उत्तम समन्वय राहावा म्हणून आता पावले उचलली जात आहेत. भारताच्या इतिहासातील आजवरची ही सर्वांत मोठी लष्करी पुनर्रचना ठरणार आहे. युद्धपरिस्थिती उद्‌भवल्यास तिन्ही दलांकडे उपलब्ध असणारी सर्व संसाधने परस्पर समन्वयाने आणि प्रभावी रीतीने वापरण्याची कार्यपद्धती याद्वारे आखली जाणार आहे. या एकत्रिकरणातून एकात्मिक युद्धविभाग तयार करण्यात येणार आहे. भारतीय लष्कराची तिन्ही दले आणि त्याचे एकूण १७ विभाग सारे काही एका छताखाली एकत्र येतील आणि अधिक प्रभावी, सुनियोजित अशी कार्यपद्धती त्यातून विकसित केली जाईल असा प्रयत्न आगामी काळासाठी निश्चित करण्यात आलेला आहे. लष्कराचे हे सर्व १७ विभाग एकत्र आणत असताना सहा एकात्मिक युद्ध विभाग करावेत असे नियोजन आहे. केवळ लष्करी कारवाईच्या बाबतीतच नव्हे तर पुरवठा, वाहतूक, दळणवळण, देखभाल–दुरुस्ती, सीमेवरील संरक्षण अशा सर्व बाबींसंदर्भात संयुक्त व्यवस्था कशी निर्माण करता येऊ शकेल आणि त्यासाठी आवश्यक असणारे एकत्रित प्रशिक्षण कशा पद्धतीने विकसित करता येईल या दिशेने प्रयत्न केले जाणार आहेत.

**मानवरहित विमानांचे संचालन**

मानवरहित विमानांचाही युद्धातील वापर येत्या काळात वाढण्याची शक्यता आहे. युद्धातील मनुष्यहानी वाचण्याबरोबरच अचूक लक्ष्यभेदही त्यामुळे करता येणार आहे. त्यामुळे केवळ हेलिकॉप्टरच नव्हे तर अशा मानवरहित विमानांचे संचालनही कशा पद्धतीने करायचे याचेही प्रशिक्षण वायूदलाच्या नवीन तसेच अनुभवी अधिकाऱ्यांनाही द्यावे लागणार आहे.

**पारंपरिक पाणबुड्यांच्या क्षमतांचा विस्तार**

भारतीय नौदलाकडे असणाऱ्या पारंपरिक पाणबुड्यांची क्षमता विस्तारण्याच्या दृष्टीने Defence Research and Development Organisation (DRDO)च्या माध्यमातून Air-Independent Propulsion (AIP) हे तंत्रज्ञान नव्याने विकसित करण्यात आलेले आहे. या नव्या तंत्रज्ञानामुळे पाणबुड्यांची पाण्यात टिकून राहण्याची क्षमता विकसित होणार आहे. या पाणबुड्यांची मारकक्षमताही विकसित करण्याच्या दृष्टीने नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार केला जातो आहे.

**आधुनिक तंत्राविषयी नवे अभ्यासक्रम**

भविष्यातील युद्धांचे स्वरूप हे झपाट्याने बदलत जाणार आहे. प्रत्यक्षात आमने–

सामने युद्ध न करता शत्रूला जेरीस आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही युद्धे लढली जातील. त्या दृष्टीने, आधुनिक युद्धाचे संचालन आणि त्याच्या विविध तांत्रिक पैलूंची ओळख लष्कराच्या प्रमुख तिन्ही दलांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यासाठी आता नव्या लष्करी धोरणामध्ये आधुनिक युद्धतंत्रांविषयी अद्ययावत माहिती देणारे अभ्यासक्रमही नव्याने तयार करण्यात आले असून लष्करी अधिकाऱ्यांना त्याचे प्रशिक्षणही दिले जाऊ लागले आहे. नवी तंत्रे आत्मसात करून युद्धनीती कशी आखायची, डावपेच कसे खेळायचे, जटिल परिस्थितीचा सामना कशा पद्धतीने करायचा, नव्या तंत्रज्ञानाची प्रभावी मदत घेऊन विजयाचे पारडे आपल्या बाजूने कसे झुकवायचे या दृष्टीने लष्करी अधिकारी सुसज्ज व्हावेत असा भारताचा आगामी काळात प्रयत्न असेल. नव्याने जी पिढी लष्करामध्ये भरती होते आहे ती अशा प्रकारच्या युद्धांसाठी सज्ज असेल, त्यांच्या तंत्रज्ञान आकलनाचा परिघ विस्तारलेला असेल आणि बहुक्षेत्रीय युद्धातील बारकावे त्यांनी अभ्यासलेले असतील, याची दक्षता बाळगत नेमक्या दिशेने पावले उचलली जात आहेत.

भारतीय लष्कराच्या सुधारणेच्या दृष्टीने विविध गोष्टींचा विचार करून पावले उचलली जात आहेत. संरक्षणसामुग्रीची खरेदी करताना होणारा कालापव्यय टाळण्यासाठी आणि त्यात सुलभता येण्यासाठी एक पारदर्शक पद्धत विकसित व्हावी असा प्रयत्न सुरू आहे. स्वदेशी उद्योजकांना प्रोत्साहन देत नवे उद्योजक घडवण्यावरही भर दिला जातो आहे. सार्वाजनिक-खासगी भागीदारीतून कोणते प्रकल्प वेगाने पूर्णत्वास नेता येतील हाही विचार सध्या सुरू आहे. या सगळ्या प्रयत्नांतून संरक्षण दल हे सर्वस्वी आत्मनिर्भर कसे बनेल हा विचार केला जातो आहे.

■■

# सृष्टी संशोधन

## सहाव्या विलोपनाच्या दिशेने...?

आगामी काळात हे जग नष्ट होणार आहे अशा प्रकारच्या चर्चा नेहमी होताना दिसतात. जगबुडी होणार, महाप्रलय येणार, दुसऱ्या ग्रहाशी टक्कर होणार अशा अनेक प्रकारच्या वावड्या नेहमी उठताना दिसतात. पृथ्वी नष्ट होणार असल्याची चर्चा २०१२ सालीसुद्धा जगभरात सुरू झालेली होती. परंतु, ही सगळी भाकिते खोटी ठरत आलेली असली आणि अशा वावड्या उठत असल्या तरी खरोखरीच पृथ्वीवरील जीवसृष्टी येणाऱ्या काळात नष्ट होऊ शकेल अशी भीती शास्त्रज्ञ आता अभ्यासाद्वारे वर्तवू लागले आहेत. जागतिक स्तरावर आताशा होत असलेल्या नव्या संशोधनात पृथ्वीवर राहणारी सजीवसृष्टी नामशेष होण्याची शक्यता वर्तवण्यात आलेली आहे. पर्यावरणाचा झपाट्याने होणारा ऱ्हास, वाढते प्रदूषण, वातावरणातील लक्षणीय बदल आणि जागतिक तापमानवाढ या बाबी त्यासाठी कारणीभूत ठरतील अशी भीती व्यक्त केली जाते आहे. पृथ्वीवरील सर्व खंड अस्थिर बनून काळाच्या ओघात एकमेकांपासून सुटे होऊन वाहायला लागतील आणि भविष्यात एकच महाखंड तयार होईल अशा प्रकारच्या संभाव्यता व्यक्त होताना दिसतात. त्याला Pangea Ultima असे नाव देण्यात आले असून या नव्या खंडनिर्मितीमुळे प्रचंड प्रमाणात उष्णता वाढेल आणि त्यामुळे मानव व सर्व सस्तन प्राणी नष्ट होतील, असा कयास संशोधकांनी व्यक्त केलेला आहे. यालाच शास्त्रज्ञांनी महाविलोपनाचा सहावा इशारा (Sixth Mass Extintion) असे नाव दिले आहे.

ब्रिटनमधील University of Bristol मधील संशोधक Dr. Alexander Farnsworth यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या चमूने हे संशोधन केले आणि पृथ्वीच्या आयुर्मानाविषयी काही निष्कर्ष काढले. Nature Geoscience या जगविख्यात नियतकालिकामध्ये हा संशोधन प्रबंध प्रसिद्ध झालेला आहे. त्यामुळे जगभरातील संशोधकांचे लक्ष या संशोधनाकडे वेधले गेले असून त्यावर अनेक

प्रकारची मतमतांतरे व्यक्त होताना दिसत आहेत. वातावरणातील सध्याच्या बदलांचा अभ्यास करून भविष्यात काय परिस्थिती राहणार आहे आणि पृथ्वीचे एकूण आयुर्मान किती राहील यावर या संशोधनामध्ये भर देण्यात आलेला होता. या अभ्यासात शास्त्रज्ञांना असे दिसून आले की, पृथ्वीवरील सर्व महत्त्वाचे खंड आता हळूहळू हलू लागले आहेत. भविष्यात हे बदल वाढत जातील आणि या सगळ्यातून एकाच खंडाची निर्मिती होण्याची शक्यता संभवते. मानवाच्या आणि सजीवसृष्टीच्या अंताचे हे कारण ठरेल. अशा महाखंड निर्मितीमुळे पृथ्वीच्या हवामानात लक्षणीय असे बदल घडून येतील. त्यामुळे वातावरणात कोरडेपणा खूप मोठ्या प्रमाणावर वाढेल आणि उष्णताही वाढत जाईल. हे तापमान सजीवांना सहन होण्याच्या पलीकडचे असेल. त्यामुळे पृथ्वीवर जिवंत राहण्याजोगे वातावरण राहणार नाही आणि परिणामी सर्व सजीव नष्ट होत जातील, असा कयास आता व्यक्त करण्यात येतो आहे.

महाद्वीपीय प्रभाव, सूर्याचे वाढते तापमान आणि वातावरणात वाढत जाणारा कार्बन डाय ऑक्साइड यांच्यामुळे तापमानवाढ होत असते. हे सर्व परिणाम येणाऱ्या काळात तीव्र होणार असल्याने त्यात तग धरून राहणे पृथ्वीवरील सजीवांना शक्य होणार नाही. नवीन खंडनिर्मितीमुळे पृथ्वीच्या हवामानात लक्षणीय असे बदल घडून येतील. महाखंडाच्या निर्मितीनंतर समुद्रावरील तापमानही वाढत जाईल आणि त्यामुळे त्याचा परिणाम म्हणून बर्फ मोठ्या प्रमाणावर वितळू लागेल. हा सर्वांत मोठा महाद्वीपीय प्रभाव म्हणून गणला जाईल, असा शास्त्रज्ञांचा दावा आहे.

अनेक खंडांचे विलिनीकरण झाल्याचेही दूरगामी परिणाम होत जातील. या सगळ्यातून जगात अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणावर निर्माण होईल. त्यामुळेदेखील सजीवांचे हाल हाल होत जातील. एकूणच जीवनासाठी प्रतिकूल असे वातावरण येणाऱ्या काळात तयार होत जाईल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवलेला आहे. येत्या दहा लाख वर्षांमध्ये हे बदल होत जातील असे अनुमान हे अभ्यास वर्तवतात. त्या काळातील सूर्य अधिक आग ओकणारा असेल. ज्वालामुखीय क्रियाकलाप अधिक मोठ्या प्रमाणावर होतील आणि त्यातून कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण अधिक वाढत जाईल. पृथ्वीतलावर वाढत जाणारे हे तापमान ५० अंशांच्याही वर जाण्याची शक्यता असल्याने या तीव्र तापमानामुळे अनेक प्रजाती नष्ट होतील.

जीवसृष्टी नष्ट होत जाण्यामागे नेमकी कारणे कोणती असतील याचाही वेध घेण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनी केलेला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार, पर्यावरणाचा ऱ्हास हे त्यामागचे प्रमुख कारण असणार आहे. प्रामुख्याने मानवच या ऱ्हासाला

कारणीभूत ठरणार असून त्याच्या बेपर्वाईमुळेच हे संकट सजीवांच्या अस्तित्वाच्या मुळावर येणार आहे. वातावरणात होणारे बदल हे कल्पनेच्या पलीकडचे असतील आणि भयंकर अशा तापमानवाढीचा सामना सजीवांना करावा लागू शकेल, अशी भीती शास्त्रज्ञांना आहे. प्रचंड वेगाने आज वाढणारे हे प्रदूषणच भविष्यातील या महासंकटाचे कारण ठरू शकेल, असा इशाराही शास्त्रज्ञांनी दिला आहे.

कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण भविष्यात किती वाढेल याचा अंदाज घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी काही प्रयोग केले. Tectonic Plates Movement आणि Chemical Composition of Sea Water या दोन शास्त्रीय पद्धतींचा वापर करून भविष्यात कार्बन डाय ऑक्साइडची पातळी किती राहील याचा अभ्यास केला जातो. सध्याच्या परिस्थितीमध्ये कार्बन डाय ऑक्साइडची ही पातळी प्रति दशलक्षामागे सुमारे ४०० भाग (पीपीएम) इतकी आहे. येत्या काही वर्षांत ती वाढून ६०० पीपीएमपेक्षा अधिक होईल असा अंदाज शास्त्रज्ञांकडून वर्तवला जातो आहे. हे वाढणारे प्रमाण मानवजातीसाठी निश्चितच धोकादायक आहे. कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण अशाच पद्धतीने वाढत राहिले तर संपूर्ण मानवजातीच्या विनाशास ते कारणीभूत ठरू शकेल अशी भीती शास्त्रज्ञांना आहे. म्हणूनच त्या संदर्भात तातडीने पावले उचलणे आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे.

पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टी नष्ट होण्याच्या घटना या पूर्वीच्या काळातसुद्धा घडलेल्या असल्याचे दाखले मिळतात. सुमारे ४४३ दशलक्ष वर्षांपूर्वी असेच महाविलोपन घडून आलेले होते. त्यामध्ये ८५ टक्के सागरी जीवन नष्ट झाले होते. त्यास Ordovician-Silurian Extinction असे नाव देण्यात आले होते. दुसरी घटना म्हणजे Late Devonian Extinction. या नावाने ओळखले जाणारे विलोचन. हे महाविलोपन ३६० दशलक्ष वर्षांपूर्वी घडले होते. त्यामध्ये सृष्टीवरील ७५ टक्के प्रजाती नष्ट झालेल्या होत्या. त्यानंतर, २५२ दशलक्ष वर्षांपूर्वी Permian Triassic Extinction या नावाने निर्देशित केले जाणारे महाविलोपन झालेले होते. त्यामध्येही असेच मोठे बदल घडून आले होते. या विलोपनाला The Great Dying असे म्हटले जाते. कारण पृथ्वीवरचे हे सर्वात विनाशकारी विलोपन समजले जाते. २५२ दशलक्ष वर्षांपूर्वी Permian Triassic Extinction या नावाच्या विलोपनामुळे खूप मोठ्या प्रमाणावर सजीवसृष्टी नष्ट झालेली होती. त्यावेळी समुद्रातील तब्बल ९६ टक्के जीव नष्ट झालेले होते. त्या संदर्भात, अलीकडच्या काळात जागतिक स्तरावर झालेल्या संशोधनानुसार, त्याचेही प्रमुख कारण जागतिक तापमानवाढ

हेच होते. वाढलेल्या तापमानामुळे सजीवांना श्वास घेणे अशक्य होत गेले आणि परिणामी त्यांचा विनाश अटळ ठरला, असे संबंधित अभ्यासातून समोर आले आहे. University of Washington आणि Stanford University यांनी या संदर्भात महत्त्वाचे संशोधन प्रसिद्ध केले आहे. त्या वेळी प्राण्यांची बदलत गेलेली अवस्था आणि वातावरणाची स्थिती त्यामध्ये सादर केलेली आहे. जागतिक तापमानवाढीमुळे समुद्रातील पाण्याचे तापमान वेगाने वाढत गेले आणि त्याचा परिणाम होऊन समुद्री जीवांना श्वासोच्छवास करताच येईना. समुद्रातील ८० टक्के ऑक्सिजन संपून गेला होता. परिणामी, समुद्री जीवांचा श्वासोच्छवासाअभावी समुद्रातच मृत्यू झाला होता. त्या काळातील जीवाश्मांचा अभ्यास केला असता नेमके काय घडले असू शकेल याचा अंदाज येतो. तेव्हाचे समुद्री जीव आणि आताच्या काळातील समुद्री जीव यांची अशा परिस्थितीत तग धरून राहण्याची क्षमता लक्षात घेतली तर ती जवळपास समान आहे, असेही या संशोधनातून समोर आलेले आहे. ऑक्सिजनची मात्रा झपाट्याने कमी होण्याची अशीच काहिशी परिस्थिती जमिनीवरही उद्भवली होती व त्यामुळे तेथील सजीवांचाही तडफडून मृत्यू झाला असल्याची माहिती Stanford University मधील School of Earth Energy & Environmental Sciences विभागातील प्राध्यापक Jonathan Payne यांनी आपल्या संशोधनाद्वारे मांडलेली आहे.

आज लक्षावधी वर्षानंतर पुन्हा एकदा पृथ्वीला अशाच जागतिक तापमानवाढीचा धोका निर्माण झालेला असून त्याचे परिणाम काय संभवतात हे संशोधनातून समोर आलेले आहे. त्यामुळे, पृथ्वीवरील सजीवांच्या अस्तित्वाचाच गंभीर प्रश्न निर्माण होईल की काय अशी भीती शास्त्रज्ञांना आहे. वेगाने होणारे कार्बन उत्सर्जन, वाढते प्रदूषण या व अशा धोक्यांना वेळीच पायबंद घालणे ही त्यामुळेच काळाची गरज ठरणार आहे.

# पुरवणी

## ‘प्रबोधन पुरुषा’चे समाजचिंतन

■ अभय टिळक

पेशवाई लयाला जाऊन अव्वल इंग्रजीचा अंमल प्रस्थापित झाल्यानंतर १९व्या शतकाच्या मध्यापासून या भूमीत जे नवचिंतन साकारले त्याला युरोपीय अर्थाने ‘प्रबोधन’ म्हणता येईल किंवा नाही, यांबद्दल मतवैचित्र्य संभवते. परंतु, ब्रिटिश राजवटीशी संपर्क प्रस्थापित झाल्यानंतर विचारमंथनाचे जे युग एतद्देशीय नवशिक्षितांमध्ये अवतरले त्या युगाचे महानायकत्व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्याकडे जाते, हे मात्र निर्विवाद. पूर्णपणे अपूर्व आणि सर्वार्थाने प्रगत अशा संस्कृतीला सन्मुख होताना बावरून गेलेल्या इथल्या समाजमानसाला प्रथम सावरून मग क्रमाक्रमाने अंतर्मुख बनवत विचारप्रवण बनविण्यासाठी वाणी-लेखणी-करणी परजत क्रियाशील बनलेल्या सुधारकांच्या चमूचे मेरूमणी, असे न्या. रानडे यांचे वर्णन करणे अणुमात्रही अनाठायी होणार नाही. त्यासाठी या समाजाचे संस्थाकरण साधण्याबरोबरच त्याच्या सदसद्विवेकाला चेतना देणे अग्रक्रमाचे ठरते, हे अचूक हेरून समाजाच्या धार्मिक-राजकीय-सामाजिक-शैक्षणिक-सांस्कृतिक-औद्योगिक-आर्थिक अशा विविधांगांना सुधारणाप्रवण करण्यासाठी न्या. रानडे यांनी चौफेर गतिमान बनविलेल्या विचारजागराचे हे शब्दरूप ११० वर्षांनी पुन्हा प्रकाशमान होते आहे, ही अतिशय मोलाची बाब होय. न्या. रानडे यांच्या अर्धांगिनी रमाबाई रानडे यांनी १९१५ साली प्रथम इंग्रजीमध्ये प्रकाशित केलेल्या या विचारधनाचे मराठी रूप ‘साधना प्रकाशना’च्या कल्पक कृतिशीलतेने या टप्प्यावर सादर होण्यात एक मोठे औचित्य दडलेले आहे. व्ही. व्ही. ठाकूर नावाच्या सद्गृहस्थांनी मोठ्या साक्षेपाने तेव्हा संकलन केल्यामुळेच न्या. रानडे यांचे समृद्ध विचारविश्व अक्षराकार धारण करू शकले. खेदाची बाब अशी की, या व्ही. व्ही. ठाकूर यांच्याबद्दल आज काहीच तपशील आपल्याला उपलब्ध नाही. The Miscellaneous Writings या शीर्षकाने प्रथम प्रसिद्ध झालेल्या त्या दस्तऐवजाला लिहिलेल्या प्रस्तावनेमध्ये दिनशा एडलजी वाच्छा यांनी,

मोठ्या परिश्रमपूर्वक हे अ-साधारण अक्षरश्रम केल्याबद्दल ठाकूर यांचे व्यक्त केलेले ऋण सार्थच आहेत. त्या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या, तशाच साक्षेपाने, अवधूत डोंगरे यांनी पूर्णत्वास नेलेल्या अनुवादाद्वारे न्या. रानडे यांच्या प्रगल्भ व समाजहितैषी मनोविश्वाचे दर्शन आता आपल्याला घडते आहे. कोणताही अनुवाद वाचत असताना तो 'अनुवाद' आहे, याची कणभरही जाणीव कोठे होऊ नये, हे उत्तम अनुवादाचे प्रधान लक्षण होय. अवधूत डोंगरे यांचे हे अनुवाद लेणे त्या कसोटीस पुरेपूर उतरते. वास्तविक हे काम अजिबातच सोपे नव्हते आणि नाही. मुळात, न्या. रानडे यांचे विचार ज्या इंग्रजीमध्ये प्रथम अवतरले ती इंग्रजीसुद्धा गेल्या शतकातील. त्या वेळची लेखनशैलीदेखील पल्लेदार वाक्यांची रेलचेल असणारी. मुळात, ज्या सामाजिक वास्तवाबद्दल न्या. रानडे विश्लेषण करतात त्याचा धागा आजच्या वर्तमानाशी जुळणे महाकठीण. त्यामुळे, कालच्या समाजवास्तवाबाबत टिप्पणी करणाऱ्या लेखनाशी विद्यमान पिढ्या जाणिवेच्या पातळीवर कितपत संवाद संवेदनशीलपणे प्रस्थापित करू शकतील याचीही शंकाच. पुन्हा, आजच्या पिढीची मराठी भाषा तर अंतर्बाह्य पालटलेली. कालच्या वास्तवासंदर्भातील विचारमंथन कालच्याच मराठीत मांडावे तर आजची पिढी, अगदी कुतुहलापोटीदेखील, त्याच्याकडे बघेल का याची शंका हे झाले एक. दुसरीकडे, गतकालीन समाजाला विचारप्रवण करण्यासाठी मांडलेले विवेचन आजच्या मराठीत मांडावे तर पुराणा आशय आणि अभिव्यक्तीचे माध्यम मात्र आधुनिक, अशा विजोड साहचर्यापायी शब्दकृतीचा आस्वाद घेते वेळी बसणारे हादरे वाचनानंदात बाधा आणतील ही भीती. त्यांमुळे, मराठी भाषेच्या रानडेकालीन वळणाचा हात न सोडता १९व्या शतकातील निबंधलेखनात प्रगटलेल्या डौलदार मराठीची झलक, सुभग वाचनीय शैलीत, २१व्या शतकातील मराठी वाचकाच्या पुढ्यात त्याच्या भाषालकबीशी हातमिळवणी करत मांडायची, ही अवघड कसरत लीलया साधल्याबद्दल अवधूत डोंगरे यांचे करावे तेवढे कौतुक कमीच.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक पुनर्रचना पर्वाचा पायरव प्रथम ऐकू येण्याचा १९८५ साल हा जर आद्य कालबिंदू धरला तर पुनर्रचना कार्यक्रम आता वयाच्या चाळिशीमध्ये प्रवेशतो आहे. १९९१ सालानंतर वेगवान झपाटा लाभलेल्या या पुनर्रचना कार्यक्रमाचा गाभा आर्थिक आणि वित्तीय असला तरी जगभरात सर्वत्रच वाहणाऱ्या उदारीकरणाच्या वाऱ्यांनी आपल्या जगण्याची जवळपास सगळीच अंगप्रत्यंगे आज व्यापलेली आहेत. आपली भाषाशैली-आहारविहारप्रणाली-पोषाख-कुटुंबव्यवस्था-नातेसंबंधांचा पोत... अशा जीवनव्यवहाराच्या विविध प्रांतांना तर

या नवप्रवाहांनी त्यांच्या कवेत घेतले आहेच; परंतु, आता त्याही पुढे चाल करत आपल्या मूल्यसंचयावरही पुनर्रचनेचे हे नवपर्व कबजा करते आहे. भूतकाळाशी जुळलेला भावनिक सांधा खिळखिळा करून टाकणाऱ्या या झंझावाताने आज वयाच्या प्रौढावस्थेत प्रवेशलेल्या पिढ्या पार बावचळून गेलेल्या आहेत. दुसरीकडे, उदारीकरणाच्या पर्वातच पहिला श्वास घेणाऱ्या पिढीचा सांधा गतकाळाशी जोडला जाण्याचा प्रश्नच अप्रस्तुत ठरतो! नव्याचा अंगीकार करणे भाग पडत असताना, मग, जुन्याची व्यवस्था नेमकी कशी लावायची हा सवाल तर प्रत्येकाला प्रत्यही भंडावून सोडतो आहे. वयाच्या विशीत प्रवेशत असलेल्या न्या. रानडे यांचा, १९व्या शतकाच्या उत्तरार्धाचा प्रारंभ होता होता 'इंदुप्रकाश' साप्ताहिकाच्या इंग्रजी विभागाचे संपादकपद स्वीकारण्याच्या निमित्ताने तत्कालीन समाजमनाशी १८६२ साली कोवळा संपर्क प्रस्थापित होते वेळी तत्कालीन मराठी समाजातील नवशिक्षित संवेदनशील वर्ग नेमक्या तशाच मानसिक घुसळणीतून मार्गक्रमण करत होता. पेशवाई पडद्यामागे जाऊन ४४ वर्षे उलटलेली होती. मात्र, जुने लोपल्याची खदखद सनातनी प्रवृत्तींच्या मनीमानसी धुमसत होतीच. 'विधवाविवाह मंडळा'च्या कार्यातील सहभागाद्वारे सामाजिक सुधारणांच्या प्रांतात १८६५ साली सक्रिय प्रवेश होण्याने 'सनातनी' आणि 'सुधारक' यांच्यादरम्यानच्या विसंवादाच्या ठिणग्या न्या. रानडे यांच्या प्रत्यक्ष अनुभवास येऊ लागल्या. पुढे, १८७१ साली पुण्याला लघुवाद न्यायालयात नियुक्ती झाल्यानंतर गणेश वासुदेव जोशी यांच्याबरोबर सार्वजनिक सभेची सूत्रे चालविताना तर सनातन्यांच्या हल्ल्यांना तोंड देत सुधारणांचा गाडा संयमाने रेटत राहणे हे न्या. रानडे यांचे भागधेयच होऊन बसले. 'सुधारकाग्रणी' ही न्या. रानडे यांची प्रतिमा प्रस्थापित होण्याचा तो काळ आणि आपला आजचा वर्तमान या दोहोंत गडद असे ढोबळ साम्य म्हणूनच प्रतीत होते. नव्याचा स्वीकार करत असताना जुने पार सोडून द्यायचे का, असा प्रश्न या विद्यमान संक्रमणकाळात सगळ्यांनाच कमीअधिक प्रमाणात पडतो आहे. नव्या-जुन्याची सांगड घालण्याच्या प्रयत्नांत, आताशा, आक्रमक अशा आर्थिक आणि त्याच्या जोडीनेच कडव्या सांस्कृतिक राष्ट्रवादाला धुमारे फुटताना दिसतात. नव्याशी हातमिळवणी करत असताना जुन्याची नाळ तुटू नये म्हणून परंपरांच्या केवळ जपणुकीचीच नव्हे तर पुनरुज्जीवनाची हाकही जोमदारपणे घुमत असल्याचे आपण पाहतो आहोत. या सगळ्या घुसळणीला पुरून उरत आपल्या व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवनाची कालोचित धारणा होण्याच्या दिशा आपल्याला कशा गवसतील असा प्रश्न समाजमनस्क सुज्ञांच्या मनात निर्माण

व्हावा हे स्वाभाविक आहे. नेमक्या त्याच प्रश्नाला भिडण्यासाठी तत्कालीन समाजमानस सक्षम बनावे म्हणून न्या. रानडे यांनी १९व्या शतकाच्या उत्तरार्धात जे बहुआयामी वैचारिक मंथन आरंभले त्याचे शब्दरूप असणारा प्रस्तुत दस्तऐवज, वर्तमानातील जवळपास तशाच समस्यांना यथोचित प्रतिसाद देण्याच्या दिशा उजळण्यास पूरक-उपकारक ठरावा.

न्या. रानडे यांचे निबंध व भाषणांची शब्दांकने साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक अशा चार विभागांत जरी या ग्रंथात सादर झालेली असली तरी, 'सामाजिक परिषदे'च्या व्यासपीठावरून त्यांनी केलेले विचारमंथन हाच या दस्तऐवजाचा सर्वार्थाने गाभा ठरतो. त्याला कारणही तितकेच सबळ आहे. रानडे हे स्वभावत:च समाजशिक्षक होते. त्यांमुळे त्यांची टीकादेखील सकारात्मक आणि सुधारणेच्या दिशा सूचित करणारी अशीच दिसते. समाजाकडून घडणाऱ्या चुकांखातर त्याला धारेवर धरण्यापेक्षाही त्याच्या अनुचित वर्तनाची जाणीव सौम्यपणे करून देत उचित मार्गाकडे त्याचे चलनवलन प्रवर्तित करण्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याची न्या. रानडे यांची कार्यशैली, भागवतधर्मीय संतमंडळाच्या त्यांच्या अंतर्मनावर घडलेल्या सखोल व सघन संस्कारांचे दर्शन घडविते. १८६६ साली 'ओरिएन्टल ट्रान्सलेटर' या पदावर नियुक्ती झाल्यानंतर कामाचा भाग म्हणून १८६४ सालाखेरपर्यंत हिंदुस्थानी व फारसी भाषांत प्रकाशित झालेल्या ग्रंथांवर अभिप्राय लिहिण्याचे काम असो अथवा, शिक्षण आयोगाच्या मुंबई समितीचे अध्यक्ष डॉ. हंटर यांच्या बैठकीच्या निमित्ताने १८५७ ते १८८२ या काळात प्रवर्तित झालेल्या प्राथमिक शिक्षणाच्या विविध व्यवस्थांचे केलेले परिशीलन असो, न्या. रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वातील उदंड आशावादी समाजहितचिंतकच साऱ्या लेखनसंभाराद्वारे आपल्या पुढ्यात उभा ठाकतो. 'सिलेक्शन ऑफ पेशवाज् डायरीज'चे अंतरंग विशद करणारा न्या. रानडे यांचा या ग्रंथातील लेख, इतिहासाचे परिशीलनदेखील वर्तमानातील जगण्याचा पोत उन्नत बनवण्यास साहाय्यभूत ठरणारी प्रगल्भ अशी इतिहासदृष्टी विकसित करण्यासाठीच करावयाचे असते, या जाणिवेचा मूर्तिमंत वस्तुपाठ शोभावा असाच आहे. जीवनव्यवहारामध्ये संकुचितपणाला लवमात्रही थारा न देता अंतर्बाह्य जग अस्तित्वाच्या प्रगल्भ पातळीवर नेण्यासाठी अखंड चिंतनमग्न आणि कार्यरत राहणारे न्या. रानडे यांचे समाजसन्मुख व्यक्तिमत्व या ग्रंथातील पानापानांतून आपल्या पुढ्यात बहरून उमटते. सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून उपस्थितांच्या न्या. रानडे यांनी केलेल्या उद्बोधनाचे अंतरंग त्यासाठीच आणि त्या दृष्टीनेच समजावून घेणे अगत्याचे ठरते.

युरोपात १२-१३ व्या शतकापासून पुढे क्रमाक्रमाने उत्क्रांत झालेल्या प्रबोधनाचे मर्म इतिहासाच्या डोळस वाचनाद्वारे न्या. रानडे यांच्या जाणिवेमध्ये मुरलेले होते. प्रबोधन पर्वाद्वारे युरोपीय समुदायात निपजलेली विज्ञाननिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टी, तिची फलश्रुती ठरलेली औद्योगिक क्रांती, औद्योगिक विस्ताराबरोबरच उगम पावलेली भांडवलशाही, भांडवली विस्ताराच्या हातात हात घालून फैलावलेले शहरीकरण अशा विविध घटकांच्या समुच्चयातून १९व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये आधुनिकतेची बाळपावले युरोपीय भूमीवर उमटू लागली. या दोन्ही प्रवाहांच्या माध्यमातून प्रवाहित झालेली मानवतावाद, तर्कनिष्ठा, परंपरेची सश्रद्ध चिकित्सा, प्राचीनाला सरसकट नकार न देता त्यांतील कालोचित सत्वांश स्वीकारण्याचा नीरक्षीरविवेक आणि मुख्य म्हणजे व्यवहारातील वास्तवाचा वेध भावनाशीलतेने घेण्याऐवजी वस्तुस्थितीचे आकलन पायाशुद्ध व गणनीय तपशीलाच्या विश्लेषणाद्वारे करून घेण्याची शिस्त अशी सारी मूल्यपुंजी न्या. रानडे यांनी परिश्रमपूर्वक गाठीला बांधलेली होती, याचे अनंत पुरावे सामाजिक परिषदांदरम्यान त्यांनी केलेल्या विचारविमर्शासह या ग्रंथात संकलित केलेल्या त्यांच्या सगळ्यांच लेखनात आपल्याला आढळतात. इ. स. १८८७ ते १९०० या कालावधीदरम्यान मद्रास, लाहोर, अलाहाबाद, मुंबई, कलकत्ता, नागपूर, पुणे, अमरावती व लखनौ अशा एकंदर नऊ शहरांमध्ये सामाजिक परिषदेच्या आयोजित करण्यात आलेल्या १४ अधिवेशनांदरम्यान न्या. रानडे यांनी साधलेल्या श्रोतृसंवादाचे शब्दांकन या दस्तऐवजामध्ये अंतर्भूत केलेले आहे. तत्कालीन हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या प्रांतांत त्या त्या ठिकाणी साकारत असलेल्या सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक घुसळणीचा एक व्यापक पट त्यांतून आपल्या नजरेसमोर विस्तारतो. स्त्रीशिक्षण, धर्मांतरे, धर्मांतरितांचा मूळ धर्मात पुनर्प्रवेश, बालविधवांचे प्रश्न, आंतरविवाह, विषमविवाह, विवाहसमारंभांदरम्यान केला जाणारा अवास्तव खर्च... अशांसारख्या अनेक तत्कालीन ज्वलंत सामाजिक समस्यांच्यासंदर्भात सुधारणा घडवून आणण्यात बंगाल, मुंबई, मद्रास व मध्य प्रांतासह सुदूर पंजाब व वायव्य प्रांतात सक्रिय असणाऱ्या जवळपास ६० संस्थांचे कार्यअहवाल प्राप्त झाल्याचे न्या. रानडे सामाजिक परिषदेच्या१८९६ साली कलकत्ता येथे आयोजित करण्यात आलेल्या १०व्या अधिवेशनादरम्यान नमूद करतात. लेखी अहवाल सामाजिक परिषदेकडे न पाठविलेल्या अशा अनेक संस्था प्रांतोप्रांती कार्यरत असल्याचेही न्या. रानडे यांच्या निवेदनाद्वारे स्पष्ट होते. इतिहास, समाजशास्त्र, धर्मसुधारणा, स्त्रीविषयक प्रश्न, सामाजिक चळवळी... अशांसारख्या अध्ययन व संशोधनाच्या नाना शाखांमध्ये

उमेदवारी करू इच्छिणाऱ्या आजच्या विद्यापीठीय नवोदित संशोधनेच्छूंच्या शोधप्रतिभेला आवाहन करणारी शेकडोबीजे इथे दडलेली आहेत. समाजसुधारणेच्या बहुविध प्रांतांमध्ये क्रियाशील असणाऱ्या त्या संस्था कोणत्या, त्यांचे संस्थापक कोण, त्यांची स्थापना कधी व का झाली, त्यांच्या कार्याचा विस्तार कसकसा होत गेला, अशा संस्थांना कोणाचे आर्थिक पाठबळ होते का, त्या त्या संस्थांनी हाताळलेल्या सुधारणाप्रांतांतील त्यांचे समर्थक व विरोधक कोण होते, विविध संस्थांनी उचलून धरलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसंदर्भात ब्रिटिश शासकांची भूमिका नेमकी कशी राहिली, संबंधित संस्था ज्या सुधारणा समाजाच्या गळी उतरविण्यासाठी झटत होत्या त्यांच्यामागे कायद्याचे बळ उभे करण्याबाबत ब्रिटिश शासन कितपत तत्पर राहिले, संस्था–संघटनांचे काम ज्या संस्थानांच्या सत्ताक्षेत्रात साकारत होते त्या संस्थानिकांचे त्या संस्थांसंदर्भातील धोरण नेमके कसे राहिले, त्या त्या संस्थेने हाती घेतलेल्या सुधारणाप्रयासांची फलश्रुती तत्कालीन समाजव्यवहारात कशा प्रकारे प्रतिबिंबित झाली, तेव्हा स्थापन झालेल्या संस्थांचे काही अवशेष आज शिल्लक आहेत का, त्या त्या संस्थांनी ज्या ज्या सुधारणांना त्या काळात हात घातला त्या प्रश्नांचे आजचे स्वरूप नेमके कसे आहे... अशांसारख्या नानाविध रोचक पैलूंसंदर्भातील संशोधन, समजा, व्यक्तिगत स्तरावर आणि/अथवा संस्थात्मक पातळीवर आज प्रवर्तित करता आले तर इतिहासाच्या समकालिनत्वाचे अक्षरश: अनंत कवडसे उजळून निघतील. न्या. रानडे आणि त्यांच्या समानधर्मा प्रवृत्तींनी सामाजिक परिषदेसारख्या व्यासपीठाचे प्रवर्तन १९व्या शतकात घडवून आणण्यामागील प्रेरणांची विद्यमान प्रस्तुतता मग निराळी विशद करावी लागणार नाही.

सामाजिक परिषदेचे पहिले अधिवेशन मद्रास येथे १८८७ साली भरले असले तरी परिषदेची स्थापना मात्र १८८६ सालीच झालेली होती. मुळात, सामाजिक परिषदेच्या संकल्पनेचे जनक न्या. रानडे हेच होते. राष्ट्रीय सभा आणि सामाजिक परिषद या दोन्ही संस्थांची कार्यक्षेत्रे व उद्दिष्टे परस्परांना अतिशय पूरक असल्याने या दोन व्यासपीठांनी एकत्रितरीत्या कार्यरत राहावयास हवे, हीच त्यांची मनोमन इच्छा सामाजिक परिषदेच्या स्थापनेपासूनच होती... – ***सामाजिक परिषद व काँग्रेस (अर्थात, राष्ट्रीय सभा) परस्परांशी इतके घनिष्ठरित्या जोडलेले आहेत की, एकाला मदत करून दुसऱ्याला दूर लोटता येणार नाही; काँग्रेस व सामाजिक परिषद या एकमेकांच्या बहिणी आहेत; त्यांनी परस्परांच्या हातात हात घालून पुढे जायला हवे, तरच खरी प्रगती साधता येईल. लोकांचे कल्याण साधणे, हे सामाजिक परिषदेचे उद्दिष्ट आहे,***

***तर देशाची प्रगती साधणे हे काँग्रेसचे उद्दिष्ट आहे...*** – अशी जी निखळ भावना न्या. रानडे यांनी १८९१ साली सामाजिक परिषदेच्या नागपूर येथे भरलेल्या पाचव्या अधिवेशनादरम्यान हिस्लॉप महाविद्यालयात केलेल्या भाषणामध्ये व्यक्त केली तिचे मूळसूत्र नेमके तेच दिसते. सामाजिक सुधारणांच्या पर्वाचे आद्य शिल्पकार गणले जाणारे महात्मा जोतीबा फुले आणि 'लोकहितवादी' गोपाळ हरि देशमुख हे दोघे खंदे लोकाग्रणी न्या. रानडे यांचे त्या क्षेत्रातील पूर्वसुरी. बंगालमध्ये आकारास आलेला ब्राह्मो समाज, त्यानंतर मुंबई येथे स्थापन झालेली परमहंस सभा, प्रथम मुंबईतच स्थापन झालेला प्रार्थना समाज, गणेश वासुदेव जोशी ऊर्फ 'सार्वजनिक काका' यांच्या कल्पकतेतून जन्माला आलेली सार्वजनिक सभा, महात्मा फुल्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज या, सामाजिक परिषदेच्या अवतारापूर्वी समाजसुधारणांच्या प्रांतात सक्रिय बनलेल्या संस्थांचा कार्यकलाप न्या. रानडे यांनी डोळसपणे अभ्यासलेला होता. प्रार्थना समाज आणि सार्वजनिक सभा या दोन संस्थांच्या कार्यात तर त्यांचा सहभागच होता. सामाजिक परिषदेच्या पूर्वकालीन त्या सगळ्या संस्था समाजसुधारणांच्या क्षेत्रात करत असलेले कार्य आणि त्याला तत्कालीन जनमानसाचा मिळत असलेला प्रतिसाद न्या. रानडे अनुभवत होते. समाजातील उच्चभ्रू व उच्चवर्णीय घटकांच्या नेतृत्वाखाली समाजसुधारणांच्या त्या आदिपर्वात कार्यरत असलेल्या तशा संस्थांबाबत तत्कालीन समाजातील बहुजनांना वाटत असणाऱ्या अविश्वासाची प्रत्यक्ष प्रचिती 'मराठी ग्रंथकार मंडळी'च्या अधिवेशनाचे निमंत्रण महात्मा फुले यांनी ज्या कारणापायी नाकारले त्यांद्वारे न्या. रानडे यांना आलेली होती.

ब्रिटिश सत्तेच्या अंमलाचे वास्तवातील रंगरूप हळूहळू उलगडू लागलेले या समाजातील काही घटक क्रमाक्रमाने जागृत होत असल्याची सूक्ष्म चिन्हे अचूकपणे हेरून त्या नवजाणिवांना राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी सज्ज बनविण्याच्या दिशांनी विचारप्रवण होण्यात न्या. रानडे यांचे प्रगट होणारे अलौकिकत्व प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीला दिनशा एडलजी वाच्छा यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेमध्ये नेमकेपणाने शब्दबद्ध झालेले आहे. ***– हजारो वर्षांच्या निद्रेतून भारत आता जागा होत असल्याचे रानड्यांइतक्या अचूकपणे इतर कोणाच्या लक्षात आले नसावे... ब्रिटिशांच्या प्रतिभेद्वारे आपल्या देशाच्या पुनरुत्थानामध्ये कोणती गोष्ट साध्य करता येईल, हे रानड्यांना इतिहासाच्या विशाल ज्ञानामुळे व राजकीय अनुभवामुळे लक्षात आले होते. आपल्या देशाच्या नैतिक व भौतिक प्रगतीसाठी ब्रिटिशांची प्रतिभा कोणत्या शक्यता खुल्या करेल***

***याचे आकलन त्यांना झाले होते आणि त्याचे मूल्य त्यांना जाणवले होते. त्या समजुतीद्वारे त्यांनी शांततादायी गुरूची शुभ्र वस्त्रे परिधान केली, आणि अत्यंत सक्षमपणे व परिश्रमपूर्वक त्यांच्या कमी प्रबुद्ध असलेल्या देशवासीयांना पुनरुत्थानाच्या महाकाय कार्याची जाणीव करून द्यायचा प्रयत्न केला. रानडे गुरू म्हणून सर्वाधिक ओळखले जातील आणि अनेक पिढ्या त्यांची आठवण काढतील...*** – हे वाच्छा यांचे विवेचन न्या. रानडे यांच्या अवघ्या कार्यकर्तृत्वामागील व्यापक प्रेरणांकडे अचूक निर्देश करते.

न्या. रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्याच प्रस्तावनेमध्ये, दिनशा वाच्छा यांनी नोंदविलेला आणखी एक विशेष विलक्षण मननीय होय. उदंड तितिक्षा आणि असीम आशावाद हे न्या. रानडे यांचे दोन स्वभावविशेष,– ***एकामागून एक आलेल्या देशी व परदेशी आक्रमणांच्या लाटांमुळे अवनत अवस्थेला गेलेल्या भारताला किती मार्गांनी पुन्हा पूर्वीच्या शिखरावर नेता येईल, आणि तसे करत असताना समकालीन प्रेरणेशी व सभ्यतेशी सुसंवाद कसा राखता येईल, याचा ते अथकपणे विचार करत होते. त्यांच्या काळजात अमर्याद आशावाद होता. त्यांचं जगणं, एकंदर वावर आणि त्यांचं अस्तित्वच आशेवर केंद्रित होते. ...त्यांच्या या आशेला झळाळत्या पण सहज नजरेत न भरणाऱ्या देशभक्तीची तटबंदी लाभली होती आणि हा आशावाद त्यांच्या लिखाणातही झळकत असे. त्यांच्या अवतीभवती सर्वत्र निराशा खोलवर पसरली असेल आणि वेगवेगळ्या काळात देशावर खिन्नतेचे सावट आलेले असेल, तरी रानडे कधीच निराश होत नसत. त्यांच्या स्थितप्रज्ञतेचे, पण व्यवहाराचा विचार करणारे तत्त्वज्ञान त्यांना कधीही निराश होऊ देत नसे, उलट प्रत्येक निराशेवर मात करायची शिकवण त्यांना या तत्त्वज्ञानातून मिळाली होती...*** अशा अतिशय नेमक्या शब्दांत वाच्छा यांनी मांडलेले आहेत. असीम आणि उदंड आशावाद हा गुणविशेष न्या. रानडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बनलेला स्थायीभाव त्यांच्यावर भागवत धर्मविचाराचे जे संस्कार घडून आलेले होते त्यांचा परिपाक असावा, याची खूण द्वा. गो. वैद्य यांनी संकलित केलेल्या न्या. रानडे यांच्या भागवत धर्मपर व्याख्यानांमध्ये आपल्याला स्पष्टपणे गवसते. **'हा तों नव्हे कांहीं निराशेचा ठाव । भले पोटी वाव राखिलिया ।।'** असा पहिला चरण असलेला तुकोबांचा एक अभंग न्या. रानडे यांनी निरुपणासाठी त्यांच्या एका व्याख्यानामध्ये घेतलेला होता. त्या वेळी, त्या अभंगाचा गाभा विवरण करतेवेळी, – ***आपणांस निराश होण्याचें कारण नाहीं, पोटामध्यें सहनशीलतेस पुष्कळ जागा राखिली म्हणजे झालें... परंतु विचारपूर्वक पाहिलें तर निराश होण्याचें***

***कारण आहे काय ? मुळींच नाही! आजच्या स्थितींत आमचें पाऊल पुढें पडत आहे, किंवा मागें पडत आहे ह्याचा विचार केला तर आम्हीं पुढेंच चाललों आहों असेंच म्हणावें लागेल. मात्र आपणास थोडा धीर धरला पाहिजे. धीरानें प्रत्येक गोष्ट घेत गेल्यास निराशेचें कारण नाहीं...*** – हे न्या. रानडे यांनी केलेले प्रतिपादन त्या वास्तवाकडे पुरेपूर निर्देश करते. किंबहुना, सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून उपस्थितांबरोबर साधलेल्या संवादादरम्यान परिषदेशी संबंधित असलेल्यांचे मनोबळ अभंग राहावे यासाठी न्या. रानडे असेच प्रेरक विवेचन वेळोवेळी करत असल्याचे दाखले या ग्रंथात आपल्याला अनेक ठिकाणी दृष्टोत्पत्तीस येतात.

'ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक' या नात्याने भारतीयांच्या मागण्या, अपेक्षा व हक्क मुखर करण्याचे राजकीय व्यासपीठ म्हणून राष्ट्रीय सभा सक्रिय बनत असली तरी ते पुरेसे नाही, हे न्या. रानडे पुरते उमगून होते. नागरिकत्वाचे रास्त हक्क पदरात पाडून घेण्यासाठी आवाज उठविण्यापूर्वी भारतीयांनी प्रथम खऱ्या अर्थाने नागरिकत्व अंगी संपादन करावयास हवे, ही न्या. रानडे यांची दृढ धारणा होती. प्रार्थना समाजाच्या माध्यमातून भागवत धर्मविचाराचे जे परिशीलन त्यांनी आरंभलेले होते त्यांद्वारा, उत्तम गुण अंगी बाणवलेले नागरिक निर्माण करणे, हे भागवत धर्माचे रहस्य होय या निर्णयाप्रत येऊन पोहोचणे यांत न्या. रानडे यांच्या धर्मचिंतनाचे आगळे वैशिष्ट्य प्रतीत होते. धर्मशील मनाने व बुद्धीने भागवत धर्मविचाराच्या झालेल्या आकलनानुसार नागरिकतेचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ ***– भागवतधर्म मात्र असें सांगतो कीं, केवळ सुखप्राप्तीकडे लक्ष दिलें असतां या धर्माचें रहस्य कोणाला कळणार नाहीं. ...एकंदरीनें नागरिकपणा अथवा सुधारणा म्हणजे चांगल्या गुणांचा अतिशय असणें हाच नियम असतो... नागरिकांस शरीराचे व मनाचें परिश्रम करण्याची उच्च प्रतीची योग्यता अधिक असते. त्यांच्या ज्ञानाचा परीघ मोठा असतो. त्यांच्यावर प्रतिक्षणीं चांगले संस्कार अधिक होत असल्यामुळें चांगल्या वृत्तींचा विकास जास्त होतो. ते शरीरानें दुर्बळ असले, तरी एक क्षमता अधिक व विकास अधिक असल्यामुळें पुष्कळ कार्यभाग होतो... सारांश, विकास अधिक होणें आणि क्षमता अधिक येणें, हाच नागरिकतेचा मुख्य हेतु, हेंच नागरिकतेचें मुख्य लक्षण आहे. धर्माचाही प्रकार व हेतु असाच आहे...*** – अशा शब्दांत भागवत धर्मपर एका व्याख्यानादरम्यान त्यांनी विशद केलेला होता, ही बाब या संदर्भात लक्षणीय ठरते. राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून राजकीय हक्क व स्वातंत्र्याच्या मागणीचा कितीही जोमदारपणे पुकारा केला तरी स्वत:च्या क्षमतांच्या संवर्धनाद्वारे जोवर आपण एक समाज म्हणून आपले

सक्षमीकरण साध्य करत नाही तोवर त्या मागण्यांना व्यवहारात फारशी अर्थवत्ता व वजन प्राप्त होणार नाही, या भूमिकेवर, अफाट व्यासंग आणि समकालीन राजकीय व सामाजिक पर्यावरणाचे सूक्ष्म आकलन यांद्वारे न्या. रानडे स्थिर झालेले असले पाहिजेत. खऱ्याखुऱ्या नागरिकत्वाच्या क्षमता अंगी निर्माण करण्याचा 'सामाजिक सुधारणा' हा हुकुमी मार्ग असल्यामुळेच राजकीय हक्कांच्या मागणीस सामाजिक सुधारणांची जोड देणे हे केवळ अत्यावश्यकच नव्हे तर अनिवार्य आहे, यांबद्दल न्या. रानडे पराकोटीचे ठाम होते. राष्ट्रीय सभेच्या जोडीनेच सामाजिक परिषददेखील स्थापन करण्यामागील न्या. रानडे यांची हीच दृष्टी होती. केवळ इतकेच नाही तर, राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला जोडून त्याच मंडपात सामाजिक परिषदेचेही वार्षिक अधिवेशन भरवण्याबाबत न्या. रानडे सतत पाठपुरावा व पुकारा करत राहिले त्यांमागील सूत्रही तेच.

सामाजिक सुधारणा म्हणजे निव्वळ वरपंग नव्हे, हे अधोरेखित करण्यात न्या. रानडे यांच्या बुद्धीची विशालता आणि प्रतिभेची तरलता दडलेली आहे. व्यक्तीचे अंतरंग आणि बहिरंग यांत द्वैत असेल तर सुधारणांचा हेतू मुळातच फसतो, ही न्या. रानडे यांच्या जाणिवेची सूक्ष्मता त्यांच्या समकालीनांना तरी कितपत उमजली असेल याची शंकाच आहे. समाजात साकारणाऱ्या सुधारणा हे व्यक्तींच्या अंतरंगपालटाचे प्रगटीकरण असते, या सूत्राचा न्या. रानडे यांना ना कधी विसर पडला ना त्यांनी तो इतरांना कधी पडू दिला. भागवतधर्मप्रणीत संतबोधाचे न्या. रानडे यांनी अंत:करणात जिरवलेले संस्कार त्यांच्या त्या धारणेद्वारे पृष्ठभागावर येतात. बाहेरच्या जगात घडवून आणावयाच्या सुधारणांना सरसावण्यापूर्वी प्रत्येकाने प्रथम आंतरिक परिवर्तनाला प्रवृत्त व्हायचे असते, याचे सुस्पष्ट भान १८९१ साली नागपुरातील हिस्लॉप महाविद्यालयातील भाषणादरम्यान,...– ***सुधारणांना पाठिंबा द्या, असे आवाहन केल्यावर आपल्या बाहेर काहीएक वस्तुनिष्ठ वास्तव आहे आणि त्यावर आपल्याला उपाय करायचा आहे असे काही जणांना वाटते. परंतु, प्रत्यक्षात तसे नाही. आपल्याला स्वत:मध्ये सुधारणा करायची आहे – स्वत:चे अंत:करण, बुद्ध व अंतरात्मा यांमध्ये सुधारणा करायची आहे, स्वत:चे पूर्वग्रह दूर करायचे आहेत, स्वत:च्या अंध:श्रद्धांचे उच्चाटण करायचे आहे, स्वत:चे धाडस बळकट करायचे आहे, स्वत:च्या दुर्बलतेवर मात करायची आहे, किंबहुना सध्याच्या काळाशी, या युगाच्या प्रेरणेशी अनुरूप ठरेल अशा रितीने स्वत:चा स्वभाव पुन्हा घडवायचा आहे...*** – अशा निरपवाद शैलीत न्या. रानडे आणून देतात.

समाजमन म्हणजे दुसरे-तिसरे काही नसून ते अगणित व्यक्तिगत मनांचे एकत्रित असे बाह्यरूप असल्यामुळे 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' याच न्यायाने लोकव्यवहार आपल्याला समजावून घ्यावा लागतो, याची प्रगल्भ जाणीव न्या. रानडे यांच्या ठायी सतत जागृत असे. व्यष्टीच्या अंत:करणात दडलेले इष्ट-अनिष्ट विचार आणि सुरूप-कुरूप भावभावनाच समष्टीचे रंगरूप निश्चित करत असतात, हे सारभूत तत्त्व पचवलेले न्या. रानडे, म्हणूनच, समाजपुरुषाच्या जीवनातील विरुपतेचे निराकरण घडवून आणण्याच्या प्रयत्नांचा प्रारंभ प्रथम स्व-सुधारणेपासून करावयास हवा, हे विलक्षण सूक्ष्म व तितकेच मूलभूत तत्त्व, - ***आपण विरूप झाल्याचे सर्वच कबूल करतात. आपण स्वत:चा लौकिक गमावून बसलो आहोत, आपण शेकडो ठिकाणी वाकलो आहोत, आपले डोळे निषिद्ध गोष्टींची लालसा राखून असतात, आपले कान शेजाऱ्यांच्या कुलंगड्या ऐकण्यासाठी आतूर असतात, आपल्या जिभेला निषिद्ध फळांची चव चाखायची असते, आपल्या हातांना दुसऱ्या माणसाच्या संपत्तीची खाज सुटलेली असते, आपले पोट अपचनीय अन्नामुळे बिघडलेले असते. आपल्याला स्वत:च्या पायांवर चालता येत नाही; त्यासाठी आपल्याला घोडागाडी किंवा कुबड्या लागतात. अशी आपली विद्यमान समाजसंस्था आहे, आणि आपल्याला आता ही विरुपता दूर करायची आहे...*** - इतक्या नि:संदिग्ध शब्दांत सामाजिक परिषदेच्या १८९७ साली अमरावती येथे भरलेल्या ११व्या अधिवेशनाच्या व्यासपीठावरून उपस्थितांचे उदबोधन करताना विशद करतात.

सामाजिक प्रगतीच्या प्रांतात क्रांतीऐवजी उत्क्रांतीचे तत्त्वच उचित, अनुरूप आणि म्हणून स्वीकारार्ह ठरते, ही न्या. रानडे यांची श्रद्धा याच अधिष्ठानावर बेतलेली आहे. आंतरिक सुधारणा, त्यांद्वारे साकारणारी बाह्य सुधारणा आणि या दोहोंच्या माध्यमातून निष्पन्न होणारी उन्नयनाची प्रक्रिया म्हणूनच संथ असते, हे न्या. रानडे यांचे अनुभवसिद्ध गृहीतक याच कार्यकारणभावावर उभारलेले राहिले. - ***प्रगतीची - खात्रीशीर प्रगतीची - प्रक्रिया कायमच संथ असते. सर्वोत्तम स्वभाववृत्तीच्या मंडळींना स्वाभाविकपणे ही दीर्घ प्रक्रिया कमी कालावधीची व्हायला हवी असते, त्यामुळे त्यांना शतकभराचे कार्य एका दशकात साधण्याची इच्छा होते. हा मोह टाळायला हवा, आणि या संदर्भात उत्क्रांतीच्या तत्वातून मिळणारी शिकवण प्रचंड ताकदीची आहे, कारण वृद्धी संरचनात्मक व सेंद्रीय असते आणि संबंधित जीवाच्या सर्व भागांवर तिचा संथपणे परिणाम व्हायला हवा, त्यात कोणाकडे दुर्लक्ष करू न इतरांना प्राधान्य देता येत नाही, हे त्यांतून आपल्याला शिकायला मिळते...***

– या, सामाजिक परिषदेच्या अलाहाबाद येथे १८९२ साली आयोजित करण्यात आलेल्या सहाव्या परिषदेदरम्यान न्या. रानडे यांनी मांडलेल्या विश्लेषणाची प्रस्तुतता खरोखरच चिरंतन होय. 'समाज' हेदेखील एक जिवंत, चैतन्यमय अस्तित्वच होय. त्यामुळे सृष्टीतील वरकड जिवांचा वाढविकास ज्या न्यायाने घडत राहतो तोच न्याय सामाजिक विकासालाही तितकाच लागू पडतो, या अतिशय तर्कशुद्ध सूत्राचे नि:संदिग्ध सूचन न्या. रानडे यांनी समाजाच्या विविध अंगांतील सुधारणांना समांतर पद्धतीने संस्थात्मक चालना दिली त्यांद्वारे आपल्याला घडते. राजकीय चळवळीचा सांधा सामाजिक सुधारणांपासून तोडण्यास त्यांचा निरंतर विरोध राहिला तो त्याच भूमिकेतून. सामाजिक सुधारणांच्या प्रवर्तनामागील त्यांची ती एकात्म व सम्यक् दृष्टी, **...– *राजकीय अधिकारांच्या बाबतीत आपण कमकुवत असू, तर आपल्याकडे चांगली समाजव्यवस्था निर्माण होणार नाही, तसेच आपली समाजव्यवस्था विवेक व न्याय यांवर आधारलेली नसेल तर राजकीय अधिकार व विशेषाधिकार अंमलात आणण्यासाठी आपण पात्र ठरणार नाही. आपल्या सामाजिक रचना सदोष असतील, तर आपल्याकडे चांगली आर्थिक व्यवस्था निर्माण होऊ शकणार नाही. आपले धार्मिक आदर्श कमकुवत व लोटांगण घेणारे असतील, तर आपण सामाजिक, आर्थिक वा राजकीय अवकाशांमध्ये यश मिळवू शकणार नाही. हे परस्परावलंबित्व अपघाताने आलेले नाही, तर हा आपला स्वभावधर्म आहे. आपल्या शरीरातील अंतर्गत अवयव व्याधिग्रस्त असतील, तर हाता–पायांमध्ये बळ येणार नाही. मानवी शरीराला लागू होणारा हाच नियम समाज किंवा राज्य म्हणून संबोधल्या जाणाऱ्या सामूहिक मानवतेलाही तितकाच लागू होतो. राजकीय प्रश्नांना सामाजिक व आर्थिक प्रश्नांपासून वेगळे काढून पाहणारा दृष्टिकोन चुकीचा आहे...*** – या, १९०० सालातील मे महिन्यात सातारा येथे भरलेल्या मुंबई प्रांतिक सामाजिक परिषदेच्या त्यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणात समग्रपणे व्यक्त झालेली दिसते.

तत्कालीन समाज, त्या समाजाच्या व्यवहारातील त्रुटी आणि त्यांचे निराकरण घडवून आणण्यासाठी निकडीची असणारी बहुमिती उपचारप्रणाली यांबाबतचे न्या. रानडे यांचे आकलन, राजकीय आणि सामाजिक सुधारणांना समांतर चालना दिली जाणे केवळ अगत्याचेच नव्हे तर अनिवार्य ठरते, या निष्ठेच्या मुळाशी अखंड राहिले. व्यक्तीचे शारीर अस्तित्व एकमयच असते. त्यामुळे, शरीराच्या कोणत्याही एखाद्या अवयवात निर्माण झालेली विकृती अन्य अवयवांच्या तसेच शरीरांतर्गत विविध व्यवस्थांच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम घडवून आणत असते. त्यामुळे,

औषधोपचार करतेवेळी तज्ज्ञ वैद्य संबंधित रुग्णाच्या एकंदर शरीरप्रकृतीचे भान ठेवत उपचारांची दिशा निश्चित करत असतो. या अर्थाने न्या. रानडे हे मुरलेले समाजवैद्य ठरतात. मात्र, त्यांच्या समकालीन जहालमतवादी सनातन्यांना ही भूमिका कधीच कळली नाही आणि त्यांमुळे पटलीही नाही. एतद्देशीय समाजमन स्वातंत्र्यप्रवण करण्यासाठी सर्व वृत्ती–प्रवृत्ती त्या टप्प्यावर जाग्या होऊ लागलेल्या होत्या. अशा वेळी, त्या प्रयत्नांची शक्ती दुभंगली जाणे धोक्याचे ठरले असते. केवळ त्याच व्यापक भूमिकेमधून केवळ निरुपाय म्हणून नाईलाजाने सामाजिक प्रश्न व त्यांची चर्चा राष्ट्रीय सभेच्या कार्यकक्षेबाहेर ठेवावी लागत असल्याची हतबलता, दिनशा वाच्छा यांनी, ...**– *आम्ही सामाजिक प्रश्न चर्चाविमर्शासाठी घेतले, तर त्यातून गंभीर मतभिन्नता निर्माण होईल, आणि अखेरीस दुफळी माजेल, परंतु फूट रोखणे हा आपल्यासाठी सर्वांत महत्वाचा विषय आहे, या कारणामुळे आम्ही सामाजिक प्रश्न आमच्या चर्चेतून वगळले. समोरच्या पक्षाने केलेली विनंती अतिशय अवाजवी आहे; पण काही वेळा अधिक मोठ्या अनिष्ट गोष्टी टाळण्यासाठी आपल्याला अवाजवी मागण्यांपुढे नमते घ्यावे लागते...* –** अशा अगतिक शैलीत पत्र लिहून न्या. रानडे यांना कळविली. सदर पत्र, सामाजिक परिषदेच्या १८९५ साली पुणे येथे भरलेल्या नवव्या अधिवेशनादरम्यान न्या. रानडे यांनी उपस्थितांना वाचून दाखविले. नेमकी अशीच परिस्थिती आपल्या समाजव्यवहारात आजही अनेक बाबतींत अनुभवास येते.

'सुधारक' आणि 'सनातनी' यांच्यादरम्यान त्या संपूर्ण विरोधपर्वात झडत राहिलेल्या संघर्षठिणग्यांचा वर्षाव न्या. रानडे आणि त्यांच्या समानधर्मा सुधारकचमूने विलक्षण तितिक्षेने सहन केला. सनातनी विरोधकांच्या हिंसक अशा वैचारिक हल्ल्यांचा प्रतिकार शांततामय रीतीनेच करण्याचे आपले तत्व सोडायचे नाही आणि काहीही झाले तरी आपल्या वाणी–विचारांना प्रतिहिंसेची भावना कणमात्रही स्पर्शू न देता संयमाने आपण आपल्या मार्गाने वाटचाल करत राहायचे, ही कार्यपद्धती अ–साधारण अशा मनोबळाची मागणी करणारी असते. अंतर्बाह्य धर्मशील असणाऱ्या न्या. रानडे यांच्यापाशी तशा मनोबळाची वानवा कधीच नव्हती. परंतु, सामाजिक परिषदेच्या प्रांगणातील सगळ्यांपाशीच तितका संयम व तितिक्षा नसावी, याची कल्पना असल्यामुळे सामाजिक परिषदेच्या व्यासपीठाचा विनियोग कार्यकर्त्यांचे मनोबळ बुलंद राखण्यासाठी करण्याचा परिपाठ न्या. रानडे यांनी आस्थेने जपल्याच्या अनेक खुणा त्यांच्या विवेचनादरम्यान आपल्याला आढळतात...– ***या संघर्षाच्या पातळीवर आपल्याला विरोध करणाऱ्यांच्या बाबतीत आपली वृत्ती कशी असायला***

*हवी, याचा विचार करणे हे सर्वच सुधारकांचे कर्तव्य आहे... सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सहनशीलता कशी दाखवायची व संयम कसा राखायचा हे आपण शिकायला हवे. खिल्ली उडवली जाणे, अपमान, वेळप्रसंगी वैयक्तिक इजा सहन करणे आणि अत्याचाराला अत्याचाराने उत्तर देण्यापासून संयम राखणे महत्त्वाचे आहे...* – हे, सामाजिक परिषदेच्या पुणे येथे १८९५ साली भरलेल्या नवव्या अधिवेशनादरम्यान न्या. रानडे यांनी केलेले प्रतिपादनवजा आवाहन या संदर्भात मननीय ठरते. विवेचनादरम्यान, न्या. रानडे यांनी, प्रसंगी, संभाव्य वैयक्तिक इजाही सहन करण्याबाबत केलेला निर्देश विशेष महत्त्वाचा आहे. न्या. रानडे यांची भागवत धर्मपर व्याख्याने जशी विख्यात आहेत तशीच प्रार्थना समाजाच्या उपक्रमातील त्यांचे ज्येष्ठ समानधर्मा व ख्यातकीर्त संस्कृततज्ज्ञ डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांची धर्मपर व्याख्यानेदेखील प्रतिष्ठित आहेत. त्यांपैकी एका व्याख्यानामध्ये डॉ. भांडारकर यांनी भगवान बुद्ध व त्यांचे एक शिष्य प्रत्यंत यांची एक कथा विदित केलेली आहे. समाजव्यवहार सुधारण्यासाठी प्रवर्तित होणाऱ्या समाजमनस्काने मनाची धारणा कशा पद्धतीने करावयास हवी, याचे प्रबोधन संवादाच्या माध्यमातून भगवान बुद्ध आपल्या शिष्याला करतात. जग सुधारण्यास कटिबद्ध होण्यापूर्वी स्वत:मध्ये आंतरिक उन्नती घडवून आणत मग समाजव्यवहार सुभग बनविण्यास सक्रिय बनणाऱ्या समाजहितेच्छूने स्वत:च्या अंत:करणाची स्थिती कशी राखावी, यांबद्दल प्रबोधन करताना, त्या कथेचा संदर्भ देऊन डॉ. भांडारकर म्हणतात, ...– *सर्व धर्मांतील गुणदोषांचें योग्य निरीक्षण करून आपण स्वत:ची उन्नति करून घेऊन नंतर राष्ट्राची करण्याचा प्रयत्न करावा. दुसऱ्यांचा उद्धार करत असतांना बौद्ध धर्माचें जें धोरण होतें, तें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. बुद्धाचा एक शिष्य पूर्ण नांवाचा प्रत्यंत म्हणजे देशाच्या सीमेवर राहणारे रानटी लोकांमध्यें उपदेशास निघाला असतां बुद्धांनीं त्याला म्हटलें, त्या लोकांनीं तुला शिव्या दिल्या तर तूं काय करशील? पूर्णानें उत्तर दिलें, त्यांनीं मला काठी मारली नाहीं म्हणून मी त्यांचे उपकार मानीन. त्यांनीं काठी मारल्यावर तूं काय करशील? असा प्रश्न बुद्धांनीं विचारल्यावर त्यानें उत्तर केलें कीं, त्यांनी मला इजा केली नाहीं असें मानून मी त्यांचे आभार मानीन आणि त्यांनीं तुला पुष्कळ इजा केली तर, असें बुद्ध प्रभूंनीं विचारतांच तो ह्मणाला, मला जिवें मारलें नाहीं ह्मणून की त्यांना उत्तम म्हणेन. जिवें मारल्यावर तूं काय करशील ? असें विचारल्यावर त्यानें उत्तर केलें कीं, मी मुक्त होईन. अशा प्रकारचा भाव आपल्या अंगीं असला पाहिजे...* –विशुद्ध अंत:स्फूर्तीने समाजसुधारणेसाठी कार्यरत होणाऱ्या कोणाही

समाजमनस्काला अगदी आजदेखील डॉ. भांडारकरांनी नमूद केलेली ही कथा मार्गदर्शक ठरावी.

सामाजिक परिषदेला, तिच्या कार्याला आणि परिषद प्रवर्तित करू पाहत असलेल्या सुधारणांना न्या. रानडे यांच्या समकालीन सनातनी विरोधकांकडून सतत कडवा व जहरी विरोध होतच राहिला. भारतीय समाजाला त्याचे गतवैभव आणि रास्त व न्याय्य प्रतिष्ठा सर्वंकष सुधारणांचा पंथ अनुसरण्यानेच प्राप्त होईल, असे सुधारक पक्षाचे प्रतिपादन होते. त्या उलट, पूर्वकालीन प्रथा-परंपरांचे पुनरुज्जीवन केले जाण्यानेच एतद्देशीय समाज गतश्रेष्ठत्वास पावेल, असा सनातन्यांचा दावा होता. साहजिकच, सुधारक व सुधारणा यांना उग्र प्रतिरोध करणाऱ्या सनातन्यांचा कल व आग्रह त्यांमुळे राहिला पुनरुज्जीवनाबाबत. न्या. रानडे दिवंगत होऊन आता सवाशे वर्षे होत आल्यानंतर आज पुन्हा आपल्या समाजात आग्रह मूळ धरताना दिसतो आहे तो प्राचीन प्रथा-परंपरांच्या पुनरुज्जीवनाचाच! परंतु, पुनरुज्जीवन नेमके कशाचे करावयाचे यांबाबत मात्र स्पष्टतेचा घाऊक अभावच सर्वत्र दिसतो. सुधारणांचा पर्याय त्यागून पुनरुज्जीवनाचा पंथ स्वीकारण्याबाबत आक्रमकपणे आग्रही असणाऱ्या समकालीन सनातन्यांना अंमळ अंतर्मुख बनविण्याचा प्रयास,... – ***आपले प्रयत्न पुनरुज्जीवनाच्या दिशेने असावयास हवेत, सुधारणेच्या नव्हे, असे सनातनी घटकांचे म्हणणे असते... आपण पुरातन मार्गांकडे परत जायला हवे, आणि पुरातन अनुज्ञा व पुरातन मान्यता परत आणायला हव्यात, असे ते म्हणतात... इथेही लोक स्वत:च्या शब्दांचा पूर्ण अर्थ लक्षात न घेताच बोलत असतात. आपल्या पुरातन प्रथा व रूढी पुनरुज्जीवित करायला हव्यात, असे सांगितले जाते तेव्हा नक्की कशाचे पुनरुज्जीवन करायचे याबद्दल लोक संभ्रमात असल्याचे दिसते. आपल्या इतिहासातील कोणता विशिष्ट कालखंड पुरातन म्हणून स्वीकारायचा ? वेदांचा, स्मृतींचा, पुराणांचा कालखंड पुरातन मानायचा की, मुस्लिम वा आधुनिक हिंदू काळ पुरातन मानायचा?... माझे पुनरुज्जीवनवादी मित्र त्यांचा युक्तिवाद माझ्यापुढे आग्रहाने मांडू पाहतात, तेव्हा त्यांना कोणत्या ना कोणत्या पळवाटेचा आधार शोधावा लागतो. पण आपण कशाचे पुनरुज्जीवन करणार आहोत, या प्रश्नाचे खरे उत्तर त्यातून मिळत नाही... शिवाय, समाज एक सजीव अस्तित्व असते, त्यात पुनरुज्जीवन शक्य नाही, याचाही विसर पडत असल्याचे दिसते... मृत भूतकाळाचे पुनरुज्जीवन करता येत नाही. फक्त जुन्या सामग्रीला नवीन संघटित अस्तित्वामध्ये सुधारुन घेणे मात्र शक्य असते. पुनरुज्जीवन अशक्य असते, त्यामुळे सुधारणा हा सुज्ञ लोकांसाठी खुला असणारा***

***एकमेव पर्याय आहे...*** –अशा शब्दांत न्या. रानडे यांनी सामाजिक परिषदेच्या १८९७ साली अमरावती येथे भरलेल्या ११व्या अधिवेशनादरम्यान केलेला दिसतो. कितीही व काहीही कसेही समजावून सांगण्याचा प्रयत्न केला तरी 'कळते पण वळत नाही', हा सर्वसाधारण मानवी मनाचा स्वभाव असल्याचे न्या. रानडे पुरते जाणून होते. त्यांमुळे, पुनरुज्जीवन अशक्य आहे, हे समजूनही ते वास्तव न पचवू शकणारे समाजघटक ज्या वेळी पुनरुज्जीवनाबाबतचा आपला हेका पुढे चालूच ठेवतात तेव्हा, गतकाळात गडप झालेल्या प्रथा–परंपरांचे पुनरुज्जीवन आमच्या अंतर्मनाचे उन्नयन घडवून आणण्यासाठी उपयुक्त ठरणार असेल तरच ते एकवेळ स्वीकारार्ह ठरेल, असा युक्तिवाद...– ***पुनरुज्जीवन अशक्य असल्याचे मी सांगितलेच आहे...परंतु, समजा हे शक्य असते, तरी त्यातून आपली व आपल्या भवतालाची सुधारणा होणार असेल, आपण अधिक समर्थ, अधिक शूर व अधिक अस्सल माणसे होणार असू, आपल्या सहनशक्तीचा विकास होणार असेल, आपली सहानुभूती पूर्णत: जागरूक होणार असेल, आपली बुद्धी आणि भावना शुद्ध व पवित्र इच्छेने एकरूप होऊन कृती करणार असतील, आपल्याला स्वत:च्या असण्याची प्रतिष्ठा व आपल्या अस्तित्वाची उच्च नियती जाणवणार असेल, आपण सर्वांवर प्रेम करणार असू, सर्वांसोबत काम करणार असू आणि सर्वांबाबत सहभाव राखणार असू, तरच ते पुनरुज्जीवन उपयुक्त म्हणता येईल. हे सुधारकाचे कार्य असते. याच कारणामुळे सामाजिक परिषदेचे आयोजन दर वर्षी केले जाते आणि आपले म्हणणे कान देऊन ऐकणाऱ्यांपर्यंत यातील स्वरमेळ पोचावा यासाठी प्रयत्न केले जातात, असे मला वाटते...*** – अशा शब्दांत एकीकडे करत न्या. रानडे सामाजिक परिषदेच्या उपक्रमाचे प्रयोजनही अधोरेखित करतात.

भूतकाळाचे अ–यथार्थ वाचन व आकलन आणि सामाजिक सुधारणांना प्रतिरोध यांपायीच हिंदू व मुसलमानांमधील दुफळी व द्वैत आपली पाठ सोडत नाही, ही आपली दृढ धारणा न्या. रानडे यांनी सामाजिक परिषदेच्या १८९९ साली लखनौ येथे भरलेल्या १३व्या अधिवेशनात केलेल्या प्रतिपादनादरम्यान सुस्पष्टपणे मांडली. हिंदू व मुस्लिमांदरम्यान नांदणाऱ्या विद्वेषी वातावरणाचे निराकरण करावयाचे तर पूर्वी झालेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळण्याबरोबरच गतकाळातील योग्य आदर्शांचे कालोचित असे डोळस आचरण कसे अनिवार्य व उपकारक आहे हे विशद करत... – ***भूतकाळातून मिळालेल्या धड्यांना काही मूल्य असेल तर त्यातून एक गोष्ट सुस्पष्ट होते, ती अशी – या विशाल देशामध्ये हिंदू व मुसलमान यांनी एकमेकांशी***

***हातमिळवणी करेपर्यंत कोणतीही प्रगती शक्य नाही. अकबराच्या काळात भरभराटीला आलेल्या, त्याचे मुख्य सल्लागार म्हणून काम केलेल्या माणसांचा मार्ग अनुसरण्याचा निश्चय त्यांनी करायला हवा, आणि त्याचा पणतू औरंगजेब याने केलेल्या चुका निक्षून टाळायला हव्यात...*** –असे कळकळीचे आवाहनही न्या. रानडे करतात.

जी मानसिकता धार्मिक दुहीच्याबाबतीत पृष्ठभागावर येते तीच मनोभूमिका जातीजातींमधील फळ्यांनाही तितकीच कारणभूत ठरते, असे न्या. रानडे बजावतात. जातींमध्ये वरकरणी भेद दिसत असले तरी काही सामाजिक वैगुण्यांच्याबाबतीत सर्वच जाती जवळपास एकाच पातळीवर असल्याने अंतर्बाह्य अशा सर्वंकष सामाजिक प्रगतीसाठी सर्वच जातींनी एकाच वेळी प्रवर्तित होण्याखेरीज अन्य पर्याय नाही, असे प्रतिपादन, न्या. रानडे,... – ***जातीचा पेच आपल्या सामाजिक व्यवस्थेवरील मुख्य कलंक आहे, हे विसरता कामा नये. त्यामुळे या संदर्भातील मोठा लढा इथेच लढायला हवा, तो परिघावरून लढता येणार नाही. या परिस्थितीच्या अलाहिदा, जाती–जातींमधील सारखेपणा इतका मोठा आहे की हे भेद क्षुल्लक ठरतात. आपल्या कृतिशीलतेच्या सामाजिक अवकाशाचा विचार केला तर, न्याय व समता या हक्कांची दखल न घेणे, स्त्रियांना सन्मान व स्वातंत्र्य न देणे, पुरुषांना पुरूष म्हणून गैरवर्तन करण्याचा हक्क बहाल करणे, तसेच एका जातीच्या माणसांना दुसऱ्या जातींबद्दल तुच्छतेने बोलायचा हक्क देणे, याबाबतीत सर्वच जाती व पंथसुद्धा सारखेच सदोष आहेत. यातून सामायिक मंचाची शक्यता निर्माण होते, त्याद्वारे सर्वांना कृती करता येईल, आणि या सामायिक मंचावरून मिळालेल्या शिक्षणाद्वारेच उन्नती व स्वातंत्र्य साधणे शक्य आहे, त्यातूनच आपल्याला व्यक्तिगतरित्या आणि सामूहिकरित्या अधिक उंची, अधिक शहाणीव व अधिक चांगुलपणा गाठता येईल...*** – अशा तळमळीच्या शब्दांत करतात. १९०० साली सातारा येथे आयोजित मुंबई सामाजिक परिषदेच्या आयोजित करण्यात आलेल्या प्रांतिक अधिवेशनादरम्यान न्या. रानडे यांनी मांडलेले विश्लेषण आजही तितकेच प्रस्तुत ठरते.

आजचे चित्र काय आहे? समाजमनाच्या सारासार विचारशक्तीला न्या. रानडे यांनी त्यांच्या काळात परोपरीने केलेल्या आवाहनाचा आज आपल्याला पूर्णतः विसर पडलेला आहे. उलटपक्षी पूर्वकालीन प्रथा व संकेत यांच्या तारतम्यहीन पुनरुज्जीवनाचा आग्रह, धर्माच्या आधारे बळकट केले जाणारे ध्रुवीकरण आणि जातिजातींमधील विखार यांना आज जोमाने भरतीच येताना आपण पाहतो आहोत. राजकीय स्वातंत्र्यासाठी संघर्षरत राहिलेल्या राष्ट्रीय सभेच्या सायासांना सामाजिक

परिषदेच्या माध्यमातून प्रवर्तित होणाऱ्या सामाजिक सुधारणेसाठीच्या प्रयत्नांची जोड देण्याचा प्रगल्भपणा तत्कालीन सनातन्यांनी तेव्हाच प्रगट केला असता तर 'आधी राजकीय की सामाजिक?' हा वाद उद्‌भवण्याच्या शक्यता मुळातूनच खुडल्या गेल्या असत्या. केवळ इतकेच नाही तर,– ***२६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळें, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारित राहाणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उद्ध्वस्त करतील...–*** असा इशारा, २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेच्या भरलेल्या अंतिम बैठकीदरम्यान बोलताना देण्याची वेळ, न्या. रानडे यांच्याप्रती असीम आदर बाळगणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरही आली नसती! ■■

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**